CMYK

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
Solapur Tarun Bharat

छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | शनिवार, दि. २० डिसेंबर २०२५ | वर्ष – ३ रे | अंक २५३ | पाने : ८ | किंमत रु. ६/– | inbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## थोडक्यात...

### माजी जिल्हा परिषद सदस्याचा नाल्यात आढळला मृतदेह

**नाशिक :** नाशिक जिल्हा परिषदेचे माजी सदस्य कैलास किसन चौधरी (वय ५२) यांचा संशयास्पद मृतदेह पळसे-शिंदे परिसरात एका नाल्यात आढळून आला आहे. गेल्या पाच ते सहा दिवसांपासून ते बेपत्ता होते. या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, राजकीय वर्तुळातही एकच खळबळ उडाली आहे. कैलास चौधरी हे ११ डिसेंबर रोजी सकाळी कोणालाही काहीही न सांगता घरातून निघून गेले होते. मात्र ते घरी परतले नाहीत. कुटुंबीयांनी सर्वत्र शोधाशोध केली, नातेवाईक व ओळखीच्या व्यक्तींना विचारपूस केली. तरीही त्यांचा काहीही थांगपत्ता लागला नाही. अखेर कुटुंबीयांनी नाशिक रोड पोलीस ठाण्यात बेपत्ता झाल्याची तक्रार दाखल केली होती.

### जिल्हाधिकारी कार्यालयाला बॉम्बने उडवून देण्याची धमकी

**अहिल्यानगर :** अहिल्यानगर येथील जिल्हाधिकारी कार्यालय बॉम्बने उडवून देण्याची धमकी देणारा ई-मेल जिल्हाधिकारी कार्यालयाला प्राप्त झाल्याने प्रशासनात एकच खळबळ उडाली आहे. या धमकीनंतर तातडीने सुरक्षा यंत्रणा सतर्क करण्यात आली.धमकीचा मेल प्राप्त होताच जिल्हाधिकारी कार्यालयातील कामकाज काही काळासाठी थांबवण्यात आले. कार्यालयातील सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांना सुरक्षिततेच्या दृष्टीने बाहेर काढून एका ठिकाणी एकत्र करण्यात आले. त्यानंतर बॉम्बशोधक व श्वान पथक घटनास्थळी दाखल झाले असून संपूर्ण कार्यालयाची सखोल तपासणी सुरू आहे. जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात पोलिसांचा मोठा बंदोबस्त तैनात करण्यात आला असून नागरिकांना परिसरात ये-जा करण्यास निर्बंध घालण्यात आले आहेत. आतापर्यंत कोणतीही संशयास्पद वस्तू आढळून आलेली नसल्याची प्राथमिक माहिती आहे.

### कोकाटेंचा राजीनामा मंजूर : फडणवीस

**मुंबई :** सदनिका घोटाळ्याप्रकरणी दोषी आढळलेल्या माणिकराव कोकाटे यांचा राजीनामा मंजूर करण्यात आल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी दिली. कोकाटेंची खाती सध्या अजित पवारांकडे दिल्याचंही त्यांनी सांगीतलं. काल मुख्यमंत्र्यांनी कोकोटेंचा राजीनामा मंजूर करुन तो राज्यपालांकडे पाठवला होता. त्यानंतर राज्यपालांनीही हा राजीनामा मंजूर केला आहे.

### शीतल तेजवानीवर एफआयआर दाखल

**पुणे :** पुण्यातील जमीन गैरव्यवहार प्रकरणी शितल तेजवानीच्या रिट याचिकेवर आज मुंबई हाईकोर्टात सुनावणी होणार आहे. मुंढवा जमीन गैरव्यवहार प्रकरणातील एफआयआर रद्द करण्यासाठी तेजवानी हायकोर्टात गेली. त्याच याचिकेवर आज सुनावणी होऊ शकते. त्यासाठी पुणे पोलिसांचे तपास अधिकारी दत्तात्रय वाघमारे हे स्वत: हायकोर्टात बाजू मांडणार आहेत. पुणे पोलिसांनी केलेली अटकेची कारवाई कशी योग्य आहे याची माहिती ते कोर्टाला देणार आहेत.

### विठ्ठल-रुक्मिणीच्या चरणांची झीज

**पंढरपूर :** महाराष्ट्राचे आराध्य दैवत असणाऱ्या विठ्ठलाच्या चरणांची झीज होत असल्याची बाब समोर आली होती. त्यामुळे विठ्ठलाच्या चरणावर वज्रलेप करण्याची गरज असल्याचं सांगितलं जात होतं. मात्र, श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरे समितीच्या वतीने खुलासा करण्यात आला असून श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेच्या मूर्ती पूर्णतः सुरक्षित असल्याचं सांगण्यात आलं आहे. भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण छत्रपती संभाजीनगर यांच्याशी पत्रव्यवहार केला होता. त्यानुसार भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षणाच्या तज्ज्ञ अधिकाऱ्यांनी फेब्रुवारी २०२५ मध्ये श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेच्या मूर्तींची प्रत्यक्ष पाहणी करून सविस्तर लेखी अहवाल सादर केला आहे.

### शिर्डीत विचित्र अपघात

**अहिल्यानगर :** अहिल्यानगर जिल्ह्यातील पुणतांबा येथील गोदावरी नदीवर असलेल्या बंधाऱ्याचे कठडे तोडून डंपर खाली कोसळल्याची घटना घडली आहे. डोणगाव येथून पुणतांबाकडे येणाऱ्या डंपरचा स्टेअरिंग रॉड तुटल्याने डंपर चालकाचे नियंत्रण सुटले आणी डंपर नदीत कोसळला आहे. सुदैवाने या अपघातात कोणालाही इजा झाली नाही. बंधाऱ्यावरून हलक्या वाहनाची ये जा करण्याची परवानगी असताना अनेक अवजड वाहने यावरून नेली जात असल्याने नागरीकांसह बंधाऱ्याच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे.

### दिव्यांग व्यक्तींच्या विवाह अनुदानात वाढ

**मुंबई :** दिव्यांग आणि बिगर दिव्यांग व्यक्तींच्या विवाह प्रोत्साहन अनुदान योजनेत आता दिड लाख रुपये प्रोत्साहनअनुदान मिळणार आहेत. दोघंही दिव्यांग असतील तर त्यांच्या विवाहासही यापुढे अनुदान मिळणार असून त्याची रक्कम तब्बल अडीच लाख रुपये करण्यात आली आहे. ही रक्कम पती-पत्नीच्या संयुक्त बँक खात्यात थेट लाभहस्तांतरण प्रणालीद्वारे जमा केली जाणार असून, त्यापैकी ५० टक्के रक्कम दाम्पत्याने पाच वर्षांकरिता मुदतठेवीत ठेवणे आवश्यक आहे.

# पोटच्या दिवट्याने जन्मदात्यांना संपवलं

## आईच्या हाताची नस कापून चेहऱ्यावर वार । हातकणंगले तालुक्यातील हुपरी शहरातील घटना

**कोल्हापूर :** कोल्हापूर जिल्ह्यातील हातकणंगले तालुक्यातील हुपरी शहरातील महावीर नगर परिसरात पहाटेच्या सुमारास घडलेल्या एका धक्कादायक घटनेने संपूर्ण परिसर हादरून गेला आहे. जन्मदात्या मुलानंच आपल्या वृद्ध आई-वडिलांचा निघृणपणे खून केला विजयमाला नारायण भोसले (वय ७०) आणि नारायण गणपतराव भोसले (वय ७८) या वृद्ध दाम्पत्याचा जागीच मृत्यू झाला. खून केल्यानंतर संशयित मुलगा सुनील (वय ४८) स्वतःहून हुपरी पोलीस ठाण्यात हजर झाला. त्याने गुन्ह्याची कबुली दिल्याने एकच खळबळ उडाली. पोलिसांनी सुनिल नारायण भोसले (वय ४८) याला ताब्यात घेतले आहे.



प्राथमिक तपासात संशयित सुनीलने अत्यंत थंड रक्ताने खून केल्याचे समोर येत आहे. आई विजयमाला यांच्या हाताची नस काचेसारख्या धारधार वस्तूने कापली. चेहऱ्यावर काचेच्या तुकड्याने वर्मी घाव घातले. वडील नारायण भोसले यांच्या डोक्यात काठीने वार केला. या हल्ल्यात दोघांचाही जागीच मृत्यू झाला. खूनामागे कारण अद्याप स्पष्ट झालेलं नाही. कौटुंबिक वाद, मानसिक तणाव किंवा अन्य कोणते कारण आहे का, याबाबत पोलीस सखोल तपास करत आहेत.

**खून करून हुपरी पोलीस ठाण्यात झाला हजर**

घटनेची माहिती मिळताच हुपरी पोलीस ठाण्याचे निरीक्षक एन. आर. चौखंडे, सहाय्यक निरीक्षक विक्रम शिंदे यांच्यासह पोलिसांचे पथक तातडीने घटनास्थळी दाखल झाले. फॉरेन्सिक लॅबचे पथकही घटनास्थळी पोहोचून पुरावे संकलित करण्याचे काम सुरू आहे. या घटनेमुळे संपूर्ण हुपरी शहरात हळहळ व्यक्त होत असून भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे. शवविच्छेदनानंतर पुढील कायदेशीर प्रक्रिया करण्यात येणार आहे.

मात्र, कारण काहीही असो, आई-वडिलांवर हात उचलण्यापर्यंत परिस्थिती कशी आणि का गेली, हा प्रश्न मात्र अनुत्तरित आहे. रक्ताच्या नात्यातील हा रक्तरंजित शेवट समाज म्हणून आपण कुठे जात आहोत, याचा गंभीर विचार करायला भाग पाडणारा आहे. कोल्हापुरात काही महिन्यांपूर्वी जन्मदात्या आईचे काळीज चिरून हत्या केल्याची घटना घडली होती.

# साईचरणी दुबईच्या भक्तानं वाहिला सोन्याचा मुकूट

**शिर्डी :** सर्व जाती-धर्माच्या व्यक्ती अत्यंत भक्तीभावाने साईंच्या चरणी नतमस्तक होत असतात. साईबाबांना मोठ्या संख्येने दानही केलं जातं. गुरुवारी साईंच्या गुरुवारी दुबई येथील एका साईभक्ताने साई मंदिराच्या उत्तर बाजूस असलेल्या खिडकीस चारही बाजूंनी आकर्षक नक्षीकाम व सोन्याचा मुलामा असलेली सुंदर फ्रेम अर्पण केली आहे. या खिडकीतून साईबाबांच्या समाधी मंदिरातील मूर्तीचे दर्शन होत असल्याने दररोज मोठ्या संख्येने भाविक या ठिकाणी मुखदर्शनासाठी येतात.



या ठिकाणी फ्रेमवर करण्यात आलेले सुवर्ण नक्षीकाम भाविकांचे लक्ष वेधून घेत आहे. या कामाच्या प्रारंभी विधिवत पूजा करण्यात आली. त्यानंतर संबंधित साईभक्तांचा साईबाबा संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडिलकर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. साईभक्ताच्या विनंतीनुसार त्यांचे नाव गोपनीय ठेवण्यात आले आहे. दुबईतील साईभक्ताकडून साई मंदिरातील दर्शन खिडकीस सुवर्ण नक्षीकामाची भव्य फ्रेम अर्पण करण्यात आली आहे. या फ्रेमची किंमत ५५ लाख रुपये असल्याचं सांगितलं जात आहे.

# पाण्याची टाकी फुटून तीन कामगारांचा मृत्यू

**नागपूर :** राज्याची उपराजधानी नागपूरमध्ये आज सकाळी मोठा अपघात झाला आहे. नवीन बुटीबोरी एमआयडीसी फेज २ मधील अवाडा सोलर प्लांटमधील एक मोठी पाण्याची टाकी अचानक फुटली आहे. पाण्याच्या दबावामुळे ही टाकी फुटल्याचे समोर आले आहे. टाकी फुटल्यानंतर अनेक कामगार टाकीच्या ढिगाऱ्याखाली अडकले होते. यात बऱ्याच कामगारांना बाहेर काढण्यात यश आले आहे. मात्र या घटनेत ३ कामगारांचा जागीच मृत्यू झाला असून आठ पेक्षा जास्त जण झाले आहेत.

बुटीबोरी एमआयडीसी फेज २ मधील अवडा सोलर प्लांटमध्ये ही टाकी फुटल्याची घटना घडली आहे. टाकी फुटल्यानंतर मोठा आवाज झाला आणि या टाकीच्या ढिगाऱ्यात अनेक कामगार अडकले. या घटनेची माहिती मिळताच स्थानिक पोलिस, अग्निशमन दल आणि आपत्कालीन सेवा घटनास्थळी पोहोचल्या आणि त्यांनी बचाव आणि मदत कार्य सुरू केले. मात्र या घटनेत ३ जणांचा मृत्यू



झाला आहे. पोलिसांनी मृतदेह ताब्यात घेतले असून ते शवविच्छेदनासाठी पाठवले आहेत. सध्या अधिकाऱ्यांना या प्रकरणाच्या चौकशीचे आदेश दिले आहेत.

हा अपघात कशामुळे झाला याबाबत अद्याप माहिती समोर आलेली नाही. आज सकाळी अकरा वाजण्याच्या सुमारास झालेल्या अपघातामुळे आजूबाजूच्या औद्योगिक क्षेत्रात खळबळ उडाली आहे. आता कामगारांच्या सुरक्षिततेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होऊ लागले आहेत. या घटनेचे कारण शोधण्याचा प्रयत्न केला जात आहे.

या घटनेत जे दोषी असतील त्यांच्यावर कठोर कारवाई केली जाणार असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली आहे.

**कामगार ढिगाऱ्याखाली अडकले**

ही घटना घडली तेव्हा या ठिकाणी मोठ्या संख्येने कामगार काम करत होते. त्यामुळे आणखी काही कामगार ढिगाऱ्याखाली गाडले गेले असल्याचा संशय आहे. सध्या ढिगारा हटवण्याचे काम सुरू आहे आणि अडकलेल्या कामगारांना बाहेर काढण्यासाठी जोरदार प्रयत्न सुरू आहेत. त्याचबरोबर ढिगाऱ्याखालून बाहेर काढल्या जाणाऱ्या जखमींना त्वरित वैद्यकीय उपचार देण्यासाठी वैद्यकीय पथके आणि रुग्णवाहिका घटनास्थळी सज्ज आहेत अशी माहिती समोर आली आहे.

# ॲड. निकम यांना हटवण्याची मागणी

**बीड :** संपूर्ण राज्याचे लक्ष लागून राहिलेल्या बीड जिल्ह्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणाच्या सुनावणीला सुरुवात झाली आहे. आज या सुनावणीदरम्यान नाट्यमय घडामोडी पाहायला मिळाल्या. विशेष म्हणजे सरकारी वकील ॲड. उज्ज्वल निकम हे एका राजकीय पक्षाशी संबंधित आहेत. त्यांच्या उपस्थितीमुळे केसवर परिणाम होऊ शकतो, असा दावा करत आरोपींनी त्यांना बदलण्याची मागणी न्यायालयाकडे केली आहे. या अर्जावर कायदेशीर पेच निर्माण झाल्याने न्यायालयाने ही सुनावणी दुपारपर्यंत स्थगित केली आहे.

सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणी आज सुनावणी पार पडली. यावेळी सरकारी वकील बाळासाहेब कोल्हेंकडून यांच्याकडून युक्तिवाद करण्यात आला. या सुनावणीसाठी धनंजय देशमुख उपस्थित होते. यावेळी आरोपी क्रमांक ३ ते ७ म्हणजेच सुदर्शन घुले, प्रतिक घुले, सुधीर



सांगळे, महेश केदार आणि जयराम चाटे यांच्या वतीने न्यायालयात एक अर्ज दाखल करण्यात आला. उज्ज्वल निकम हे राजकीय पक्षाशी सक्रियपणे जोडलेले असल्याने ते या प्रकरणात निष्पक्षपातीपणे काम करू शकणार नाहीत, असा आरोप आरोपींच्या वकिलांनी केला. यावर उज्जवल निकम यांनी कायद्यात अशाप्रकारे वकील बदलण्याची कुठेही तरतूद नाही असा पलटवार युक्तिवादादरम्यान केला.

यानंतर या प्रकरणाच्या सुनावणी दरम्यान आरोपी विष्णू चाटे याच्या सहभागावरुनही जोरदार युक्तिवाद झाला. विष्णू चाटेचा गुन्ह्यात कुठेही उल्लेख नाही. त्याच्याविरुद्ध पुरावे नाहीत, असा दावा बचाव पक्षाने केला. यावर सरकारी वकिलांनी तीव्र आक्षेप घेत सांगितले की, विष्णू चाटे हा सुरुवातीपासून या गुन्ह्यात सक्रिय होता. वाल्मिक कराडचा निरोप पोहोचवणे आणि हॉटेल तिरंगामधील बैठकीत संतोष देशमुखला कायमचा धडा शिकवा असा आदेश देणे, यात त्याचा मुख्य सहभाग आहे.

यानंतर तपास अधिकाऱ्यांनी न्यायालयाला सांगितले की, प्रकरणातील महत्त्वाचा पुरावा असलेला लॅपटॉप सध्या फॉरेन्सिक लॅबकडे डेटा रिकव्हरीसाठी पाठवण्यात आला आहे. यावेळी आरोपींच्या वकिलांनी आम्हाला व्हिडिओ कॉपी आणि लॅपटॉपमधील पुरावे मिळाल्याशिवाय चार्ज फ्रेम करू नये, अशी विनंती केली. यावर न्यायालयाने तपास अधिकाऱ्यांना तात्काळ व्हिडिओ कॉपी देण्याचे आणि लॅपटॉपचे रिपोर्ट कधीपर्यंत मिळतील हे कळवण्याचे आदेश दिले आहेत.

दरम्यान संतोष देशमुख प्रकरणातील आजच्या सुनावणीला ॲड. उज्वल निकम हे व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे उपस्थित होते.

# माणिकराव कोकाटेंना जामीन मंजूर

**नाशिक :** नाशिक सत्र न्यायालयानं माणिकराव कोकाटे यांच्याविरोधात अटक वॉरंट जारी केलं होतं, त्याविरोधात कोकाटे यांनी हाय कोर्टात धाव घेतली होती, दरम्यान या प्रकरणावर सुनावणी करताना हाय कोर्टानं मोठा निर्णय घेतला आहे. माणिकराव कोकाटे यांना मोठा दिलासा मिळाला असून, त्यांना जामीन मंजूर करण्यात आला आहे. माणिकराव कोकाटेंना एक लाखाच्या जातमुचलक्यावर हाय कोर्टाकडून जामीन मंजूर करण्यात आला आहे, त्यामुळे तुर्तास तरी माणिकराव कोकाटे यांची अटक आता टळली आहे. नाशिकमधील सदनिका प्रकरणात कोकाटे यांना दोन वर्षांची शिक्षा सुनावण्यात आली होती, त्यानंतर या प्रकरणात नाशिक सत्र न्यायालयानं अटक वॉरंट जारी केलं. अटक वॉरंट जारी होताच माणिकराव कोकाटे यांनी उच्च न्यायालयात धाव घेतली होती, आता या प्रकरणात त्यांना हाय कोर्टाकडून मोठा दिलासा मिळाला असून जामीन मंजूर करण्यात आला आहे.

# कोकाटेंच्या आमदारकीवर टांगती तलवार कायम!

**नाशिक :** नाशिकमधील सदनिका घोटाळ्याच्या प्रकरणात माजी मंत्री माणिकराव कोकाटे यांना नाशिक सत्र न्यायालयानं दोन वर्षांच्या तुरुंगवासाची शिक्षा सुनावणी होती. नाशिक पोलिसांनी त्यांच्याविकोधात अटक वॉरंट जारी केले होते. त्याचबरोबर नाशिक पोलिसांचे एक पथक त्यांच्या अटकेसाठी मुंबईतही दाखल झाले होते. मात्र प्रकृतीच्या कारणामुळे त्यांना अटक करण्यात आली नव्हती. आज कोकाटे यांना सुनावण्यात आलेल्या शिक्षेच्या विरोधात हायकोर्टात सुनावणी पार पडली. यात कोर्टाने माणिकराव कोकाटेंना मोठा दिलासा देत जामीन मंजूर केला आहे. त्यामुळे आता त्यांची अटक टळली आहे. या निर्णयानंतर कोकाटेंच्या वकिलांनी काय म्हटले ते जाणून घेऊयात.

माणिकराव कोकाटे यांच्या शिक्षेबाबतच्या सुनावणीनंतर बोलताना कोकाटे यांच्या वकील श्रद्धा दुबे पाटील यांनी म्हटले की, कोर्टाने कोकाटेंची शिक्षा कोर्टाने रद्द केलेली नाही, मात्र त्यांना जामीन दिला आहे. त्यामुळे कोकाटेंची अटक टळणार आहे. त्यामुळे आता त्यांची आमदारकी वाचणार आहे.

MAHATMA GANDHI MISSION — IN PURSUIT OF EXCELLENCE — EDUCATION | SERVICE | RESEARCH
महात्मा गांधी मिशन
श्रेष्ठता की ओर अग्रसर
शिक्षण | सेवा | शोधकार्य
॥ अप्पो दीपो भव ॥ महात्मा गांधी मिशन विश्वविद्यालय MGMUNIVERSITY
MGM INSTITUTE OF HEALTH SCIENCES ★ NAVI MUMBAI ★



१९८२



२०२५

आओ उजाला करें
सस्नेह निमंत्रण
४३ वा वर्धापन दिन समारंभ

प्रमुख अतिथी
मा.दामोदर मावजो
ज्ञानपीठ पुरस्कार विजेते, प्रख्यात साहित्यिक आणि विचारवंत, गोवा

विशेष अतिथी
मा.अजय कंवल
एमडी अँड सीईओ जन स्मॉल फायनान्स बँक, बंगळुरू
(जेएनईसी माजी विद्यार्थी)

विनीत
श्री.कमलकिशोर कदम
(अध्यक्ष, महात्मा गांधी मिशन)

शनिवार २० डिसेंबर, २०२५ । सायं. ५.०० ते ७.००
स्थळ-एमजीएम स्टेडियम, एन-६, सिडको, छ. संभाजीनगर

खरा आहे,
आरोग्यासाठी चांगला आहे
बैद्यनाथ च्यवनप्राश स्पेशल




पॉवर ऑफ 3
चांगली इम्यूनिटी | जास्त ऊर्जा | शक्ति आणि स्फूर्ती

च्यवन-फीट शुगरफ्री पण उपलब्ध

बैद्यनाथ च्यवनप्राश शुद्ध तुपात तयार केले जाते

सर्व मेडिकल स्टोर्स व आयुर्वेदिक औषधालयात मध्ये उपलब्ध. 844 844 4935

CMYK

लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## पोलिसांच्या कारवाईनंतरही ऑटोचालकांत सुधारणा नाही!

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १९ डिसेंबर :** लातूर शहरातील वाहतुकीला शिस्त लावण्याच्याउद्देशाने शहर वाहतूक पोलीस शाखेच्यावतीने ऑटोचालकांवर कडक कारवाई मोहिम राबविण्यात येत आहे. मात्र, पोलिसांच्या या मोहिमेनंतरही ऑटोचालकांच्या वागण्या - बोलण्यात आणि कामात सुधारणा झालेली नसल्याचे पाहावयास मिळत आहे. त्यामुळे सुजाण नागरिक त्रस्त झाले आहेत.

लातूर शहरातील वाहतूक समस्या हा अत्यंत जिव्हाळ्याचा विषय आहे. शहरातील वाहनांची वाढती संख्या आणि वाहनधारकांसह ऑटो चालकांच्याही बेशिस्त वाहन चालवण्यामुळे ही समस्या अधिकच वाढली आहे. यामध्ये सुधारणा व्हावी याकरिता पोलीस यंत्रणेने ऑटोचालकांवर कारवाईचा बडगा उगारण्यासाठी विशेष मोहीम राबविली. अजूनही ती मोहीम चालूचआहे. मात्र, ऑटोचालकांमध्ये किमान या घडीपर्यंत तरी कोणतीही सुधारणा झाल्याचे पाहायला मिळत नाही. त्यामुळे काही उद्दाम, मस्तवाल ऑटोचालक आता पोलीस प्रशासनालाही भीत नसल्याचे दिसून येत आहे. अनेक ऑटोचालक शिस्त तोडून अगदी पोलिसांच्या समोरूनही सिग्नल तोंडणे, पुढच्या सीटवर प्रवाशी बसवून ऑटो चालविण्याचे काम करताना दिसत आहेत. ऑटोचालकांमध्ये सुधारणा करण्यासाठी आता ऑनलाईन पद्धतीने दंड वसुलीची मोहीम कार्यान्वित करण्याची मागणी होत आहे.



# लातूर जिल्ह्यात दर्श वेळा अमावस्या उत्साहात साजरी

## लातूरकरांनी घेतला अघोषित ‘संचारबंदीचा’ अनुभव



**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १९ डिसेंबर :** संपूर्ण लातूर जिल्ह्यात शुक्रवारी दर्श वेळा अमावस्या तथा ग्रामीण बोलीभाषेतील ‘येळवस’ पारंपारिक पद्धतीने अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. जिल्हावासियांनी या सणाच्या निमित्ताने सहकुटुंब सामूहिक वनभोजनाचा आनंद लुटला. या सणाच्या निमित्ताने जवळपास नव्वद-पंच्याण्णव टक्के शहरवासीय शेतात गेल्याने लातूरकरांनी शहरात प्रदीर्घ कालावधीनंतर अघोषित ‘संचारबंदीचा’ अनुभव घेतला.

दरवर्षी मार्गशीर्ष महिन्यात येणारी दर्श अमावस्या लातूर जिल्ह्यात वेळा अमावस्या म्हणून उत्साहात साजरी केली जाते. या निमित्त विविध भाज्यांच्या समूह असणारी भज्जी, ताकापासून तयार केलेली अतिशय पाचक पेय असणारी आंबील, शेंगदाणे - तीळ घालून केलेल्या स्वादिष्ट गोड पोळ्या. धपाटे, ज्वारी-बाजरीच्या भाकरी, चपाती, कडक भाकरी, गव्हाची खीर, विविध चटण्या-लोणची, साधे वरण, तिखट वरण असा पंचपक्वानांनाहीशंभरदा मागे टाकेलअसा स्वादिष्ट भोजनाचा बेत असतो. या सणाचे वैशिष्ट्य असे की, या दिवशी आपल्या शेताच्या जवळून जाणाऱ्या प्रत्येक वाटसरूला शेतकरी बांधव अत्यंत आग्रहाने जेवू घातल्याशिवाय पुढे जाऊ देत नाही. या दिवशी शहरात राहणाऱ्या बहुसंख्य नागरिकांना आपल्या इष्टमित्र-आप्तेष्टांकडे वनभोजनाचे निमंत्रण असते. या आग्रहामुळे शेती असलेले आणि शेती नसलेले सगळेचजण सामूहिक वनभोजनाचा आस्वाद घेतात.

लातूर शहरात वेळ अमावास्येमुळे शुक्रवारी अघोषित संचारबंदीसारख्या वातावरणाची अनुभूती आली. नेहमी वाहतुकीने गजबजलेले रस्ते अगदी सुनसान झाल्याचे पाहावयास मिळाले. सकाळी अकरा वाजेपर्यंत पन्नास टक्क्यांहून अधिक लातूर जवळपास रिकामे झाले होते. दुपारपासून ते सायंकाळी सात वाजेपर्यंत ९० टक्क्यांहून जास्त शहरवासीय शेतात डेरेदाखल झाल्याचे चित्र पाहायला मिळाले. नेहमी कामाच्या धबडग्यातूनहा एक दिवस तमाम लातूरकर सुटीसारखा एन्जॉय करताना दिसतात.

शेतात पोहोचल्यानंतर बच्चे कंपनी चिंचा, बोरे, आवळे, डहाळे, तुरीच्या शेंगा, पेरू या रानमेव्याचा आस्वाद घेण्यात गुंततात तर महिला वर्ग निवांतपणे रानमेव्याचा आनंद घेत घेत झोक्याचा मनमुराद आनंद लुटतात. पुरुष मंडळीहीनिवांतपणे पत्त्यांचा डाव खेळताना आढळून येतात.

एकंदरच हा पारंपरिक सण अतिशय आनंदी वातावरणात साजरा करण्यात आला. दिवसभराचा एक दिवसाचा हा वनभोजनाचा सोहळा आटोपून सायंकाळी घरी परतले. शेतातून शहरवासीय शहरात परतताना पुन्हा एकदा वाहतुकीच्या कोंडीचा आनंद शहरात प्रवेश करणाऱ्या सर्वच चौकात आला.

## अल्पवयीन विद्यार्थिनीवर शिक्षकाचे दुष्कर्म

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १९ डिसेंबर :** मी तुला नववी, दहावीला शिकविले आहे. तू मला खूप आवडतेस, तू मोठी झाल्यावर तुझ्यासोबत लग्न करतो, अशी फूस लावत सॅमसंग कंपनीचा मोबाईल घेऊन देणे, गरजेवेळी पैसे देणे, हॉटेलमध्ये नेऊन खाऊ-पिऊ घालून एका अल्पवयीन विद्यार्थिनीला लॉजवर नेऊन तिच्यासोबत बलात्कार करणाऱ्या शिक्षकावर बलात्कारासह पोक्सोचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**अपहरणासह पोक्सोचा गुन्हा दाखल, नराधम शिक्षक अटकेत**

आरोपी राजकुमार बळीराम गवरे (व्य ४६, रा. खलंग्री, ता. रेणापूर, हा. मु. केशव नगर, लातूर, ता. जि. लातूर) हा परभणी जिल्ह्याच्या सोनपेठ तालुक्यातील नईकोटा येथील एका शाळेवर सहशिक्षक आहे. त्या शाळेत नववी-दहावीचे शिक्षण घेऊन लातूरमध्ये अकरावीला आलेल्या अल्पवयीन विद्यार्थिनीची जुनी ओळख काढली. जुने शिक्षक असल्यामुळे त्या अल्पवयीन भावनेतून त्याची जवळीक साधली. पीडितेनेही शिक्षक या आदरार्थी सदर पीडिता दहावीत असतानाच आरोपी शिक्षक राजकुमार गवरे याने ‘तू मला आवडतेस, असे बोलला होता. त्यावर पीडित मुलीने त्याचवेळी ‘सर, तुम्ही शिक्षक आहात, तुम्हाला असे म्हणणे शोभते का’, असे म्हणाली होती. परंतु, ती पीडिता अकरावी शिक्षणासाठी लातूरला आली.

लातूरमध्ये ती दिसल्यानंतर आरोपी नराधम राजकुमार गवरे याच्यातला राक्षस जागा झाला. त्याने पीडितेसोबत पुन्हा ओळख वाढवत तिला जाळ्यात ओढण्याचा प्रयत्न केला. यातूनच त्याने त्या अल्पवयीन विद्यार्थिनीला मोबाईल भेट दिला. यातून आरोपी राजकुमार गवरे याने एका तिला अतिप्रसंग केला फूस लावून अल्पवयीन पीडितेवर सदर आरोपी अत्याचार करीत होता. मागील आठ दिवसांपूर्वी घरात आई वडिलांवर झाल्याने पीडित मुलगी रात्रभर घराबाहेर होती. त्यामुळे तिच्या आई-वडिलांच्या तक्रारीवरून शिवाजी नगर पोलीस ठाण्यात अज्ञाताविरोधात अपहरणाचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. आरोपी राजकुमार गवरे याच्याविरोधात पोक्सोचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## औसा नगरपालिकेच्या मतमोजणीसाठी निवडणूक विभाग सज्ज

**तभा वृत्तसेवा,**

**औसा, दि. १९ डिसेंबर :** औसा नगरपालिकेच्या झालेल्या मतदानाची मतमोजणीस रविवार दि. २१ रोजी सकाळी १० वा.तहसिल कार्यालयातील प्रशासकीय इमारतीत सुरुवात होणार आहे.दुपारी १ वा. पर्यंत या निवडणुकीचे निकाल जाहीर करण्यासाठी प्रशासन व निवडणुक विभाग सज्ज झाला असल्याची माहिती निवडणुक निर्णय अधिकारी तथा तहसिलदार घनशाम अडसुळ यांनी दिली आहे.

औसा नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ ची मतमोजणी रविवार २१ डिसेंबर रोजी होणार आहे. यासाठी लागणारी तयारी जवळपास पुर्ण झाली असून या निवडणुकीतील एकूण ११ प्रभागांसाठी स्वतंत्र ११ टेबलांची व्यवस्था करण्यात आली आहे. प्रत्येक प्रभागासाठी स्वतंत्र टेबल ठेवण्यात आल्याने मतमोजणीची प्रक्रिया सुलभ, पारदर्शक आणि वेळेत पूर्ण होईल, असा विश्र्वास प्रशासनाने व्यक्त केला आहे.

प्रभागनिहाय मतमोजणीच्या फेऱ्यांचेही निश्र्चित नियोजन करण्यात आले आहे. त्यानुसार प्रभाग क्रमांक ६ साठी ४ फेऱ्यांत मतमोजणी होणार आहे, तर प्रभाग क्रमांक ११ साठी सर्वाधिक म्हणजे ५ फेऱ्यांत मतमोजणी केली जाणार आहे. उर्वरित सर्व प्रभाग क्रमांकांसाठी प्रत्येकी ३ फेऱ्यांत मतमोजणी पूर्ण केली जाणार आहे. मतमोजणी प्रक्रियेत सहभागी होणाऱ्या उमेदवारांच्या प्रतिनिधींसाठी स्पष्ट नियमावली जाहीर करण्यात आली आहे.

**सकाळी १० वा. पासून सुरुवात । ११ प्रभागाची ११ टेबलावर मोजणी । दुपारपर्यंत निकाल**

मतमोजणी केंद्रात प्रवेशासाठी अधिकृत पास आवश्यक असून, पासशिवाय कोणालाही प्रवेश दिला जाणार नाही. नगरसेवक (सदस्य) पदाच्या प्रत्येक उमेदवाराला केवळ एकाच मतमोजणी प्रतिनिधीची परवानगी देण्यात आली आहे.

मतमोजणी केंद्रात सकाळी ९ वाजेपर्यंत प्रवेश करता येणार आहे.मतमोजणी सुरू होण्यापूर्वी सर्व प्रतिनिधींनी वेळेत उपस्थित राहावे, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे. सुरक्षिततेच्या दृष्टीने मतमोजणी केंद्रात मोबाईल फोन नेण्यास सक्त मनाई करण्यात आली आहे. केंद्रात प्रवेश करताना सर्वांची तपासणी केली जाणार असून, नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला आहे. मतमोजणी दरम्यान कायदा व सुव्यवस्था अबाधित असावी. यासाठी पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात येणार आहे. प्रशासकीय अधिकारी, निवडणूक कर्मचारी आणि सुरक्षादल यांच्या समन्वयातून संपूर्ण प्रक्रिया पार पाडली जाणार आहे. पारदर्शक, शांततामय आणि नियमबद्ध मतमोजणी प्रशासनाचे प्रमुख उद्दिष्ट असल्याचे अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले आहे.तर नगराध्यक्ष पदाच्या उमेदवारांना प्रत्येक टेबलवर एक अशा एकूण ११ मतमोजणी प्रतिनिधी नेमण्याची मुभा देण्यात आली आहे. यामुळे सर्व प्रभागांतील मतमोजणीवर नगराध्यक्ष पदाच्या उमेदवारांचे थेट लक्ष राहणार आहे.

## १० वी, १२ वी बोर्ड परीक्षेवेळी सीसीटीव्ही कॅमेरे अनिवार्य

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १९ डिसेंबर :** येऊ घातलेल्या नव वर्षात १० वी, १२ वीच्या बोर्ड परीक्षांचे वेळापत्रक जाहीर झाले असले तरी यावेळच्या परीक्षेवेळी वर्ग खोल्यांत सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याचे अनिवार्य केले आहे. गतवर्षी बऱ्याच परीक्षा केंद्रांवर कॅमेरे बसविण्यात आले नसल्याचे निदर्शनास आल्यावरून यावेळी सक्त ताकीद दिली आहे.

लातूर विभागीय परीक्षा मंडळा अंतर्गत नांदेड, धाराशिव व लातूर या तीन जिल्ह्यांच्या १०वी, १२वीच्या परीक्षा घेतल्या जातात. १०वीची परीक्षा ४५२ केंद्रांवर तर १२ वीची परीक्षा २०७ केंद्रांवर होणार आहे. लातूरच्या विभागीय परीक्षा मंडळाने १०वी, १२वी बोर्ड परीक्षेची जोरदार तयारी सुरू केली आहे. विद्यार्थी संख्या, कर्मचारी संख्या, पोलीस दल, भरारी पथके, कॉपीमुक्त परीक्षेची हल्ली तयारी सुरू असली तरी परीक्षेला आणखी दीड महिना आहे. या दीड महिन्यात परीक्षा मंडळाला सर्वतोपरी सज्जता ठेवावी लागणार आहे. गतवर्षी १०वी, १२वी परीक्षेवेळी कॉपी आढळलेली सुमारे १७ परीक्षा राज्य शासनाच्या निर्देशावरून रद्द केली. रद्द केलेल्या केंद्रांवरील विद्यार्थ्यांना तेथेच किंवा नजीकच्या केंद्रावर परीक्षा देण्याची सोय करण्याची नवी जबाबदारी परीक्षा मंडळावर आली आहे.

> येत्या फेब्रुवारी-मार्च महिन्यात होणाऱ्या १०वी, १२वी बोर्ड परीक्षेवेळी प्रत्येक परीक्षा केंद्राच्या वर्ग खोल्यांत सीसीटीव्ही कॅमेरे बसविणे अनिवार्य केले आहे. यासाठी शासनाने आर्थिक मदत केली नसली तरी केंद्र चालविणाऱ्या शाळांना तशा सूचना देण्यात आल्या आहेत. लातूर मंडळा अंतर्गत नांदेड, धाराशिव, लातूर या तीन जिल्ह्यांत १०वी परीक्षेसाठी ४५२ तर १२वी परीक्षेस २०७ केंद्र असतील. आणखी परीक्षेची तयारी सुरू आहे. शेवटच्या तारखेपर्यंत परीक्षार्थींना अर्ज करता येणार आहे. परीक्षेसंदर्भात, शासनाकडून आणखी नवे नियम येऊ शकतात. त्याप्रमाणे मंडळ कार्यवाही करेल. **- सुधाकर तेलंग, अध्यक्ष, लातूर विभागीय**

परीक्षेवेळी कॉपीसारखा प्रकार होऊ नये म्हणून राज्य शासनासह परीक्षा मंडळ प्रयत्न करीत असले तरी अजून शंभर टक्के यश आलेले नाही. आता होऊ घातलेल्या १०वी, १२वी परीक्षेवेळी प्रत्येक केंद्राच्या वर्ग खोल्यांत सीसीटीव्ही कॅमेरे बसविणे अनिवार्य केले आहे. कॅमेरे बसविणे अनिवार्य केले असले तरी शासनाने त्यासाठी कुठली मदत केलेली नाही. गतवर्षी परीक्षा मंडळाच्या निरीक्षणानुसार ९५ टक्केच केंद्रांवर कॅमेरे बसविण्यात आले होते.

## दुसऱ्या अभिजात आंतरराष्ट्रीय लघु चित्रपट महोत्सवाचा समारोप

### ‘ब्रम्हकमळ’ सर्वोत्कृष्ट लघुपट - ‘सुलतान’ व ‘डिअर टीचर’ ला अनुक्रमे द्वितीय आणि तृतीय पारितोषिक

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १९ डिसेंबर :** अभिजात फिल्म सोसायटी व दयानंद शिक्षण संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित दुसऱ्या अभिजात इंटरनॅशनल फिल्म फेस्टिवलचा पारितोषिक वितरण सोहळा प्रसिद्ध लेखक व कवी बालाजी सुतार यांच्या हस्ते पार पडला. वृद्धापकाळातील एका स्त्रीची भावनिक व तरल कथा असलेल्या ‘ब्रह्मकमळ’ या लघुपटास चित्रपती व्ही. शांताराम यांच्या नावाने दिला जाणारा सर्वोत्कृष्ट लघुपटाचा पहिला पुरस्कार प्रदान करण्यात आला. याच लघुपटाचे दिग्दर्शक आशुतोष जरे यांना सर्वोत्कृष्ट दिग्दर्शकाचाही पुरस्कार मिळाला. ‘सुलतान’ आणि ‘डिअर टीचर’ या लघुपटांना अनुक्रमे द्वितीय व तृतीय पारितोषिक देण्यात आले. ‘इन हाफ’ या कलाकृतीस सर्वोत्तम ॲनिमेशनपटाचा पुरस्कार देण्यात आला तर 'वूमन ऑन फायर' या माहितीपटास सर्वोत्कृष्ट माहितीपट म्हणून गौरवण्यात आले.







कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असलेल्या लेखक बालाजी सुतार यांनी लघुपटातून मांडल्या जाणाऱ्या गोष्टीला अधिक महत्व असल्याचे अधोरेखित करत कुठल्याही व्यावसायिक अपेक्षांचं ओझं नसलेलं लघुपट हे अतिशय नेमकं, प्रखर आणि गरजेचं माध्यम आहे असं मत व्यक्त केलं. तत्पूर्वी लातूर जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी वर्षा घुगे-ठाकूर यांनी महोत्सवास सदिच्छा भेट देत असताना लघुपट माध्यमातल्या कलात्मक दृष्टीकोनाबद्दल उपस्थित प्रेक्षकांशी संवाद साधला. विविध विषयावर संवाद साधण्यासाठी लघुपट हे अतिशय वेगवान आणि परिणामकारक माध्यम आहे हे सांगताना भविष्यात हा महोत्सव अजून मोठ्या प्रमाणात लोकांपर्यंत पोहचावा अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

सुमारे १२ देशातून आलेल्या १९ भाषांमधल्या निवडक १०० लघुपटांचे प्रदर्शन या महोत्सवात झाले. परिक्षक म्हणून ठाणे येथील संतोष पाठारे आणि नवी मुंबई येथील निलेश कुंजीर यांनी काम पाहिले. या कार्यक्रमास डॉ. मिलिंद पोतदार, प्रा. ओमप्रकाश झुरळे यांच्यासह अभिजात फिल्म सोसायटीचे अध्यक्ष जितेंद्र पाटील, डॉ. विश्र्वास शेंबेकर, डॉ. स्वप्नील देशमुख, धनंजय कुलकर्णी, प्रा शिवशंकर पटवारी, अभिषेक बुचके, प्रथमेश जाधव उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी तीन दिवस मेहनत घेणाऱ्या दयानंद महाविद्यालयाच्या स्वयंसेवकांचे प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते सन्मानपत्र देऊन कौतुक करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अभिजात फिल्म सोसायटीचे मधुसूदन कुलकर्णी यांनी केले तर आभार प्रदर्शन डॉ दुर्गा शर्मा यांनी केले.

**इतर विभागातले पुरस्कार याप्रमाणे आहेत :** सर्वोत्कृष्ट व्हिडीओ साँग कोलकतार पोरी (प्रथम), माझ्या गणा (द्वितीय). सर्वोत्कृष्ट आंतरराष्ट्रीय लघुपट क्रेस्ट.

**सर्वोत्कृष्ट स्थानिक लघुपट :** भुताचं पत्र, सर्वोत्कृष्ट स्थानिक माहितीपट योगेश्वरी देवी, सर्वोत्कृष्ट स्टुडन्ट लघुपट एक्स एल १००, ज्यूरी अवॉर्ड दि फर्स्ट फिल्म, सिलेक्टर चॉईस सोच, ऑडियन्स चॉईस डिसकनेक्टेड, सर्वोत्कृष्ट अभिनेता कृष्णा यादव (उन्मेय), सर्वोत्कृष्ट अभिनेत्री सुजाता देशपांडे (निरोप), सर्वोत्कृष्ट बालकलाकार सार्थक मसने (व्हॉइस ऑफ ओल्ड, ) सर्वोत्कृष्ट छायाचित्रण हृदय सोनवणे (ब्रम्हकमळ,) सर्वोत्कृष्ट संकलन राम पंडियन (सी यू टूमॉरो), सर्वोत्कृष्ट संवाद

मानसी मोरे, ओंकार मसुरकर, दुर्वा सावंत (ऑटोप्सी), सर्वोत्कृष्ट कला दिग्दर्शन अतुल लोखंडे (सुलतान), सर्वोत्कृष्ट माहितीपट (पर्यावरण) गटली मॅन, सर्वोत्कृष्ट पार्श्वसंगीत अनिश बसु (दि अल्टर इको), सर्वोत्कृष्ट पटकथा केविन बी. (लंचबॉक्स), सर्वोत्कृष्ट सामाजिक लघुपट के. इनफ्लूवन्सर, सर्वोत्कृष्ट पोस्टर डिजाईन सुनीत वडके (द्वैत).



## ‘मुक्तांगण’मध्ये वेळा अमावास्या सण उत्साहात

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १९ डिसेंबर :** लातूर परिसरातील मातोश्री कलावती प्रतिष्ठान संचालित मुक्तांगण इंग्लिश स्कूल मध्ये वेळा अमावास्या सण मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी प्राचार्या सुमेरा शेख यांनी पाच पांडवाचे पुजन करुन दर्शन घेतले. या प्रसंगी शाळेच्या शिक्षिका सुवर्णा माळवदकर यांनी वेळा अमावास्या सणाची माहिती विद्यार्थ्यांना दिली.

शेतात आल्यानंतर एका झाडाखाली पाच पांडव मांडतात. त्यांना चुन्याने रंगवतात. त्यावर कडब्याच्या पाच पेंढ्या उभ्या करून एक सुंदर कोप करतात. लाल शालीने ते बांधतातही. डालग्यातून साहित्य काढतात. पांडवासमोर हिरवे कापड ठेवून लक्ष्मीची पूजाही मांडतात. नैवेद्य म्हणून भजी, वांग्याचे भरीत, ऊस, पेरू, बोरे, शेंगदाण्याचे लाडू, आंबील, आंबटभात, ज्वारी आणि बाजरीचे उंडे ठेवतात. पांडवाची पूजा करतात. शेवटी नारळ फोडून अगदी साध्या पद्धतीने पूजा संपवतात. या निमित्ताने शाळेचे विद्यार्थी उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## थोडक्यात...

### महाराष्ट्र ग्रामीण बँकेचा कर्मचारी-अधिकारी महासंवाद मेळावा नागपुरात

**छत्रपती संभाजीनगर :** महाराष्ट्र ग्रामीण बँकेकडून कर्मचारी व अधिकाऱ्यांमध्ये आपुलकी, संवाद आणि कामाची एकजूट वाढावी, या उद्देशानं कर्मचारी-अधिकारी महासंवाद मेळावा रविवार, दि. २१ डिसेंबर २०२५ रोजी नागपुरात होणार आहे. या मेळाव्याचं आकर्षण म्हणजे 'चला हवा येऊ द्या' फेम अभिनेते भारत गणेशपुरे यांचं संवादात्मक सत्र. त्यांच्या शैलीतून कर्मचाऱ्यांमध्ये नवचैतन्य, उत्साह आणि सकारात्मक विचारांची जोड मिळणार आहे. कार्यक्रमाला महाराष्ट्र ग्रामीण बँकेचे सर्वसाधारण व्यवस्थापक श्री. भगवान सुरसे, डी. एम. कावेरी आणि श्रीराम भोर यांची प्रमुख उपस्थिती लाभणार असून, अध्यक्षस्थान बँकेचे अध्यक्ष मिलिंद धारड भूषविणार आहेत. या महासंवाद मेळाव्यास अकोला, चंद्रपूर, भंडारा आणि यवतमाळ विभागातील कर्मचारी-अधिकारी मोठ्या संख्येनं हजर राहणार आहेत. सकाळी ११ ते दुपारी २ वाजेपर्यंत कुसुमताई वानखेडे सभागृह, धरमपेठ, नागपूर येथे कार्यक्रम होणार आहे.

### शिक्षकाकडून स्पर्धा परीक्षा पुस्तके खरेदीसाठी १० हजारांची मदत

**सोयगाव :** जिल्हा परिषद शाळा फर्दापूर येथील शिक्षक राजेंद्र उत्तमराव सपकाळ यांनी सामाजिक बांधिलकी जपत वरखेडी (खुर्द) येथील जिल्हा परिषद शाळेतील गरजू व गरीब विद्यार्थ्यांसाठी स्पर्धा परीक्षांचे व शैक्षणिक क्रीडा साहित्य खरेदीसाठी १० हजार १ रुपये रोख मदत दिली आहे. या प्रसंगी फर्दापूर केंद्राचे केंद्रप्रमुख मोती जोहरे, पळासखेडा शाळेचे मुख्याध्यापक अनिल ठाकुर, अर्जुन पारधे, अतुल कळसकर, शालेय व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष संजय शिंदे तसेच पालक कैलाससिंग राजपूत आदी उपस्थित होते.

### ग्राहक जनजागरण अभियान संपन्न

**पैठण :** अखिल भारतीय ग्राहक पंचायत पैठण शाखेच्या वतीने श्रीनाथ कनिष्ठ महाविद्यालयात विद्यार्थी ग्राहक जनजागरण अभियानाची सुरुवात करण्यात आली. महाविद्यालयाच्या मुख्य दालनामध्ये स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून या अभियानाची सुरुवात करण्यात आली. ग्राहक पंचायतचे तालुका संघटक विष्णू ढवळे, माजी मुख्याध्यापक जालिंदर फलके यांनी ग्राहक कायदा व ग्राहक चळवळीचे महत्त्व विशद केले. या कार्यक्रमाला प्राचार्य शिवाजीराव पठाडे, विष्णू सोनार, प्रविण गोर्डे, शिवाजी जगताप, पंढरीनाथ फुलझळके, श्रीमती उषा जाधव, प्रा. कैलास शेळके, प्रा. रामदास सानप, प्रा. गणेश गिरजे, प्रा. देविदास पाटील, प्रा. विजय रोडे, प्रा. शिवशंकर गुरलेवाड, श्रीमती योगिता सुपेकर, प्रा. सुनंदा देशमुख, प्रा. बालाजी अनमूलवर, प्रा. बालाजी धनगरे, प्रा. कल्याण खरात आदी मान्यवर व विद्यार्थी उपस्थित होते.

### नवीन गाड्यांच्या आगमनाची निसानकडून घोषणा, ७ सीटर बी-एमपीव्ही ग्रॅव्हाइट येणार

**छत्रपती संभाजीनगर :** निसानची नवीन गेम-चेंजिंग सात-सीटर बी-एमपीव्ही ग्रॅव्हाइट या नावाने २०२६ च्या सुरुवातीला बाजारात उपलब्ध होईल. ब्रँडच्या भारतासाठी नवीन आणि धोरणात्मकरित्या तयार केलेल्या उत्पादन श्रेणीअंतर्गत आणले जाणारे हे पहिलेच उत्पादन आहे.आधुनिक भारतीय कुटुंबांसाठी उद्देशाने बनवलेली ग्रॅव्हाइट अपवादात्मक अद्वितीय प्रतिभा आणि बदल करता येण्याची क्षमता देते. ती किमतीबाबत जागरूक कुटुंबांसाठी सोयीची नव्याने व्याख्या करते आणि निसानच्या पुनरुज्जीवित उत्पादन पोर्टफोलिओच्या विस्ताराला गती देते.

### राजनाथ वर्माच्या भूमिकेत फारूख सईद

**छत्रपती संभाजीनगर :** सोनी सबवरील 'इत्ती सी खुशी' मालिकेतील दिवेकर कुटुंबाचे आनंद, संघर्ष आणि नातेसंबंध यांचे चित्रण पाहताना प्रेक्षक रंगून गेले आहेत. अन्विता (सुंबुल तौकीर खान) आणि संजय (ऋषी सक्सेना) यांच्या विवाहामुळे दिवेकरांच्या कुटुंबात मोठा बदल झाला आहे आणि आता मालिकेत आणखी एक वळण येणार आहे. कथानकात आणखी गहनता आणि तीव्रता आणण्यासाठी परिचित अभिनेता फारूख सईद विराट(रजत वर्मा) चे वडील राजनाथ वर्मा यांच्या दमदार आणि गूढ भूमिकेत दाखल होत आहे.

### टॉप २०० सेल्फ-मेड एंटरप्रेन्योर्स ऑफ द मिलेनिया 2025 ची तिसरी आवृत्ती प्रकाशित

**पुणे :** आयडीएफसी फर्स्ट प्रायव्हेट बँकिंग आणि हुरुन इंडियाने 'आयडीएफसी फर्स्ट प्रायव्हेट अँड हुरुन इंडियाज टॉप २०० सेल्फ-मेड एंटरप्रेन्योर्स ऑफ द मिलेनिया २०२५' ची तिसरी आवृत्ती सुरू केली, जी २००० नंतर स्थापन झालेल्या भारतातील २०० सर्वात मौल्यवान कंपन्यांची यादी आहे. या कंपन्यांना त्यांच्या मूल्यानुसार क्रमवारी लावली जाते, सूचीबद्ध कंपन्यांसाठी बाजार भांडवलीकरण आणि सूचीबद्ध नसलेल्या कंपन्यांसाठी मूल्यांकन म्हणून परिभाषित केले जाते. या यादीत येण्यासाठी कट-ऑफ तारीख २५ सप्टेंबर २०२५ होती.

### 'इत्ती सी खुशी' चे 100 भाग सादर झाल्याचा आनंदोत्सव साजरा केला

**छत्रपती संभाजीनगर :** संबद्ध कथानक आणि हृदयस्पर्शी भावनांचे चित्रण करणाऱ्या सोनी सबवरील 'इत्ती सी खुशी' मालिकेने प्रेक्षकांचे मन जिंकून घेतले आहे. ही अन्विता (सुंबुल तौकीर खान) या तरुणीची कहाणी आहे, जी आपल्या कुटुंबाचा भक्कम आधार आहे. तिच्या आयुष्याला एक वेगळे वळण मिळाले आहे, कारण तिला सोडून गेलेला विराट (रजत वर्मा) आता परतला आहे आणि आपल्याला दुसरी संधी मिळावी अशी त्याची मागणी आहे. अन्विता द्विधा मनःस्थितीत आहे. तिने संजय (ऋषी सक्सेना) सोबत पुढे जाण्याचे ठरवले आहे. पण संजयच्या मनातील छुपे हेतू कहाणीत नवी गुंतागुंत निर्माण करत आहेत.

### नवीन युगातील यश मिळवणाऱ्यांसाठी 'लिव्ह अप सक्सेस'

**नाशिक :** रॉयल ग्रीन व्हिस्की ''टेस्ट द सक्सेस'' या तत्वज्ञानापासून 'लिव्ह अप सक्सेस' या तत्वज्ञानाकडे वाटचाल करत आहे. भारतातील सर्वात वेगाने वाढणाऱ्या युवा-केंद्रित व्हिस्की ब्रँडपैकी एक असलेल्या रॉयल ग्रीन व्हिस्कीने ब्रँडचे नवीन धाडसी तत्वज्ञान लिव्ह अप सक्सेस सादर केले आहे. जुन्या ''टेस्ट द सक्सेस'' या तत्वज्ञानाच्या पलीकडे जाऊन, ही नवीन स्थिती जनरेशन झेड आणि मिलेनियल्सच्या बदलत्या दृष्टिकोनाचे प्रतिबिंबित करते. या पिढीसाठी, यश हे एक गंतव्यस्थान नाही तर दैनंदिन क्षणांची, छोट्या यशांची आणि वैयक्तिक कामगिरीची मालिका आहे.

### अभिनेता निर्भय वाधवा असुराच्या भूमिकेत दिसणार

**छत्रपती संभाजीनगर :** सोनी सबवरील 'गाथा शिव परिवार की - गणेश कार्तिकेय' या मालिकेच्या माध्यमातून शिव, पार्वती आणि त्यांची मुले गणेश आणि कार्तिकेय या समस्त शिव परिवाराच्या फारशा माहीत नसलेल्या कथा लोकांपर्यंत पोहोचत आहेत. प्रत्येक कथेनंतर या मालिकेचे आध्यात्मिक विश्र्व विस्तारत आहे. धर्म आणि अधर्मातील युद्ध, भावनांचा प्रवास आणि दैवी उद्देश यांची एकत्र गुंफलेली ही कथा आहे.

# 'कला संगम' चित्रकला स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद





**तभा वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर, दि.१९ :** महात्मा गांधी मिशनच्या ४३ व्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून एमजीएम स्कूल्सच्या वतीने 'कला संगम' या आंतरशालेय चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेमध्ये शहरातील विविध शाळांतील विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी होत स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

'कला संगम' या उपक्रमाचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांमधील सर्जनशीलता, कल्पनाशक्ती आणि सामाजिक जाणीव यांना कलात्मक माध्यमातून व्यासपीठ उपलब्ध करून देणे हा होता. चित्रकलेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी समाज, पर्यावरण, मानवता, संस्कृती आणि समकालीन विषयांवर आपले विचार प्रभावीपणे मांडले.

या आंतरशालेय चित्रकला स्पर्धेत शहर व परिसरातील तब्बल ४५ शाळांमधील सुमारे ११०० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. विविध वयोगटातील विद्यार्थ्यांनी रंग, रेषा आणि कल्पनांचा सुरेख संगम साधत आपल्या कलागुणांचे प्रभावी सादरीकरण केले. विद्यार्थ्यांच्या चित्रांमधून सामाजिक भान, संवेदनशीलता आणि सकारात्मक दृष्टिकोन स्पष्टपणे दिसून आला. स्पर्धेसाठी दिलेल्या विविध सामाजिक, राष्ट्रीय व पर्यावरणपूरक विषयांवर विद्यार्थ्यांनी आपल्या कल्पनाशक्तीचा सुंदर आविष्कार सादर केला.

स्पर्धेच्या आयोजनामुळे विद्यार्थ्यांना केवळ कलागुण सादर करण्याची संधी मिळाली नाही, तर आत्मविश्र्वास, अभिव्यक्ती स्वातंत्र्य आणि स्पर्धात्मकतेचीही अनुभूती मिळाली. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधण्यास मदत होते, असे मत उपस्थित शिक्षक व पालकांनी व्यक्त केले.

महात्मा गांधी मिशन ही संस्था स्थापनेपासूनच शिक्षणासोबतच कला, संस्कृती आणि मूल्याधिष्ठित उपक्रमांना प्रोत्साहन देत आहे. 'कला संगम'सारखे उपक्रम विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव देत त्यांना सृजनशील विचारांकडे प्रवृत्त करतात. स्पर्धेचे परीक्षण प्रा. स्वाती देशपांडे, प्रा. अभिजीत पाटील, प्रा. राजेश शहा सर, प्रा. उदय भोईर, प्रा. रविंद्र तोरवणे आदि अत्यंत अनुभवी व नामांकित कला क्षेत्रातील तज्ज्ञांनी केले.

हा उपक्रम एमजीएमचे सचिव अंकुशराव कदम, एमजीएम विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विलास सपकाळ आणि एमजीएम स्कूल्सच्या संचालिका डॉ. अपर्णा कक्कड यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आला होता.

स्पर्धेच्या यशस्वितेसाठी एमजीएम फर्स्ट स्टेप्स स्कूलच्या मुख्याध्यापिका मिता कपूर, प्रा.राजेश शाह, क्लोवर डेल स्कूलचे मुख्याध्यापक रितेश मेहता, उपमुख्याध्यापिका वर्षा पोतदार, एमजीएम संस्कार विद्यालयाचे मुख्याध्यापिका स्मिता कुलकर्णी, कला शिक्षक अंकुश समाधान, विशाल भुसारे आणि शाळेच्या सर्व शिक्षकांनी आपले योगदान दिले.

**स्पर्धेचा निकाल :** गट १ - प्रथम शौर्या वर्मा, द्वितीय - युसरा सय्यद, तृतीय -अद्वित बासरे. गट २- ओवी काकडे, द्वितीय - रेवा सुरांगलीकर, तृतीय -मनवा रुपडे. गट -३- प्रथम आर्या, वारे, द्वितीय-तनिष्क हजारे. गट -४- प्रथम -संकल्पा शिंदे, द्वितीय - शायल रत्नपारखी, तृतीय -वैष्णवी ताट. गट ५-प्रथम - अफान देशमुख, द्वितीय - समृद्धी गरड, तृतीय - तंजल देशपांडे या विद्यार्थ्यांनी स्पर्धेमध्ये पारितोषिके पटकवली. या विद्यार्थ्यांना बक्षिसे, स्मृतिचिन्ह, प्रमाणपत्र व रोख रक्कम देऊन सन्मानित करण्यात आले.

# मांजा वापरणाऱ्यांवर कारवाई



**महापालिका प्रशासनाने दिला मांजा वापरणाऱ्यांना इशारा**

**तभा वृत्तसेवा**

**अ.नगर , दि.१९ :** मकर संक्रांतीनिमित्त पतंग उडविताना प्रतिबंधित नायलॉन मांजाचा वापर करणाऱ्यांवर कडक कारवाई करण्यात येणार असल्याचा इशारा महापालिका आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी दिला आहे.

मुंबई उच्च न्यायालय खंडपीठ छत्रपती संभाजी नगर (औरंगाबाद) यांनी दिलेल्या निर्देशानुसार पतंगासाठी प्रतिबंधित नायलॉन मांजा वापरा संदर्भात जनजागृती करण्यासाठी महापालिका घनकचरा विभागामार्फत आयोजित मुख्य स्वच्छता निरीक्षक व स्वच्छता निरीक्षक यांच्या बैठकीमध्ये आयुक्त डांगे यांनी या सूचना दिल्या.

प्रतिबंधित नायलॉन मांजाच्या वापरामुळे पक्षी, प्राणी व मानवी जीवितास धोका निर्माण होतो. शरीरास गंभीर दुखापती होतात. तर अनेकदा मृत्यू देखील होतात. त्यामुळे अशा प्रकारचा प्रतिबंधित नायलॉन मांजा पतंगासाठी वापरू नये असे आवाहन आयुक्त डांगे यांनी यावेळी केले. याचबरोबर सामाजिक भान राखून नागरिकांनी देखील स्वयंप्रेरणेने अशा प्रकारच्या मांजाचा वापर टाळावा, प्लास्टिक पासून तयार करण्यात आलेले पतंग वापरू नयेत. असे आवाहन यावेळी आयुक्त डांगे यांनी केले.

प्रतिबंधित असलेला नायलॉन मांजा विक्री होत असल्याचे निदर्शनास आल्यास त्याची माहिती द्यावी. माहिती देणाराचे नाव गोपनीय ठेवण्यात येईल व संबंधित मांजा विक्रेत्यावर कारवाई करण्यात येईल. असे आवाहन आयुक्त तथा प्रशासकी यशवंत डांगे यांनी केले आहे.

या बैठकीस घनकचरा विभाग प्रमुख अशोक साबळे, हरियाली संस्थेचे सुरेश खामकर, हरिभूमी प्रतिष्ठानचे अभय ललवाणी, मुख्य स्वच्छता निरीक्षक परिक्षीत बिडकर, प्रशांत रामदिन, तुकाराम भांगरे तसेच सर्व स्वच्छता निरीक्षक उपस्थित होते.

# रक्तदान एक सोहळा : डॉ. विक्रांत जयस्वाल

**तभा वृत्तसेवा**

**बिडकीन दि १९ डिसेंबर :** आई वडिलांनी आपल्या मुलांना १८-१९ वर्षे पूर्ण झाल्यानंतर रक्तदानासाठी घेऊन जाणे आणि नंतर सांगणे की आता ही रक्तदानाची परंपरा तुम्हाला पण सुरू ठेवावी लागणार आहे. मला एका रक्तदान शिबिराच्या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून बोलविण्यात आले होते.

त्या कार्यक्रमात मला रक्तदानाच्या जनजागृती बद्दल काही बोलायचे होते. पण या कार्यक्रमाच्या आधी माझे आयोजकांशी बोलणे झाले आणि त्यांनी मला सांगितले की सर आम्ही जेव्हा पॅम्प्लेट वाटायला गेलो तेव्हा कळाले की लोक रक्तदान करण्याच्या नावाने घाबरतात. तर आपण याच्यासाठी काहीतरी बोला. हे ऐकल्यावर मी माझे मत लोकांसमोर मांडले. आणि याच्यावर मला खूप छान प्रतिक्रिया आणि दाद मिळाली.

मी वर्षातून दोनदा रक्तदान करतो. एक माझ्या आईच्या वाढदिवसाच्या दिवशी आणि एक माझ्या वाढदिवशी आणि जर याच्यातून काही चुकले तर गव्हर्नमेंट हॉस्पिटल किंवा ब्लड



डोनेशन सेंटर यांच्याशी कॉर्डीनेट करून रक्तदान करतो.ही सवय मला माझ्या वडिलांकडून लागली आहे.

मी जेव्हा एकोणीस वर्षांचा झालो तेव्हा माझे वडील मला स्वतः रक्तदानासाठी घेऊन गेले होते. आणि त्यावेळेस मला सांगण्यात आले होते की तुला आयुष्यभर रक्तदान करायचे आहे. यानंतर जेव्हा माझी लहान बहिण डॉक्टर तन्वी अठरा वर्षांची झाली तेव्हा माझे वडील तिला रक्तदानासाठी घेऊन गेले. तिचे वजन कमी पडल्यामुळे त्यावर्षी तिला रक्तदान करता आले नाही पण पुढच्या वर्षी प्रयत्न करून तिचे वजन वाढल्यावर तिने पुढच्या वर्षी रक्तदान केले. तो दिवस म्हणजे १३ मार्च २०१०. देवाचे दर्शन घेऊन आम्ही जिल्हा रुग्णालयात रक्तदानासाठी गेलो.

आम्ही चौघे मी, माझे आई-बाबा आणि माझी बहीण सोबत रक्तदानासाठी जायचो. रक्तदान ही समाज सेवा असून ते आपले समाजासाठी कर्तव्य सुद्धा आहे आणि आपण ते पार पाडले पाहिजे. ब्लड डोनेशन बॅटन शुड बी पास टू द नेक्स्ट जनरेशन या दृष्टिकोनातून आपण आपल्या समाजातील रक्तदानाबद्दलची भीती दूर करू शकतो.

मी माझे मत लोकांसमोर मांडले आणि यांच्यावर मला खूप छान प्रतिक्रिया आणि दाद मिळाल्याचे डॉ. विक्रांत जयस्वाल यांनी दै 'तरुण भारत'च्या प्रतिनिधीशी बोलतांना सांगितले.

# जरंडी येथे 'निमिया मुक्त गाव' मोहीम

**तभा वृत्तसेवा,**

**सोयगाव, दि.१९ डिसेंबर :** मुख्यमंत्री समृद्धपंचायतराज अभियानांतर्गत ग्रामपंचायत जरंडी (ता.सोयगाव)येथे गुरुवारी (दि.१८) 'निमिया मुक्त गाव' ही महत्त्वाची आरोग्य जनजागृती मोहीम राबविण्यात आली. गावातील महिला वर्ग,तसेच सर्वसामान्य नागरिकांमध्ये निमिया या आजाराबाबत जागरूकता निर्माण करणे व प्रतिबंधात्मक उपाययोजनांची माहिती देणे हा या मोहिमेचा मुख्य उद्देश होता.

या शिबिरात डॉ.सचिन पवार यांनी उपस्थितांना सविस्तर मार्गदर्शन केले.निमिया म्हणजे काय,त्याची कारणे, लक्षणे तसेच योग्य आहार व जीवनशैलीतून या आजारापासून कसे मुक्त राहता येईल, याबाबत त्यांनी माहिती दिली.

विशेषतः महिलांमध्ये व किशोरवयीन मुलींमध्ये निमियाचे प्रमाण अधिक असल्याने आयर्नयुक्त आहार, हिरव्या पालेभाज्या, डाळी, फळे व आवश्यक पूरक औषधांचे महत्त्व त्यांनी स्पष्ट केले. या आरोग्य शिबिरात इतर आजारांचे प्राथमिक निदान कसे करता येईल. वेळेवर तपासणी व उपचार का गरजेचे आहेत, याविषयीही माहिती देण्यात आली.

शिबिरात डॉ.दिपक पाटणी,डॉ.सचिन पवार यांच्यासह सरपंच स्वाती पाटील, उपसरपंच संजय पाटील, सदस्य वंदनाताई पाटील, दिलीप पाटील, मधुकर पाटील, ग्रामपंचायत अधिकारी सुनील मंगरुळे, आरोग्य कर्मचारी उपस्थित होते.आरोग्य विभागाच्या चमुने नागरिकांच्या आरोग्य तपासण्या करून आवश्यक त्या सूचना दिल्या.

निमिया मुक्त गाव मार्गदर्शन शिबिर यशस्वीपणे पार पडले.या कार्यक्रमास ग्रामपंचायत अधिकारी सुनिल मंगरुळे, संतोष पाटील, सतिष बाविस्कर, भास्कर निकम्, अंबु राठोड, सर्व कर्मचारी व सर्व पदाधिकारी यांनी बहुसंख्येने उपस्थिती दर्शविली.तसेच गावातील महिला व नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवून रोगनिदान शिबिराचा लाभ घेतला.महिलांनी निमियामुक्त राहण्यासाठी आवश्यक संदेश आत्मसात केल्याने या मोहिमेला चांगला प्रतिसाद मिळाला.

# एमजीएमचा ४३ वा वर्धापन दिन सोहळा आज होणार





**तभा वृत्तसेवा,**

**छत्रपती संभाजीनगर, दि.१९ :** महात्मा गांधी मिशनचा (एमजीएम) ४३ वा वर्धापन दिन सोहळा शनिवार, दिनांक २० डिसेंबर २०२५ रोजी सायंकाळी ५ वाजता ज्ञानपीठ पुरस्कार विजेते तथा प्रख्यात साहित्यिक आणि विचारवंत दामोदर मावजो यांच्या प्रमुख उपस्थितीत एमजीएम क्रिकेट स्टेडियम, एन - ६, सिडको येथे आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमास जन स्मॉल फायनान्स बँकेचे व्यवस्थापकीय संचालक तथा जेएनईसीचे माजी विद्यार्थी अजय कंवल हे विशेष अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत.

महात्मा गांधी मिशनच्या ४३ व्या वर्धापन दिनानिमित्त यावर्षी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून शनिवारी दुपारी ४ ते सायंकाळी ७ वाजेदरम्यान एमजीएम स्टेडियमवर महात्मा गांधी मिशन वर्धापन दिन सोहळा आणि 'आओ उजाला करें' हे कार्यक्रम होणार आहेत.

या वर्धापन दिन सोहळ्यास महात्मा गांधी मिशनचे अध्यक्ष कमलकिशोर कदम, उपाध्यक्ष डॉ.पी.एम.जाधव, सचिव अंकुशराव कदम, विश्र्वस्त डॉ.सुधीर कदम, डॉ.नितीन कदम, उज्वल कदम, डॉ.अमरदीप कदम, एमजीएम विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.विलास सपकाळ, एमजीएम आयएचएसचे कुलगुरू डॉ.शशांक दळवी तसेच संस्थेचे विविध पदाधिकारी उपस्थित असणार आहेत.

एमजीएम गेल्या ४ दशकांपासून शिक्षण, सेवा आणि संशोधन क्षेत्रात आपले योगदान देत आहे. नांदेड जिल्ह्यातील 'निळा' या गावी गरीब, दुर्बल घटकांना आरोग्य सेवा देण्यासाठी वर्ष १९८२ मध्ये आरोग्य केंद्र सुरू केले. २० डिसेंबर १९८२ ला महात्मा गांधी मिशन म्हणजेच एमजीएम या संस्थेची खऱ्या अर्थाने मुहूर्तमेढ रोवली गेली. संस्थेच्या छत्रपती संभाजीनगर, गांधेली, नांदेड, मुंबई, परभणी आणि नोयडा या ठिकाणी असलेल्या विविध शैक्षणिक संकुलांमधून आजपर्यंत हजारो विद्यार्थी शिक्षण घेऊन बाहेर पडले आहेत. विद्यार्थ्यांना दर्जात्मक शिक्षण देत असताना आज एमजीएमने आपले राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर नावलौकिक प्राप्त केले आहे.

# एमजीएममध्ये शिल्पकला महोत्सवाचे उद्घाटन

**तभा वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर, दि.१९ :** महात्मा गांधी मिशनच्या ४३ व्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून लिओनार्दो द विंची स्कूल



ऑफ डिझाईन (एलएसओडी) च्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या पाच दिवसीय शिल्पकला महोत्सवाचे चिंतन गाह येथे मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत उद्घाटन संपन्न झाले.

या उद्घाटन सोहळ्यास विद्यापीठाचे कुलपती अंकुशराव कदम, कुलगुरू डॉ. विलास सपकाळ, संचालिका शुभा महाजन, सर्व अधिष्ठाता, संचालक, प्राचार्य, विभागप्रमुख, प्राध्यापक, विद्यार्थी व सर्व संबंधित मान्यवर उपस्थित होते.

यावेळी बोलताना कुलपती अंकुशराव कदम म्हणाले, या भागामध्ये शिल्पकारांनी असंख्य शिल्पे निर्माण केली. या निर्मितीमध्ये त्यांच्या अनेक पिढ्यांनी काम केले मात्र, त्यांनी कधीही त्यावर नामोल्लेख केलेला नाही. ही बाब आपल्या सर्वांसाठी आदर्श अशी आहे. अशा शिल्पकला महोत्सवाच्या माध्यमातून कलाकारांना ऊर्जितावस्था येणे आवश्यक आहे. यावर्षीही आपण अनेक वेगवेगळ्या कार्यक्रमांचे आयोजन केलेले आहे. या शिल्पकलेच्या माध्यमातून हे शिल्पकार जी कलाकृती बनवतील ती आपल्याला या महोत्सवाच्या समारोप समारंभात पाहण्यास मिळणार असल्याचे कुलगुरू डॉ. विलास सपकाळ यांनी यावेळी सांगितले.

या महोत्सवात साक्षी कदम, परशुराम चव्हाण, यश चाहूलकर, केतन खुटले, कलाश्री विभूते आदि शिल्पकार सहभागी झाले आहेत. कुलगुरू प्रा. विलास सपकाळ यांचे वाढदिवसानिमित्त यावेळी अभिष्टचिंतन करण्यात आले. स्कूल ऑफ फिल्म आर्टचे प्रमुख डॉ. शिवदर्शन कदम यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

हा शिल्पकला महोत्सव १८ ते २२ डिसेंबर २०२५ दरम्यान विद्यापीठाच्या एलएसओडी परिसरात सकाळी ९:३० ते ५ या वेळेमध्ये सुरू असणार आहे.

# संपादकीय

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## अग्रलेख...

# असे 'माणिक' नकोच!

संस्कार, चारित्र्य, प्रतिमा, प्रतिष्ठा आदी शब्दांना आपल्या आचारासोबत जोडणे तर दूरच; असे विचारदेखील ज्यांच्या मनात येत नसावेत, असे काही नेते लोकप्रतिनिधी म्हणून विधिमंडळात दाखल होतात, हे लोकशाहीचे दुर्दैवच म्हटले पाहिजे. असे लोक आपल्या दुराचारातून आपल्या संस्कारहीनतेचे दर्शन घडवितात आणि आपल्या प्रतिमेचा व प्रतिष्ठेचा आपल्या व्यवहारांशी काहीही संबंध नसावा इतक्या बेफिकिरीने स्वतःचेच वाभाडे काढून घेत स्वहस्ते प्रतिमाभंजन करून घेतात. अशा व्यक्तीस लोकप्रतिनिधी म्हणणे त्यांच्या मतदारांस किती अवघड होत असेल, याची कल्पनादेखील करता येत नाही. वस्तुतः अशा व्यक्तींना नेता ही बिरूदावली कशी प्राप्त होते, हेदेखील एक कोडेच असते. जी व्यक्ती जेव्हा जनतेच्या पसंतीस पात्र ठरते, जनता त्याचे नेतृत्व मान्य करून त्यास स्वीकारते, तेव्हा त्यास नेता म्हणणे अधिक योग्य असते. अलिकडे ही प्रक्रिया उलट्या दिशेने सुरू झालेली दिसते. एखादा राजकीय पक्ष आपल्याच तंबूतील एखाद्या चेहऱ्यावर नेता म्हणून मुखवटा चढवतो, नेता नावाचे पद देऊन कुठे तरी त्याची नियुक्ती करतो आणि ती व्यक्तीदेखील नेता म्हणून मिरवत स्वतःचे नेतेपद समाजाच्या माथी मारते, हा प्रकार राजकारणात रूढच झाला आहे. असे अनेक पक्षनियुक्त नेते राज्यात जनतेचा नेता म्हणून वावरतात आणि जनताही त्यांना नाईलाजाने स्वीकारून त्यांच्या नेतेगिरीवर चढविलेली लोकप्रतिनिधित्वाची झूल सहन करीत असते, असेच चित्र राजरोस पाहावयास मिळते. महाराष्ट्राच्या क्रीडामंत्री पदावरून बाहेरचा रस्ता दाखविले गेलेल्या आणि आपल्या कर्तबगारीशून्य कारकीर्दीमुळे सध्या गाजत असलेल्या माणिकराव कोकाटे नावाच्या मंत्रिमहोदयांना विधिमंडळात पाठविणाऱ्या मतदारांनाही सध्या स्वतःच्या निर्णयाची खंत वाटत असेल. संधी मिळेल तेथून उमेदवारी मिळवून विधिमंडळात स्वतःचा शिरकाव करून घेण्याच्या निव्वळ राजकारणी स्वार्थापलीकडे ज्याचे काहीही उल्लेखनीय कर्तृत्व नाही, असे हे कोकाटे नावाचे 'माणिक' सातत्याने लोकप्रतिनिधी म्हणून निवडताना त्यांच्या कोणत्या कर्तबगारीस मतदारांनी पसंतीची पावती दिली, हा प्रश्नच आहे. नाशिक जिल्ह्याच्या सिन्नर तालुक्यातील एका गावात जन्मलेली, कोणताही राजकीय वारसा नसलेली एक व्यक्ती विद्यार्थी संघटनेच्या माध्यमातून काँग्रेसशी जोडली जाते आणि निव्वळ निवडणुकीतील उमेदवारीवर डोळा ठेवून पक्षकार्याचा कांगावा करीत राजकारणात बस्तान बसविते. निवडणूक लढविण्याचे स्वप्न काँग्रेसकडून पूर्ण होण्याची शक्यता नाही, असे दिसताच राष्ट्रवादी काँग्रेसचा झेंडा हाती घेऊन शरद पवारांशी संधान साधते; पण तेथेही उमेदवारी नाकारली गेल्याने शिवसेनेत उडी मारून सिन्नर विधानसभेची उमेदवारी मिळवून विधानसभेत दाखल होते. स्वार्थी पक्षांतरे आणि सातत्यपूर्ण 'गयाराम'गिरी एवढाच इतिहास असूनही या मतदारसंघात मतदारांचा कौल मिळवून विधानसभेत पदार्पण केलेल्या कोकाटेंनी दुसऱ्यांदाही शिवसेनेकडून आमदारकी उपभोगली. नंतर नारायण राणे यांचे बोट धरून पुन्हा काँग्रेस प्रवेश करीत आणि स्वगृही परतल्याचा कांगावा करीत उमेदवारी मिळवून तिसऱ्यांदा विधानसभा गाठली आणि चौथ्या वेळी आमदारकीसाठी भाजपाच्या तंबूत दाखल होऊन पराभव झाल्याने पाचवी निवडणूक राष्ट्रवादीच्या चिन्हानिशी लढविली. पुढे अजित पवारांच्या गटाचा आश्रय घेऊन महायुती सरकारात मंत्रिपदही मिळविले आणि आमदारकीच्या प्रदीर्घ काळात 'घर घोटाळ्या' व्यतिरिक्त फारसे काही कर्तृत्व न नोंदविताही केवळ वादग्रस्त व बेमुर्वत वक्तव्यांतून सतत चर्चेत राहिले. पक्षांतराचे इमले चढवत सत्तेची ऊब उपभोगणे एवढेच माणिकराव कोकाटे यांचे एकूण कर्तृत्व लक्षात घेतले, तर त्यांना निवडून देणाऱ्या मतदारांनी आणि त्यांना थेट मंत्रिमंडळात दाखल करून घेणाऱ्यांनाही यापुढे अशांवर नेतेपदाची झूल चढवताना आणि मंत्रिपदे बहाल करताना वारंवार विचार करावा, हेच योग्य ठरेल. कोकाटे यांनी आपल्या पूर्वेतिहासातून सत्ताधीश आणि मतदारांनाही दिलेला हा एकमेव चांगला संदेश ठरणार आहे.

आर्य चाणक्य हा राजनीतीचा दीपस्तंभ मानला जातो. आदर्श राजकारण कसे करावे यासाठी चाणक्यनीतीचे मार्गदर्शन घेतले जाते. याच चाणक्यनीतीच्या १६ व्या अध्यायातील एक सुभाषित माणिकराव कोकाटे नावाच्या या मंत्र्याबाबत चपखल वापरता येईल. माणिक हे मौल्यवान असते हे खरेच; पण त्याला आपले मोल मिरविण्यासाठीही सोन्याच्या कोंदणाची गरज असते. अशा अर्थाचे हे सुभाषित म्हणजे माणिकराव कोकाटेंच्या राजकीय कारकीर्दीचे नेमके वर्णन म्हणावे लागेल. माणिक नावाचे हे राजकीय रत्न आपल्या गुणांमुळे नव्हे, तर ज्यांच्या आश्रयाने राजकारणातील आपले मोल प्रस्थापित करीत गेले, त्या सोन्यालाही आता लाजेने काळवंडल्यासारखे वाटेल, असा इतिहास त्यांनी आपल्या कुकर्तृत्वाने निर्माण केला आहे. विधिमंडळाचे कामकाज सुरू असताना माणिकराव कोकाटे नावाची मंत्रिपदावरीलही जबाबदार व्यक्ती मान खाली घालून गुपचूप मोबाईलवर रमीचा डाव खेळते, मंत्री या नात्याने ज्या सरकारचे प्रतिनिधित्व करते, त्याच सरकारची भिकारी म्हणून संभावना करते आणि ज्या शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी काम करण्याची जबाबदारी मंत्री या नात्याने शपथपूर्वक स्वीकारलेली असते, त्याच शेतकऱ्यांना, ढेकळांचे पंचनामे करू का, असा बेमुर्वत सवाल करून आपल्या सत्तेचा माज दाखवून देते. विधिमंडळाच्या सभागृहात रमीचा डाव खेळून सरकारची बेअब्रू केल्यानंतरही खेळाशी संबंधित असलेल्या खात्याचे मंत्रिपद भूषवून पुन्हा सत्तेच्या सान्निध्यात राहण्याचा विक्रम करते, अशा या माणिकरावांच्या दुष्कृत्यांचे घडे अखेरीस भरले. गरीब असल्याचे भासवून बनावट कागदपत्रांच्या आधारे सरकारी कोट्यातून घरे लाटणे हा गुन्हा या कोकाटेंनी केला आहे, यात आता कोणताही संशय राहिलेला नाही. असे भ्रष्ट व्यवहार करून स्वतःच्या कलंकित चारित्र्याचे स्पष्ट पुरावे देणाऱ्या व आपल्या प्रतिमेबरोबरच सत्ताधाऱ्यांच्या प्रतिमेलाही काळे फासणाऱ्या नेत्याला पाठीशी घालण्याचे सारे प्रयत्न फोल ठरणार, हे आधीच स्पष्ट होते. तरीही त्यांचा राजीनामा ताबडतोब म्हणावा असा घेतला गेला नाही. अखेर त्यांची हकालपट्टी झाली हे चांगलेच झाले. कोकाटेंना मंत्रिपदाच्या केबिनमधून इस्पितळमार्गे अखेरीस कोठडी गाठावीच लागणार, हे स्पष्ट झाल्यानंतर त्यांची हकालपट्टी करणे त्यांच्या पाठीराख्यांना अखेर भाग पडले. सरकारी कोट्यातील सदनिका हडपण्यासाठी केलेली बनावटगिरी उघड झाल्याने न्यायालयाने कोकाटे यांना दोषी ठरवून दोन वर्षांची शिक्षा दिली असल्याने आपोआप त्यांची आमदारकी रद्द होणार आहेच; त्यानंतरही त्यांना मंत्रिमंडळात कायम ठेवल्यास सरकारची बेअब्रू झाली असती. मुख्यमंत्र्यांनी सरकारची प्रतिमा राखून पाऊल उचलले हे छानच झाले. याआधी तुरुंगातूनही खात्याचा कारभार हाकणारा नवाब मलिक नावाचा मंत्री महाविकास आघाडीच्या काळात महाराष्ट्राने पाहिला, तेव्हा राज्याची प्रतिष्ठा खुंटीवर टांगली गेली होती. बीड जिल्ह्यातील संतोष देशमुख हत्येप्रकरणी आरोप होऊ लागल्यावर धनंजय मुंडे यांना मंत्रिपदाचा राजीनामा देणे भाग पडले होते. कोकाटे यांची खाती काढून घेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या माणिकाभोवती असलेले सोन्याचे कोंदण दूर केले आहे. आता त्याला त्याचे कोणतेच मोल उरलेले नाही. मंत्रिपदाच्या आलिशान केबिनकडून कारागृहातील कोठडीपर्यंतचा प्रवासही आता जवळपास निश्चित झाला आहे. गुन्हा उघडकीस येऊ लागल्यानंतर प्रकृती अस्वास्थ्याचा कांगावा करीत इस्पितळे गाठण्याचा एक राजमार्ग याआधीही काही नेत्यांनी अवलंबिलेला होता. कोकाटेंचा प्रवासही तसाच दिसतो आहे. इस्पितळांतील खर्च कोण करणार हा प्रश्न विचारतानाच, दोष सिद्ध झाल्यावरही अशा लोकांवर सार्वजनिक पैशातून खर्च करावा काय, याचा विचार करायला हवाच. दुसरे म्हणजे, हे माणिक आता मंत्रिमंडळातून आणि विधिमंडळातूनही बाहेर गेल्यानंतर ती जागा भरून काढण्यासाठी नवे रत्न निवडावे लागेल. त्यालाही अशाच प्रकारचा काही इतिहास नाही ना, हे तपासण्याची काळजीही सरकारला घ्यावी लागेल. कारण एखाद्या व्यक्तीच्या चारित्र्यहीनतेमुळे आणि प्रतिमाशून्यतेमुळे सरकारच्या प्रतिमेवर डाग लागणे शोभादायक नाही. त्यामुळे पुढचे 'माणिक' निवडताना सत्ताधाऱ्यांनी काळजी घेणे केव्हाही श्रेयस्कर. असे 'माणिक' नकोच, अशी खूणगाठ बांधायची ती त्यासाठीच.


## विशेष

**अशोक टंडन**

# युगपुरुषाचा आठव

**माजी पंतप्रधान स्व. अटलबिहारी वाजपेयी यांचे माध्यम सल्लागार राहिलेले अशोक टंडन यांनी लिहिलेल्या 'अटल संस्मरण' या पुस्तकाचे विमोचन केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते दिल्ली येथे नुकतेच झाले. त्यानिमित्त टंडन यांनी केलेल्या नोंदींचे हे अंश...**

अटलबिहारी वाजपेयी २७ ऑगस्ट २००० रोजी पंतप्रधान म्हणून पहिल्यांदा राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या नागपूर येथील मुख्यालयात गेले होते. ग्वाल्हेरमध्ये १९३९ मध्ये ज्यांनी त्यांना स्वयंसेवक बनवले, असे संघप्रचारक नारायणराव तरटे यांची त्यांनी तेव्हा भेट घेतली होती. अटलबिहारी वाजपेयी यांना माजी पंतप्रधान, कवी आणि राजकारणी म्हणून सर्वजण ओळखतात, पण त्यांचे आत्मिक आणि वैचारिक नाते संघापासूनच सुरू झाले होते. कॉलेजमध्ये असतानापासून त्यांनी संघाच्या शाखेत जायला सुरुवात केली होती आणि तेथूनच त्यांच्या राजकीय आणि सामाजिक जाणिवेचा आरंभ झाला होता. अटलजी आणि संघ यांचे नाते संघटनात्मक असण्याखेरीज सखोल वैचारिक, सांस्कृतिक आणि भावनात्मक अशा स्वरूपाचे होते. अटलजी अनेकदा म्हणायचे की, संघाने मला देश आणि समाजासाठी जगायला शिकवले.



संघाच्या विचारांनी, शिस्तीने आणि राष्ट्रवादाने ते अत्यंत प्रभावित होते. १९५१ मध्ये भारतीय जनसंघाची स्थापना झाली तेव्हा संघाने अटलजींना राजकीय मंचावर संघटनेचा चेहरा बनण्यास सहकार्य केले. त्यावेळी संघाचे दुसरे सरसंघचालक श्रीगुरुजी गोळवलकर होते. श्रीगुरुजी हे विचारवंत, तपस्वी आणि दूरदर्शी नेते मानले जात होते. श्रीगुरुजींच्या व्याख्यानांनी आणि विचारधारेने प्रभावित झालेल्या पिढीतील स्वयंसेवकांमध्ये अटलजींचा समावेश होतो. त्यांनी गुरुजींच्या वाणीतून, जीवनशैलीतून आणि राष्ट्रभक्तीतून प्रेरणा घेतली आणि ती आपल्या राजकीय जीवनात आत्मसात केली. अटलजींनी स्वतः कबूल केले होते की, श्रीगुरुजी हे त्यांच्या वैचारिक संस्कारांचे मूलाधार आहेत.

संघाच्या ज्या स्वयंसेवकांनी पुढे राजकारणात प्रवेश केला, त्यांत अटलजी सर्वांत प्रतिभावान मानले जात होते. श्रीगुरुजींनाही हे स्पष्टपणे माहीत होते. अटलजी आणि श्रीगुरुजी यांच्यातील संबंध मार्गदर्शक-शिष्य या भावाने जोडलेला होता. अटलजी हे श्रीगुरुजींना द्रष्टा, संघ-परंपरेतील ऋषी आणि एक प्रेरणा-पुरुष म्हणून पाहत असत.

१९७३ मध्ये जेव्हा श्रीगुरुजींचे निधन झाले, तेव्हा अटलजींनी त्यांना अत्यंत भावपूर्ण शब्दांत श्रद्धांजली वाहिली होती. ते म्हणाले होते, 'गुरुजी केवळ एका संघटनेचे प्रमुख नव्हते, ते एका विचारधारेचे वाहक, एक युगद्रष्टा आणि एक तपस्वी कर्मयोगी होते. त्यांनी भारतमातेची सेवा हेच जीवनाचे एकमेव उद्दिष्ट बनविले होते.' त्यानंतरच्या सरसंघचालकांशीदेखील अटलजींनी अतिशय आत्मीय असे संबंध ठेवले आणि संघाच्या संस्काराचे स्मरण आयुष्यभर ठेवत देशकार्याला वाहून घेतले.

**अटलजींचा वारसा**

युगपुरुष भारतरत्न अटलबिहारी वाजपेयींची ९३ वर्षांची जीवनलीला १६ ऑगस्ट २०१८ रोजी समाप्त झाली आणि भारताच्या राजकीय क्षितिजावरील अद्वितीय नक्षत्र लुप्त झाले. युगपुरुष अटलजी देशाच्या राजकारणात एक अशी पोकळी सोडून गेले, जी कधीही भरून काढता येणार नाही.

परंतु, अटलजींची विचारशैली ध्रुवतारा बनून विद्यमान आहे. आपणा सर्वांना प्रेरणा देत आहे आणि पुढेही देत राहील. अटलजींनी आपले आदर्श, ओजस्वी वाणी, साहित्यिक वारसा आणि व्यवहारकुशलतेने जवळपास पाच पिढ्यांना प्रेरित केले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली अमित शाह, राजनाथ सिंह आणि अन्य अनेक नेत्यांनी अटलजींच्या अंतिम यात्रेत अनेक किलोमीटर पायी चालून आपल्या दिवंगत नेत्याला श्रद्धांजली वाहिली होती आणि जगाला संदेश दिला होता की, अटलजींचे विचार अमर आहेत.


नवी दिल्ली

## वेध

**अनिल उमाकांत फेकरीकर**

# लहानांच्या हाती वाहन देऊ नका!

मोटार वाहन कायद्यात दुचाकी-चारचाकी चालविण्याचे वय ठरविण्यात आले आहे. तरीही अनेक आई-वडील प्रेमापोटी मुलांच्या हाती वाहन देत संकट ओढवून घेतात. अनेकदा मुलेच पालकांची नजर चुकवून वाहन नेतात. पुढे काय होणार, याचे त्यांना भानही नसते. नागपुरात असाच प्रकार घडला आणि मुलाने केलेल्या कृतीचा भुर्दंड वडिलांना बसला. मुलाने वाहन कायद्याचा भंग केल्याबद्दल पित्याला ३० हजार रुपयांचा दंड भरावा लागला. ही घटना सोनेगाव पोलिस स्टेशन अंतर्गत २६ नोव्हेंबर २०२५ रोजी घडली. यातील पिता पोलिसी कारवाईच्या विरोधात न्यायालयात गेला. पण न्यायाधीशांनी पोलिसांची बाजू योग्य असल्याचा निर्वाळा देत पित्याला दंड भरण्याचा आदेश दिला. अखेर हतबल पित्याने पश्चात्ताप व्यक्त करीत ३० हजारांनी खिसा रिकामा करवून घेतला. दंड भरताना वडिलांना मुलाचा राग आला असेल, पण त्या पित्याला पैसे भरावे लागले. अशी वेळ इतर पित्यांवर येऊ नये म्हणून आजच सावध व्हा आणि लहान मुलांच्या हाती चारचाकी, दुचाकी वाहने देऊ नका. त्यांना कायद्यात राहण्याचे फायदे समजावून सांगा. प्रत्येक ठिकाणी कायदा मोडण्याची गरज नसते. आई-वडिलांनी कायदा मोडून मुलांना आपल्याच लोकांविरोधात क्रांतिकारी बनवायची गरज नाही. तो चांगला संस्कारी नागरिक झाला तरी आपले जीवन सार्थकी लागले, याचे समाधान आई-वडिलांनी मानायला हवे. बहुतांश कुटुंबांत वडील कामानिमित्त नेहमीच बाहेर असतात. यामुळे घरात मातृशक्तीचा जागर असतो. समजा मातृशक्तीने आपल्या मुला-मुलींना दररोज घरातून बाहेर पडताना मोटार वाहन कायद्याची माहिती दिली तर नक्कीच आपण अपघातमुक्त शहर तयार करू शकतो. एवढेच नव्हे तर अल्पवयीन मुलेही वाहन नेण्यापूर्वी दहा वेळा विचार करतील. परिणामी कटु प्रसंग संबंधित कुटुंबांवर ओढवणार नाहीत. असाच लोकहितवादी प्रयोग रोडमार्क फाऊंडेशनचे अध्यक्ष राजू वाघ यांनी नागपुरात 'मातृशक्तीचा जागर अपघातमुक्त भारताची वाटचाल' हा उपक्रम सुरू करून केला आहे. ते म्हणतात, जेव्हा आई-वडील मुलांना संस्कार देतात, तेव्हाच त्यांनी वाहन नेमके कुठल्या वयात हाती घ्यायला हवे, हेदेखील समजावून सांगायला हवे. प्रत्येक घरात आईचे महत्त्व आहे. आईचा शब्द शेवटचा मानला जातो. समजा त्या मातृशक्तीने पुढाकार घेत लहान मुलांच्या हाती वाहन द्यायचे नाही, असा नियम अमलात आणल्यास कुठल्याही वडिलांवर दंड भरण्याची नामुष्की ओढवणार नाही. वस्तुतः लहान मुलांनी अर्जुनाप्रमाणे आपल्या ध्येयावर लक्ष द्यायला हवे. जेव्हा मुले समाजहितकारक कार्य करण्याची मनीषा ठेवतील, तेव्हाच त्यांच्या जीवनात प्रगतीचा चमत्कार घडेल. 'मन वढाय वढाय, उभ्या पिकातलं ढोर। किती हाकला हाकला, फिरी येतं पिकांवर।। मन मोकाट मोकाट, त्याले ठायी ठायी वाटा। जशा वाऱ्यानं चालल्या, पानावरच्या लाटा।।' ही बहिणाबाई चौधरी यांची कविता मनाचा ठाव घेणारी आहे. लहान मुलांचे मन असेच असते. त्यांच्या हाती वाहन आल्यावर त्यांच्या कानात वारा घुसतो अन् ते बेभान होतात. आपण वायुवेगाने गेल्याने एखाद्या निष्पाप व्यक्तीचा प्राण जाईल, तो कायमस्वरूपी जायबंदी होईल याची त्यांना भीती वाटत नाही. ते थरार म्हणून वाहन वेगाने चालवितात. नंतर जे नको घडायचे ते घडते अन् सारा मामला पोलिस ठाण्यापर्यंत येऊन पोहोचतो. तिथे दोषीचे कुटुंबीय गयावया करतात. पण वेगाने वाहन चालविणे म्हणजे चंद्रावर जाण्यासारखे नाही. मात्र वयाप्रमाणे मुला-मुलींच्या मनात वेगळा थरार करण्याचा बेत असतो. परंतु मी म्हणतो, मुला-मुलींना थरारच करायचा असेल तर तो अभ्यासात करावा. आसपास राहणाऱ्या लोकांना मदत करून केल्यास उत्तमच होईल. जेव्हा तुमची मुले अशी कृती करतील, तेव्हा तुम्हाला त्यांचा अभिमान वाटेल. पित्याची ५६ इंची छाती अभिमानाने फुगेल आणि मी या मुलाचे वडील, असे ते जगाला निक्षून सांगतील. तो दिवस आपल्याही आयुष्यात यावा असे ज्यांना वाटते, त्यांनी आजपासून लहान मुलांच्या हाती वाहन देणार नाही, असा संकल्प सोडून तशी कृती करावी. अन्यथा, केशाने केले नाऱ्याला ताप यासाठी तयार राहा.



९८८१७१७८५९

## दखल

**मोरेश्वर बडगे**

# कोण होणार मुंबईचा 'धुरंदर?'

महापालिका निवडणुकांचं बिगुल वाजलं आहे. १५ जानेवारीला मतदान आहे आणि त्याच्या दुसऱ्या दिवशी मतमोजणी होऊन निकाल लागतील. २३ डिसेंबरला उमेदवारी अर्ज भरायला सुरुवात होईल. ३० डिसेंबरपर्यंत ते चालेल. उमेदवारी अर्ज मागे घेण्याची मुदत २ जानेवारी आहे. म्हणजे २ जानेवारीला निवडणुकीचे चित्र स्पष्ट होईल. महायुती विरुद्ध ठाकरे बंधू अशी ही लढाई आहे. काँग्रेस स्वबळावर लढते आहे. एकूण २९ महापालिकांच्या निवडणुका आहेत. पण खरी चुरस मुंबई महापालिकेसाठी आहे. मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी आहे. मुंबई महापालिकेचा अर्थसंकल्प ५० हजार कोटी रुपयांपेक्षा मोठा आहे. कुठल्याही राज्याच्या अर्थसंकल्पापेक्षा हा आकडा मोठा आहे. दिल्लीपेक्षा मोठा आहे. त्याशिवाय दरवर्षी केंद्र सरकारकडून विविध योजनांसाठी मिळणारे अनुदान वेगळे. एकूण वर्षाला दीड लाख कोटी रुपयाचे अर्थकारण आहे. मुंबईला सोन्याची कोंबडी म्हणतात ती उगाच नव्हे. सोन्याच्या कोंबडीची ही महापालिका गेली २५ वर्षे शिवसेनेच्या म्हणजे ठाकरे कुटुंबाच्या ताब्यात होती. यावेळी प्रथमच तिच्यापुढे भाजपाचे मोठे आव्हान उभे ठाकले आहे. उद्धव ठाकरे यांच्यासाठी ही अस्तित्वाची लढाई आहे. २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत भाजपाशी गद्दारी करून उद्धव शरद पवार यांच्या मांडीवर जाऊन बसले. त्या बदल्यात त्यांनी अडीच वर्षांचे मुख्यमंत्रिपद जरूर मिळविले. पण त्याच्या बदल्यात सर्वस्व गमावले. सरकार गेले, पक्ष गेला, निवडणूक चिन्ह गेले. उद्धव एकदम रिकामे झाले आहेत. वर्षभरापूर्वीच्या विधानसभा निवडणुकीत उद्धव यांच्या शिवसेनेनं मार खाल्ला. फक्त २० आमदार निवडून आले. त्यातले १० मुंबईतले आहे. सारे पत्ते उलटे पडले आहेत. आता तर मुंबई महापालिकेच्या रूपाने हाती असलेले 'एटीएम'सुद्धा हातून हिसकले जाण्याची वेळ येऊ घातली आहे. एकनाथ शिंदे यांनी पळविलेली शिवसेना परत मिळवायची असेल तर उद्धव यांना ही निवडणूक कुठल्याही परिस्थितीत जिंकावीच लागेल. मुंबई हरले तर उद्धव ठाकरे संपले. बुडण्याआधीची अखेरची धडपड त्यांनी चालवली आहे.

गाठ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि त्यांच्या एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील शिवसेना यांच्याशी आहे. याआधी २०१७ साली झालेल्या मुंबई महापालिकेच्या निवडणुकीत भाजपा विरुद्ध शिवसेना असा संघर्ष झाला होता. राज्यात भाजपा आणि शिवसेना युतीचे सरकार असतानाही दोघे एकमेकांविरुद्ध लढले होते. शिवसेना तेव्हा फुटायची होती. शिवसेनेला ८४ तर भाजपाला ८२ जागा मिळाल्या होत्या. शिवसेनेने सत्ता राखली होती. फडणवीस यांनी तेव्हा मनात आणले असते तर जुगाड करून मुंबई महापालिकेची सत्ता ताब्यात घेतली असती, पण त्यांनी मोठे मन केले. उद्धव यांना ते समजले नाही. पुढे ते शरद पवारांच्या नादी लागले. पवारांनी उद्धव यांची नाजूक नस हेरली. काँग्रेसला तयार केले. उद्धव, राष्ट्रवादी आणि काँग्रेस अशा विचित्र खिचडीचे सरकार सत्तेत आले.



ते चालणार नव्हतेच. अडीच वर्षात कोसळले. आज उद्धव एकटे आहेत. काँग्रेसने त्यांना सोडले. काँग्रेस स्वबळावर लढते आहे. काँग्रेसवाल्यांना टेन्शन नाही. हरण्याची त्यांना सवय झाली आहे. शरद पवारांच्या राष्ट्रवादीची मुंबईत फारशी ताकद नाही. असून नसून सारखे. कुणीच सोबत नाही म्हटल्यावर उद्धव यांना घाम फुटला असणार. शेवटचे शस्त्र म्हणून त्यांनी आपल्या चुलत भावाला म्हणजे राज ठाकरे यांना सोबत घेतले आहे. तब्बल २० वर्षांनंतर दोन ठाकरे एकत्र आले आहेत. मराठी अस्मितेच्या मुद्यावर एकत्र आले आहेत. दोघांच्या राजकीय युतीची चर्चा आहे. उद्धव या युतीसाठी उतावळे आहेत. मात्र, राज ठाकरे यांनी अजून आपले पत्ते उघड केलेले नाहीत. जागावाटप हा दोघांमध्ये कळीचा मुद्दा आहे. राज ठाकरे यांच्या महाराष्ट्र नवनिर्माण सेने म्हणजे मनसेकडे सध्या एकही खासदार, आमदार तर सोडा साधा नगरसेवकही नाही. अशा स्थितीत उद्धव ठाकरे भावासाठी किती जागा सोडणार आणि कोणत्या जागा सोडणार? दोघांमध्ये चर्चेचं गुऱ्हाळ सुरू आहे.

शिवसेनेतील फुटीनंतर तब्बल ४० पेक्षा अधिक माजी नगरसेवक एकनाथ शिंदे यांच्याकडे गेले आहेत. उद्धव यांच्याकडे उरलेल्यातल्या ३० माजी नगरसेवकांच्या जागा राज ठाकरे यांनी मागितल्या आहेत. उद्धव त्या देतील? नाजूक मुद्दा आहे, पण दुसरा मार्ग नाही. कारण परतीचे दोर केव्हाच कापले गेले आहेत. आता हे दोन भाऊ वेगळे लढतो म्हटले तर लोकांना ते आवडणार नाही. त्यांनाही ते कळते. पण वळलेले नाही. पाच दिवसांनी उमेदवारी अर्ज भरायला सुरुवात होत आहे. पुढे प्रचाराला फक्त १३ दिवस मिळणार आहेत. पण ठाकरे बंधूंची कसलीही तयारी नाही. रणनीती नाही. मेहनत घेणार नाही, लोकांकडे जाणार नाही तर मतं मिळणार कशी? 'आपल्याबद्दल मुंबईकरांची खूप सहानुभूती आहे, ठाकरे ब्रँड आपल्याला वाचवेल' असे उद्धव यांना वाटते. लढण्याची इच्छाच राहिली नाही, असे उद्धव यांच्याकडे पाहून वाटते. निवडणुका जिंकायच्या नाहीत, लढण्याचा देखावा मात्र करायचा. निकालानंतर ईव्हीएम, व्होटचोरी, मतदार याद्यांमधला घोळ या नावाने ओरडत सुटायचे. निवडणूक जिंकायचे एक तंत्र असते. संघटन लागते, प्रचार लागतो, घराघरात पोचावं लागतं यापैकी कुठल्याही आघाडीवर ठाकरे सेनेचा थांगपत्ता नाही. मराठी अस्मितेच्या नावावर मतं मागायची आणि राज्यसभेवर अमराठी माणसे पाठवायची हा यांचा मराठी बाणा मराठी माणूस पाहत आला. लोक या ढोंगीपणाला कंटाळले आहेत.

ठाकरे बंधूंच्या तुलनेत महायुतीची तयारी पाहा. भाजपाची सारी तयारी झाली आहे. अखेरचा हात फिरविणे बाकी आहे. फडणवीस यांनी आखलेली रणनीती तर फुलप्रूफ आहे. महायुती म्हणून निवडणूक लढवण्याचे त्यांनी तीन महिन्यांपूर्वीच सांगितलं आहे. एकी होणार नाही तिथे मैत्रीपूर्ण लढती होतील, असे सांगून फडणवीस मोकळे झाले. फडणवीस यांचा हा चक्रव्यूह अभेद्य असा आहे. पूर्वी काँग्रेसवाले असेच लढायचे. काँग्रेसमधलेच दोन गट लढायचे. त्यांच्यातलाच एक निवडून यायचा. तिसऱ्याला घुसूच देत नव्हते. फडणवीस यावेळी हाच डाव खेळत आहेत. भाजपा आणि शिंदे सेना एकमेकांशी लढली तरी शेवटी महायुतीच जिंकणार. म्हणजे सीट घरातच. नगरपालिका निवडणुका अशाच रणनीतीतून लढल्या गेल्या. कोकणातल्या कणकवलीचं उदाहरण बोलकं आहे. तेथे राणे बंधू आपसात लढले. निवडणुकीनंतर 'रवींद्र चव्हाण हे माझे मोठे बंधू' म्हणत नीलेश राणे पुढे आले. दोघांच्या लढतीत तिसऱ्याच फायदा होऊ नये म्हणून फडणवीस यांनी हा फॉर्म्युला शोधला आहे.

पुणे, पिंपरी चिंचवड येथे भाजपा आणि अजितदादांची राष्ट्रवादी याच फॉर्म्युल्यात आमनेसामने उतरले आहेत. मुंबईमध्ये उद्धव आणि राज ठाकरे यांची मतं फोडायचे डावपेच फडणवीस यांनी योजिले आहेत. शिंदे सेनेने ४-५ हजार मतं घेतली तरी ठाकरे सेनेच्या १० ते १५ जागा कमी होऊ शकतात. अजितदादांच्या राष्ट्रवादीला वेगळे उभं राहायला सांगितलं आहे. दादांचे उमेदवार ठाकरे बंधूंचीच मतं खातील. कोणता अजेंडा चालेल? ठाकरे बंधूंच्या मराठी अस्मितेचा की भाजपाच्या विकासाचा? मुंबईत मराठी मतदार ३८ टक्के आहे. दुसऱ्या क्रमांकावर मुसलमान २३ टक्के आहेत. विधानसभा निवडणुकीत मुस्लिमांनी ठाकरे सेनेला भरभरून मतं दिली होती. ५० वार्डांमध्ये मुस्लिम मतं निकाल फिरवू शकतात. ठाकरे सेना जिंकली तर एखादा खान महापौर होऊ शकतो, असे भाजपाकडून सांगितले जात आहे.

१७ टक्के उत्तर भारतीय मतदार आहेत. १५ टक्के गुजराती, राजस्थानी आहेत. मुंबईत २२७ जागा आहेत. बहुमतासाठी ११४ नगरसेवक पाहिजेत. गेल्या निवडणुकीत भाजपाला ८२ जागा मिळाल्या होत्या. यावेळी भाजपची तयारी आणि व्यूहरचना पाहता फडणवीस मैदान मारतील. एकूणच मुंबईची निवडणूक अतिशय चुरशीची आणि रोमहर्षक होणार आहे. नुकताच आलेला 'धुरंधर' नावाचा सिनेमा सध्या धुमाकूळ घालतो आहे. मुंबईतही निवडणुकीची धूम आहे. कोण होणार मुंबईचा 'धुरंधर?'

९८५०३०४१२३

(लेखक ज्येष्ठ पत्रकार आहेत.)

## आजचे संघगीत-७७

शुक्रवार, १९ डिसेंबर २०२५

### आई तुझ्याच पायी मजला सुखे मरू दे

आई, तुझ्याच पायी मजला सुखे मरू दे
यश माप हे भरू दे ॥धृ॥

कसली विलोभने ही दिसतील ठायि ठायी
उडवीन ठोकरीने तव साउली असू दे ॥१॥

तव पुत्र कोटि कोटी परि भाग्य ना ललाटी
जाणीव जाळिते ही रजनी तरी जळू दे ॥२॥

निज संपदा घराला येता फिरून तिजला
पद दोन टाकण्याते मम देह हा असू दे ॥३॥

उधळीन प्राण माझे चरणास रक्त ताजे
हसरा मुखेंदु आई मम लोचनी असू दे ॥४॥

समरी ध्वजा चढावी गगनी उषा हसावी
जयनाद होउनीया श्रवणी तुझ्या पडू दे ॥५॥

### रस्ते, अपघात आणि नागपूरचे औदासीन्य

नुकतीच वृत्तपत्रात बातमी वाचली एका टिप्परने हिट ॲण्ड रन केस मध्ये एका तरुण मुलाला गंभीर जखमी केले. त्यापूर्वी एक बातमी होती, मिहान पुलावर एका वाहनाने एका बुलेटस्वाराला धडक दिली. तो जागेवरच ठार झाला. ठार झालेला अनुज हा तरुण मुलगा आयआयएमचा विद्यार्थी होता. अजून किती बळी घेणार आहेत हे लोक? ही विकृत आणि क्रूर अपराधी मानसिकता आता संपवायलाच हवी. यापूर्वी सुद्धा हिट ॲण्ड रनच्या अपघाताची माहिती व त्यावर लिहिण्यात आले आहे. प्रताप नगरमध्ये मुख्य रहरदारीच्या रस्त्यावर एका स्त्रीला उडवून एक कारचालक बेदरकारपणे निघून गेला. पोलिस अजूनही तपासच करतात आहे म्हणे! प्रत्येक चौकात सिग्नल तोडून जाताना दिसतात. मोटारसायकलवर तीन जणांनी जाणे हा हक्कच असल्यागत मुले जातात. अरेरावी करतात. याला कारण प्रत्येक चौक , सिग्नल आणि महत्त्वाच्या जागी पोलिस नसणे. नागपुरात वाहतूक पोलिस नसणे हा फार चिंतेचा विषय आहे. अजूनही नागपूरच्या महत्त्वाच्या रस्त्यांवर, चौकांमध्ये वाहतूक पोलिस नाहीत. विदर्भातील अपघाताच्या ५० टक्के अपघात एकट्या नागपुरात होतात असे वृत्तपत्रातच येते. पोलिसांची कमतरता असेल तर त्यांनी 'जन आक्रोश' वा तत्सम संस्थेची मदत घेऊन एका पोलिसासोबत किमान दोन वाहतूक सेवक घ्यावेत. हा फार गंभीर विषय आहे. आणि हिट ॲण्ड रन केसमधील आरोपी सुटता काम नये. लोकांची सुरक्षितता महत्त्वाची आहे याची जाणीव सरकारने ठेवावी. तसेच लोकांनीही आता सजग होऊन या घटनांकडे केवळ प्रेक्षक म्हणून बघणे योग्य नाही.

**राजेंद्र बेनोडेकर**/८४२२०९९९२५

## वाचक पत्रे

### मुलांचे मन घडवा

बालपण हा मानवी जीवनातील सर्वांत महत्त्वाचा टप्पा आहे. याच काळात व्यक्तिमत्त्वाची बीजे रोवली जातात. मुलांच्या विचारांची दिशा, सवयी, मूल्ये आणि आत्मविश्वास यांचा पाया बालपणातच घातला जातो. म्हणूनच, बालपणातच योग्य संस्कार, शिक्षण आणि भावनिक आधार देऊन आपण मुलांचे यशस्वी तरुण मन घडवू शकतो. आजच्या स्पर्धात्मक युगात केवळ गुणांवर आधारित यश अपुरे ठरते. सर्जनशीलता, निर्णयक्षमता, सकारात्मक दृष्टिकोन आणि आत्मविश्वास हे गुण तितकेच महत्त्वाचे आहेत. हे सर्व गुण मुलांमध्ये अचानक विकसित होत नाहीत; त्यांची सुरुवात लहानपणापासूनच होते. पालक, शिक्षक आणि समाज या तिघांचीही या प्रक्रियेत महत्त्वाची भूमिका असते.

बालपणात मुलांना प्रेमळ आणि सुरक्षित वातावरण मिळणे अत्यंत आवश्यक आहे. अशा वातावरणातच मुले मुक्तपणे विचार करू शकतात, प्रश्न विचारतात आणि नवीन गोष्टी शिकण्याची उत्सुकता ठेवतात. मुलांना केवळ अभ्यासातच नव्हे, तर खेळ, कला, वाचन आणि सामाजिक उपक्रमांत सहभागी होण्यासाठी प्रोत्साहन दिले पाहिजे. अपयश आल्यास त्यांना धीर देणे, चुका समजून घेण्यास मदत करणे आणि प्रयत्न करण्याची सवय लावणे हे यशस्वी मन घडवण्याचे महत्त्वाचे टप्पे आहेत.

मुलांमध्ये नैतिक मूल्ये, शिस्त, सहकार्य आणि जबाबदारीची भावना रुजवणे आवश्यक आहे. पालकांनी स्वतः आदर्श वर्तन ठेवले तर मुले त्याचे अनुकरण करतात. बालपणात दिलेले संस्कार, योग्य मार्गदर्शन आणि सकारात्मक अनुभव हे मुलांच्या संपूर्ण आयुष्यावर परिणाम करतात. आत्मविश्वास, कष्ट करण्याची तयारी आणि सकारात्मक विचारसरणी असलेले मूल पुढे जाऊन यशस्वी तरुण बनतो. शेवटी असे म्हणता येईल की, मुलांचे भविष्य घडवायचे असेल तर त्याची सुरुवात बालपणापासूनच करावी लागते. प्रेम, समजूतदारपणा, योग्य शिक्षण आणि प्रेरणा यांच्या साहाय्याने आपण आपल्या मुलांची यशस्वी, सक्षम आणि सुसंस्कृत तरुण मन घडवू शकतो. हेच समाजाच्या आणि राष्ट्राच्या उज्ज्वल भविष्यासाठी अत्यंत आवश्यक आहे.

**सरोजा बालाजी निलेवार**/७२१८६००८९८

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# जिंतूर तहसीलदारांवर शिस्तभंगाची टांगती तलवार; मंत्र्यांच्या पृष्ठांकनानंतर चौकशी, दिशाभूल केल्याचा आरोप

**जिंतूर,/प्रतिनिधी-** तालुक्यातील अवैध रेती व गिट्टी उत्खनन प्रकरणाने आता गंभीर वळण घेतले असून, तहसील कार्यालयातील गैरप्रकार चव्हाट्यावर आले आहेत. विद्यमान तहसीलदार श्री. राजेशजी सरवदे यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई होण्याची शक्यता बळावली असून, महसूल मंत्र्यांच्या थेट पृष्ठांकनानंतर जिल्हाधिकारी कार्यालयाने चौकशीचे आदेश दिल्याने परभणी जिल्ह्यातील महसूल प्रशासनाची चांगलीच कोंडी झाली आहे.

सामाजिक कार्यकर्ते संजय रामराव आडे (रा. साईनगर तांडा, ईटोली, ता. जिंतूर) यांनी तहसीलदारांविरोधात वेळोवेळी तक्रारी सादर केल्या होत्या. जिंतूर अंतर्गत मौजे पुंगळा येथील प्लॉट नं. -१३१ (९,९२९ चौ.मी.) या भूखंडावर मोठ्या प्रमाणावर अवैधरित्या रेती व गिट्टीचा साठा व वापर होत असल्याचा आरोप आहे. हा भूखंड तत्कालीन निवासी उपजिल्हाधिकारी विश्वंभर गावंडे यांच्या पत्नी सौ. सावित्रीबाई गावंडे यांच्या नावावर असल्याने प्रशासनाने जाणीवपूर्वक डोळेझाक केल्याचा गंभीर आरोप तक्रारदारांनी केला आहे. या तक्रारींची दखल घेत राज्याचे महसूल मंत्री मा. ना. श्री. चंद्रशेखर बावनकुळे यांनी निवेदनावर थेट पृष्ठांकन केले. त्यानंतर विभागीय आयुक्त कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांनी जिल्हाधिकारी परभणी यांना नियमानुसार तातडीने कारवाई करण्याचे आदेश दिले. त्यानुसार जिल्हाधिकारी श्री. संजयसिंह चव्हाण (भा.प्र.से.) यांनी दि. ४ डिसेंबर २०२५ रोजी उपविभागीय अधिकारी, सेलू यांना तक्रारीतील मुद्दे "गंभीर स्वरूपाचे" असल्याचे नमूद करत स्वयंस्पष्ट अहवाल तात्काळ सादर करण्याचे आदेश दिले आहेत. विशेष म्हणजे, या प्रकरणाचा पाच वर्षांपासून पाठपुरावा सुरू असूनही चौकशीच्या नावाखाली केवळ टाळाटाळ करण्यात आली. बदल्या झाल्या, अधिकारी बदलले; मात्र कारवाई शून्यच राहिली. आता विद्यमान तहसीलदारांनी जिल्हाधिकारी कार्यालयास चुकीची व दिशाभूल करणारी माहिती सादर केल्याचा गंभीर आरोप पुढे आला आहे. अवैध गौण खनिज उत्खननामुळे शासनाचा महसूल बुडत असून पर्यावरणाचेही मोठे नुकसान होत आहे. तरीही जबाबदार अधिकाऱ्यांकडून संरक्षण दिले जात असल्याचे आरोप होत असल्याने, ही चौकशी केवळ कागदोपत्री राहणार की दोषींवर खरोखर कठोर कारवाई होणार, याकडे जनतेचे लक्ष लागले आहे.

थोडक्यात मत

संजय रामराव आडे, सामाजिक कार्यकर्ते (जिंतूर)

"२०१९ पासून या भूखंडावरील अवैध रेती-गिट्टी साठ्याबाबत तक्रारी करतो आहे. प्रत्येक वेळी चौकशीच्या नावाखाली फक्त फाईल फिरवली गेली. आता विद्यमान तहसीलदारांनी वरिष्ठांना चुकीची माहिती दिल्याचे समोर येत आहे. चौकशी होऊन अशा भ्रष्ट अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई झालीच पाहिजे."

## संक्षिप्त वृत्त...

### गावठी पिस्टल व जिवंत काडतुसे बाळगणारा तरुण पोलिसांच्या ताब्यात

**परभणी,/प्रतिनिधी :** शहरात अवैध शस्त्र बाळगणाऱ्यांविरुद्ध प्रभावी कारवाई करत नवा मोंढा पोलीस ठाण्याच्या हद्दीत स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने एका तरुणाला गावठी पिस्टल व जिवंत काडतुसेसह ताब्यात घेतले आहे.

पोलीस अधीक्षक रविंद्रसिंह संतोषसिंह परदेशी यांच्या आदेशान्वये व अपर पोलीस अधीक्षक सुरज गुंजाळ यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक विवेकानंद पाटील, सहायक पोलीस निरीक्षक पांडुरंग भारती तसेच स्थानिक गुन्हे शाखेचे अधिकारी व अंमलदार १५ डिसेंबर रोजी वसमत रोड परिसरात पेट्रोलिंग करीत असताना गुप्त बातमीदारामार्फत खात्रीशीर माहिती प्राप्त झाली. मिळालेल्या माहितीनुसार माऊली पांडुरंग खटींग (वय १९ वर्षे, रा. इटलापूर देशमुख, ता. जि. परभणी) हा अमोल पेट्रोलपंपाजवळील मंगल कार्यालयाच्या पाठीमागे असलेल्या विनय ऊर्फ पप्पू विशाल पोते यांच्या हॉस्टेलमध्ये गावठी पिस्टल बाळगून असल्याचे समजले. त्यानुसार रात्री १ वाजण्याच्या सुमारास सदर ठिकाणी छापा टाकण्यात आला. छाप्यादरम्यान आरोपीच्या अंगझडतीत एक गावठी बनावटीचे लोखंडी पिस्टल व दोन जिवंत काडतुसे असा एकूण अंदाजे २० हजार २०० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणी नवा मोंढा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपी सध्या पोलीस ताब्यात असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक भोसले हे करीत आहेत. दरम्यान, सहायक पोलीस निरीक्षक पांडुरंग भारती तसेच पोलीस अंमलदार मधुकर चट्टे, सुग्रीव केंद्रे, निलेश भुजबळ, लक्ष्मण कांगणे, परसराम गायकवाड, कश्यप साने व गणेश कौटकर यांनी ही कारवाई संयुक्तपणे केली.

### गंगाखेड तालुक्यात अवैध वाळू उपशाविरोधात कारवाई; सहा तराफे जाळून नष्ट, ५० ब्रास वाळू जप्त

**परभणी,/प्रतिनिधी :** महसूल व पोलीस प्रशासनाने संयुक्तरित्या केलेल्या कारवाईत गंगाखेड तालुक्यातील झोला शिवारातील गोदावरी नदी पात्रात अवैध वाळू उपशासाठी वापरण्यात येणारे सहा तराफे जाळून नष्ट करण्यात आले असून अंदाजे ५० ब्रासपेक्षा अधिक वाळू साठा जप्त करण्यात आला आहे.

झोला येथील गोदावरी नदी पात्रात तराफ्याच्या साहाय्याने मोठ्या प्रमाणावर अवैध वाळू उपसा सुरू असल्याची माहिती मिळाल्यानंतर उपविभागीय अधिकारी जिवराज डापकर व तहसीलदार उषाकिरण श्रृंगारे यांच्या मार्गदर्शनाखाली मंगळवारी संयुक्त पथकाने कारवाई केली. या पथकात पथक प्रमुख नायब तहसीलदार मोहम्मद अझीम, उपविभागीय कार्यालयाचे नायब तहसीलदार अब्दुल मोईज, पोलीस उपनिरीक्षक शिवाजी शिंगणवाड, मंडळ अधिकारी शंकर राठोड, तलाठी रमेश लटपटे, अशोक कुगणे, पोलीस शिपाई सुनील मामीलवाड, सतीश पांढरे, राहुल राठोड, महसूल सहाय्यक उद्धव शिसोदे, संतोष भारसाखळे, एकनाथ शहाणे, गुरुलिंग रेवडकर, संजय जाधव आदी कर्मचाऱ्यांचा समावेश होता. पथक येत असल्याची कुणकुण लागताच वाळू माफिया गोदावरी नदी परिसरातून फरार झाले. त्यामुळे एकही वाळू माफिया प्रशासनाच्या ताब्यात आला नाही. जप्त करण्यात आलेली वाळू पोलीस पाटील यांच्या ताब्यात देण्यात आली आहे.

### महापालिका निवडणूक राष्ट्रवादी काँग्रेस पूर्ण ताकदीने लढवणार - प्रताप देशमुख

**परभणी,/प्रतिनिधी:** राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी महानगरपालिका निवडणूक पूर्ण ताकदीने लढवणार आहे, अशी माहिती प्रताप देशमुख यांनी दिली.

येथील राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाच्या सर्व पदाधिकाऱ्यांची महत्त्वाची बैठक परभणी शहर पक्ष कार्यालयात आज मंगळवार १६ डिसेंबर रोजी पार पडली. या बैठकीच्या अध्यक्षस्थानी देशमुख यांची उपस्थिती होती. बैठकीदरम्यान पक्षाच्या सर्व पदाधिकाऱ्यांकडून सूचना व मतांचे संकलन करण्यात आले. यावेळी पक्षासाठी निष्ठेने कार्य करणाऱ्या मूळ पदाधिकाऱ्यांनाच आगामी महापालिका निवडणुकीत उमेदवारी देण्यात यावी, अशी मागणी पदाधिकाऱ्यांनी केली. या प्रसंगी मार्गदर्शन करताना देशमुख यांनी सांगितले की, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी आगामी परभणी महानगरपालिका निवडणूक पूर्ण ताकदीने लढवणार असून पक्षातील उमेदवारांच्या पाठीशी पक्ष संघटनात्मक व राजकीयदृष्ट्या ठामपणे उभा राहणार आहे. तसेच परभणीचा महापौर हा सामान्य परभणीकरच होईल, असा संकल्प सर्व पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत त्यांनी व्यक्त केला.

### दारूच्या बॉटलने मारहाण; युवक गंभीर : नानलपेठ पोलिसांत परस्परविरोधी गुन्हे दाखल

**परभणी,/प्रतिनिधी :** दारूची बॉटल डोक्यात मारून एका युवकास गंभीर जखमी केल्याची घटना येथील खंडोबा बाजार परिसरात शनिवारी (दि. १३) रात्री अकरा वाजण्याच्या सुमारास घडली. या प्रकरणी नानलपेठ पोलिसांत परस्परविरोधी गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

मोहम्मद इजाज मोहम्मद खालिद यांनी फिर्याद दिली आहे की, फिर्यादीचा भाऊ तबरेज हा रात्री अकरा वाजण्याच्या सुमारास घरी आला तेव्हा त्याच्या डोक्यातून रक्त येत होते. याबद्दल विचारणा केली असता समशेर, जमशेद, हनुमान सोनटक्के, सतीश भुमरे, भागवत चव्हाण, विष्णू पवार, तुकाराम पारवे आणि इतर अज्ञात एक ते दोन जणांनी शिवीगाळ करून डोक्यात दारूची बॉटल मारून जखमी केल्याचे सांगितले.


सोलापूर तरुण भारत

कार्यालयाचा पत्ता- डॉ.लोया नेत्र रुग्णालयासमोर ढवळे यांचे निवासस्थान शिवाजी नगर, परभणी

तात्काळ प्रतिनिधी नेमणे आहे.

संपूर्ण मराठवाडयामध्ये झपाट्याने वाढणाऱ्या **दै.सोलापूर तरुण भारत** साठी परभणी जिल्हयात खालील ठिकाणी प्रतिनिधी नेमणे आहे.
**१.गंगाखेड-** तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी, ०२. **पूर्णा-** तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी ०३. **मानवत** - तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी,
०४. **पालम** - तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी ०५. **सेलू** - शहर प्रतिनिधी ताडकळस, बोरी, राणी सावरगाव, कौसडी, चारठाणा, वालूर या सर्व ठिकाणी तात्काळ प्रतिनिधीची नियुक्ती करावयाची आहे. पत्रकारितेतील अनुभव असलेल्या व दै.तरुण भारतसाठी काम करु इच्छिणाऱ्या प्रतिनिधींनी संपर्क साधावा.

**जिल्हा प्रतिनिधी- मोहन धारासूरकर**

९४ २३३२४६६५, ९२८४६६४४३०, ९२८४६९५५८३


## मराठी पत्रकार संघ जिंतूर संलग्न डिजिटल मीडिया कार्यकारिणी जाहीर तालुकाध्यक्षपदी अजमत पठाण यांची बिनविरोध निवड

**जिंतूर,/प्रतिनिधी:** अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषद संलग्न जिंतूर तालुका डिजिटल मीडिया कार्यकारिणीची निवड बिनविरोध करण्यात आली. यासाठी जिंतूर येथील पत्रकार भवनात विशेष बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत सर्वानुमते तालुकाध्यक्षपदी अजमत पठाण यांची निवड करण्यात आली.
नवीन कार्यकारिणीत कार्याध्यक्षपदी दिलीप महागडे, सचिवपदी हनीफ बागवान, सहसचिवपदी मनोज टाक, उपाध्यक्षपदी शेख अहमद यांची निवड झाली आहे. तसेच सदस्य म्हणून रहीम शेख, गणेश पालवे आणि खय्यूम खान (बाबा राज) यांची निवड करण्यात आली.
सर्व पदाधिकाऱ्यांची निवड बिनविरोध झाली असून, डिजिटल माध्यमांच्या माध्यमातून पत्रकारितेची विश्वासार्हता, व्यावसायिक मूल्ये आणि सामाजिक बांधिलकी अधिक भक्कम करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला. डिजिटल मीडियाच्या माध्यमातून सत्य, निर्भीड आणि लोकाभिमुख पत्रकारिता अधिक प्रभावीपणे पोहोचवण्यासाठी संघटित प्रयत्न करण्यावर बैठकीत भर देण्यात आला.
या निवड प्रक्रियेत निवडणूक निर्वाचन अधिकारी म्हणून जिल्हा पत्रकार संघाचे उपाध्यक्ष, ज्येष्ठ पत्रकार एम. ए. माजिद यांनी जबाबदारी पार पाडली. यावेळी तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष बालाजी शिंदे, कार्याध्यक्ष सिराज सिद्दिकी, सचिव महेश देशमुख यांच्यासह शेख शकील अहमद, सालेह चाऊस, शेख अलीम, रामप्रसाद कंठाळे, शेख नईमोद्दीन आदी पत्रकार व पदाधिकारी उपस्थित होते. नवीन कार्यकारिणीच्या निवडीबद्दल उपस्थितांनी अभिनंदन करत पुढील कार्यकाळात पत्रकारांच्या समस्या, प्रशिक्षण, डिजिटल मीडियाचे सक्षमीकरण आणि सामाजिक प्रश्नांवर प्रभावी भूमिका घेण्याची अपेक्षा व्यक्त केली.




## परभणीत आज सुप्रसिद्ध कीर्तनकार निवृत्ती महाराज इंदोरीकर यांचे कीर्तन

### सह्याद्री फाऊंडेशनद्वारे आयोजन



**परभणी,/प्रतिनिधी :** येथील सह्याद्री फाऊंडेशनच्या वतीने गुरुवार १८ डिसेंबर रोजी शहरातील अनुसया टॉकीज समोरील काळभैरवनाथ मैदानावर सायंकाळी ४ वाजता भव्य कीर्तन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असून यावेळी महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध कीर्तनकार हभप निवृत्ती महाराज इंदोरीकर यांचे कीर्तन होणार आहे.

या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून मान्यवर हभप अच्युत महाराज दस्तापुरकर, व्याख्याते म्हणून प्रा. विठ्ठल कांगने, समाजसेवक रामभाऊ बागल यांच्यासह विविध सामाजिक व धार्मिक क्षेत्रातील पदाधिकारी यांची उपस्थिती लाभणार आहे. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी स्थानिक कार्यकर्ते परिश्रम घेत आहेत.
या भक्तीमय कीर्तन सोहळ्यास पंचक्रोशीतील भाविका भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन सह्याद्री फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष सुधीर साळवे यांनी केले आहे.

## मनपा निवडणूकीसाठी राष्ट्रवादी पूर्ण ताकतीने लढणार- देशमुख

**परभणी,/प्रतिनिधी-** राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी महानगरपालिका निवडणूक पूर्ण ताकदीने लढवणार आहे, अशी माहिती प्रताप देशमुख यांनी दिली.

येथील राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाच्या सर्व पदाधिकाऱ्यांची महत्त्वाची बैठक परभणी शहर पक्ष कार्यालयात आज मंगळवार १६ डिसेंबर रोजी पार पडली. या बैठकीच्या अध्यक्षस्थानी देशमुख यांची उपस्थिती होती. बैठकीदरम्यान पक्षाच्या सर्व पदाधिकाऱ्यांकडून सूचना व मतांचे संकलन करण्यात आले. यावेळी पक्षासाठी निष्ठेने कार्य करणाऱ्या मूळ पदाधिकाऱ्यांनाच आगामी महापालिका निवडणुकीत उमेदवारी देण्यात यावी, अशी मागणी पदाधिकाऱ्यांनी केली. या प्रसंगी मार्गदर्शन करताना देशमुख यांनी सांगितले की, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी आगामी परभणी महानगरपालिका निवडणूक पूर्ण ताकदीने लढवणार असून पक्षातील उमेदवारांच्या पाठीशी पक्ष संघटनात्मक व राजकीयदृष्ट्या ठामपणे उभा राहणार आहे. तसेच परभणीचा महापौर हा सामान्य परभणीकरच होईल.

## सेलू पालिकेच्या सार्वजनिक शौचालयाची दूरावस्था

### हेमंतनगर येथील शौचालय तात्काळ दूरूस्तीची मागणी

**सेलू,/प्रतिनिधी:** शहरातील हेमंतनगर येथील पालिकेच्या सार्वजनिक शौचालयाची दूरावस्था झाली असून पालिकेने तात्काळ दूरूस्ती करण्याची मागणी निवेदनाव्दारे करण्यात आली आहे .पालिका प्रशासन सोमवार १५ रोजी हेमंतनगर येथील रहिवाशी यांनी निवेदन देवून सार्वजनिक शौचालय दूरूस्त करून द्यावेत अशी मागणी केली आहे.

हेमंतनगर येथे पालिकेने सार्वजनिक शौचालय बांधले मात्र मागील अनेक दिवसापासून सदरिल शौचालयाचे दरवाजे मोडकळीस आले आहेत.शौचालयास दरवाजे नसल्याने नागरीक उघड्यावर शौचास बसल्याचे जाणवत असून या ठिकाणी महिला व पूरूष असे एकत्रीत शौचालय असून या दोघांच्यामध्ये केवळ लोखंडी पत्रा लावलेला आसून तो लोखंडी पत्रादेखील खराब होवून तूटला असल्याने महिला व पूरूष हे शैचालयात एकमेकांना दिसत आहेत.

तसेच या ठिकाणी असलेल्या पाण्यची यंत्राना निकामी झाली आहे.लाईटची व्यवस्था नसल्याने अंधार नागरीकांना त्रास होत आहे.पालिका प्रशासनाकडून अनेक वेळा सर्वे करण्यात आला असला तरी प्रत्यक्षा दूरूस्तीचे काम करण्यात आले नाही.मराठवाड्यात स्वच्छता अभियानमध्ये पालिकेने दूसरा क्रमांक पटकावला असला तरी मूलभूत सूविधा अद्यापपर्यंत नागरीकांना मिळत नसतील तर त्याचा काय उपयोग?असा प्रश्न उपस्थित होत आहे.

दरम्यान शौचालयाचे दरवाजे तूटले असल्याने परिसारात घाणीमूळे नागरीकांन त्रास होत आहे या घणीमूळे नागरीक आजार पडत असून शौचालयाची दूरूस्ती तात्काळ करण्यात यावी नसता १८ डिसेंबर २०२५ पासून पालिकेसमोर उपोषण करण्यात येणार असल्याचा इशारा देण्यात आला असून यासाठी मोहन समूद्रे यांनी पूढाकार घेतला.

## श्री रंगनाथ महाराज प्रतिष्ठानच्यावतीने गोसेवा गोशाळेत ५६ भोग कार्यक्रम व महाआरती

**सोनपेठ,/प्रतिनिधी:** ब्र.भु.वेदांतकेसरी श्री रंगनाथ (गुरुजी) महाराज सोनपेठकर यांच्या पुण्यतिथीनिमित्त येथील श्री रंगनाथ महाराज प्रतिष्ठानच्या वतीने तालुक्यातील सायखेडा येथील गोशाळेमध्ये रविवार दि.१४ डिसेंबर रोजी विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी सोनपेठ शहरातील प्रतिष्ठित व्यापारी, नागरिक व ग्रामस्थांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.
सोनपेठ येथील रंगनाथ महाराज प्रतिष्ठानच्या वतीने प्रत्येक वर्षी विविध उपक्रम साजरे केले जात आहेत. त्यामध्ये देशसेवा,समाजसेवा,गोसेवा,अनाथ निराधार सेवा, स्वच्छता अभियान यासारखे विविध उपक्रम साजरी केले जातात.
यावेळी श्री रंगनाथ महाराज यांच्या ५६ व्या पुण्यतिथीनिमित्त व अखंड हरिनाम सप्ताह निमित्ताने प्रतिष्ठानच्या वतीने सोनपेठ तालुक्यातील सायखेडा येथील गोशाळेमध्ये असलेल्या शेकडो निराधार गाईंना हिरवागार मुबलक चारा देण्यात आला. तसेच काकडी, गाजर,पालक,मेथी, टोमॅटो इत्यादी पालेभाज्यांसह केळी, सफरचंद, मोसंबी, चिकू, डाळिंब, पपई यासारखे विविध ५६ प्रकारचे फळे विधिवत पूजा करून गोशाळेतील गाईंना अर्पण करण्यात आले. तसेच गाईंची सामूहिक महाआरती करण्यात आली. या प्रसंगी गोशाळाचे सेवेकरी हभप काका महाराज कदम,बालाजी वांकर,नंदकुमार कोटलवार,जीवन बसेट,प्रशांत पंपटवार, जितेंद्र वांकर,प्रवीण सातभाई, प्रशांत सातभाई, बालाजी पदमवार,संतोष बसेट, विकी बसेट, गोविंद बसेट,प्रशांत गुंडाळे, संतोष वलसेटवार, पोकळे यांच्यासह अनेक नागरिक उपस्थित होते.



## सोलर प्लांटवर ६० हजार रुपंयाच्या केबल वायरची झाली चोरी

**शांतीलाल शर्मा**

**पालम,/प्रतिनिधी-** सोलर प्लांटवर ६० हजार रुपयांच्या केबल वायरची चोरी झाली आहे.
पालम तालुक्यातील रत्नापूर शिवारातील सोलार प्लांटवरील ६० हजार रुपये किमतीची स्ट्रिंग केबल वायर अज्ञात चोरट्याने चोरून नेली. ही घटना १५ डिसेंबरला घडली. रत्नापूर शिवारातील सोलार प्लांटवर मानवत येथील नारायण नगरातील गणेश सुदाम सलगर हे कामास आहेत. १६ डिसेंबरला ठाण्यात सोलार प्लांटमधील ६० हजार रुपये किमतीची स्ट्रिंग केबल वायर चोरी गेल्याचे लक्षात आल्याची तक्रार दिली. या प्रकरणी अज्ञात चोरट्याविरुद्ध मानवत ठाण्यात गुन्हा नोंद झाला. तपास हवालदार गाजियोद्दीन शेख करीत आहेत.

## खेड्या गावातुन उदयास आलेल चाणक्यनिती नेतृत्व- मा.जि.प उपाध्यक्ष वाघीकर

**रामप्रसाद कंठाळे**

**जिंतूर ,/प्रतिनिधी-** खेड्या गावातुन उदयास आलेल चाणक्य निती नेतृत्व मा.जि.प उपाध्यक्ष वाघीकर जिंतूर- तालुक्यातील कौसडी सर्कल मधील वाघी (बो) येथील सर्व सामाण्य कुटुंबातील शेतकरी पुत्र मा.जि.प उपाध्यक्ष प्रभाकर पाटील वाघीकर एका खेड्या गावातुन समाज कारणाच्या माध्यमातून उदयास आलेल राजकीय चाणक्य मनुन त्यांच्याकडे पाहिले जाते. तालुक्यातील राजकारणासह परभणी जिल्हाच्या राजकारणारात गाव खेड्यातुन राजकीय प्रवास करत आपली ओळख भा.ज.प चे नेते रामप्रसादजी बोर्डीकर यांच्या आर्शिवादाने निर्माण करुन २० टक्के राजकारण व ८० टक्के समाजकारण करत गोरगरीब जनतेचे कामे करण्यात व्यस्त झाल्याने त्यांना दादा हि जनतेने पदवी बहाल केली असल्याने प्रभाकर दादा वाघीकर हे नाव अवघ्या काहि दिवसातच जिल्हाच्या राजकारणात व समाजकारनात नावलौकीक झालेले आपल्याला पहावयास मिळत आहे.सामाण्य शेतकरी कुटुंबातुन उदयास आलेले मा.जि.प उपाध्यक्ष प्रभाकर पाटील वाघीकर यांचे प्राथमिक शिक्षण जिल्हा परिषद शाळेत होउनहि त्यांची बौद्धिक शंमता सामाजीक कार्यासाठी सदैव तत्पर राहिली गेल्याची दिसुन आहे. सामाजीक कार्याची आवड व शेतकरी पुत्र असल्याने वाघीकर यांना सामाजीक कार्याची आवड निर्माण झाल्याने ग्रामिण भागात त्यांचे सर्व सामाण्य नागरीक यांच्यासह शेतकरी बांधव यांच्या मध्ये आपुकीचे नाते निर्माण झाले असल्याने वाघीकर यांना दादा हि पदवी बहाल करण्यात आली असुन आज हि मा.जि.प उपाध्यक्ष प्रभाकर पाटील वाघीकर यांना लहाना पासुन ते वयोवृद्धा पर्यंत प्रभाकर दादा या नावानेच आठवण करतानाच दिसत आहेत कोणत्याहि जाती धर्माचा विचार न करता विवाह सोहळा असल्यास फक्त एक फोन कॉल आल्यास विवाह सोहळ्यास आहेर घेउन उपस्थिती लावनारा जिल्हाभरा सह तालुका व कौसडी सर्कल मध्ये नावलौकीक असलेला एक मेव नेता मनुन वाघीकर दादा यांच्या कडे पाहिले जाते. कौसडी सर्कल मधील गोर गरीब जनतेच्या मुला मुलींचे शिक्षणाचे हित जोपसण्याच्या हेतुने वाघी (बो) येथे वाघीकर यांनी प्रभुकृपा माध्यमिक विद्यालय या नावाने शैक्षणिक शिक्षण संस्था स्थापन करुन कौसडी सर्कल मधील विद्यार्थांचा शैक्षणिक प्रश्न लाऊन, परीसरातील विद्यार्थ्यांनी शैक्षणिक क्षेत्रात उत्तुंग भरारी घेतल्यानंतर यशाचा शिखर गाठून आपले शैक्षणिक भवितव्य घडविले गेल्याचे निदर्शनास आले आहे असल्याचे नावलौकीक असलेले सामाजिक कार्याची जान असनारे शेतकरी पुत्र ते राजकारणातील चाणक्य मनुन संबोधले जाणारे मा.जि.प. उपाध्यक्ष प्रभाकर पाटील वाघीकर यांचे राजकीय चाणक्य मनुन जिल्हाच्या ग्रहपाठाच्या राजकारणातील पहिल्या पानावर नाव दिसुन येत आहे.



## जयभवानी महाविद्यालयात लेफ्टनंट आदित्य भाकरे याचा सत्कार



पाटोदा (प्रतिनिधी )दिनांक :१९ डिसेबंर : पाटोदा येथिल जय भवानी महाविद्यालयात पाटोदा शहरातील शहिद संजय भाकरे यांचे सुपुत्र लेफ्टनंट आदित्य भाकरे याने वडिलांचे देशसेवेचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी चार वर्षाचे एनडीए चे प्रशिक्षण पूर्ण करून आर्मीत बारा आरमाड लेफ्टनंट या पदी निवड झाल्याबद्दल वीरमाता म्हणुन आई व लेफ्टनंट आदित्य भाकरे याचा महाविद्यालयात विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळावी म्हणुन महाविद्यालयाच्या वत्तीने प्राचार्य डॉ.विश्वास कदम,प्राचार्य डॉ.सदाशिव सरकटे,प्राचार्य डॉ. तात्याराम सोंडगे यांच्या शुभहस्ते सत्कार करण्यात आला.व भविष्यासाठी त्याला शुभेच्छा!देण्यात आल्या.या प्रसंगी प्रा. डॉ.संगीता आहेर,प्रा. डॉ.दत्ता तंगलवाड,प्रा. डॉ.कलदंर पठाण,प्रा. डॉ.सुनिल जाधव,प्रा.प्रकाश नाईकवाडे,प्रा. डॉ. अशोक देवगुडे.मुख्याध्यापक एल.आर.जाधव,प्रा.डॉ.गोविंद बामदळे,युवा नेते राहुल बामदळे व सर्व प्राध्यापक आणि बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते.

## प्रसिद्ध स्त्री रोग तज्ञ डॉ धीरज सर्वज्ञ यांना पितृशोक



बीड( प्रतिनिधी) येथील शासकीय आयटीआय मधून सेवानिवृत्त झालेले श्रीकृष्ण सर्वज्ञ याचे राहत्या घरी वृद्धापकाळाने दुखत निधन झाले. मृत्यूसमयी त्यांचे वय ७८ होते. श्री श्रीकृष्ण सर्वज्ञ हे मनमिळावू स्वभावाचे व कडक शिस्तीचे म्हणून परिचित होते. गेल्या काही दिवसापासून ते आजारी होते. गुरुवारी सकाळी त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, नातवंडे, सुना असा परिवार आहे. बीड येथील प्रसिद्ध स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ धीरज सर्वज्ञ व राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रांत प्रचार प्रमुख अँड रोहित सर्वज्ञ यांचे ते वडील होते. गुरुवार १८ डिसेंबर रोजी बीड येथील अमरधाम स्मशानभूमी मध्ये त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले त्यावेळी बीड येथील डॉक्टर मंडळी, वकील मंडळी, भारतीय शिक्षक प्रसारक संस्थेचे शिक्षक तसेच संस्था पदाधिकारी याबरोबरच राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रांत पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ६१ व्या पुरुष - महिला स्पर्धेत सहभागी सर्व खेळाडूंनी क्रीडा कौशल्य दाखवून खेळ खेळावा : जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन







बीड - दि . १८ (प्रतिनिधी ) - बीड जिल्ह्यात होत असलेल्या ६१ व्या पुरुष - महिला स्पर्धेत सहभागी सर्व खेळाडूंनी हिरीरीने व जिद्दीने क्रीडा कौशल्य दाखवून हार - जीत ची तमा न बाळगता खेळ खेळावा असे आवाहन बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी केले . बीड येथील श्रीमंतयोगी छत्रपती शिवाजी महाराज क्रीडासंकुलावर आयोजित ६१ व्या राज्य अजिंक्यपद पुरुष - महिला खो खो स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते . मंचावर पोलिस अधिक्षक नवनीत कॉवत, जि प मुख्य कार्यकारी अधिकारी जतीन रहेमान , क्रीडा उप संचालक शेखर पाटील, शिक्षणाधिकारी किरण कुंवर, जिल्हा क्रीडा अधिकारी अरविंद विद्यागर , जिल्हा नियोजन अधिकारी सुधाकर चिंचाणे, जेष्ठ क्रीडा मार्गदर्शक प्रा . जे . पी . शेळके,महाराष्ट्र खो खो संघटनेचे सचिव डॉ चंद्रजित जाधव, उपाध्यक्ष सचिन गोडबोले, भारतीय खो खो महासंघाचे उपाध्यक्ष अॅड. गोविंद शर्मा आदींची उपस्थिती होती . प्रारंभी संघटनेच्या ध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले . क्रीडाज्योत प्रज्वलित करून उपस्थित खेळाडूंची सलामी स्वीकारली . बहारदार संचलन खेळाडूंनी केले . पोलिस बॅन्डच्या तालावर क्रीडारसिक मग्न झाले होते . मंचावरील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास मान्यवरांनी पुष्पमाला घातली . उपस्थित मान्यवरांचे स्वागत एमॅच्युअर खो खो संघटनेचे अध्यक्ष ऋषिकेश शेळके, उपाध्यक्ष रमेशभाऊ शिंदे, सचिव विजय जाहेर, वर्षा कच्छवा, नितीन येळवे , प्रफुल्ल हाटवटे,मनोज जोगदंड ,योगेश सोळसे ,प्रा . राजेंद्र बरकसे आदींनी केले. प्रास्ताविकात अध्यक्ष ऋषिकेश शेळके यांनी २०२३ मध्ये स्थापन झालेल्या या संघटनेची माहिती दिली . तब्बल २३ वर्षानंतर ही स्पर्धा खेळाडू व दानशूर यांच्या प्रयत्नातून घेतल्याचे त्यांनी सांगितले . पो अ नवनीत कॉवत व सीईओ जतीन रहेमान यांनी आपल्या भाषणात खेळाडूंना शुभेच्छा दिल्या . या प्रसंगी विश्वकप खो खो स्पर्धेसाठी सुवर्णपदक विजेती महिला संघाची कर्णधार प्रियंका इंगळे पुरुष गटाचा कर्णधार प्रतिक वाईकर , अश्विनी शिंदे, सुयश गरगटे, अनिकेत पोटे , रेश्मा राठोड आदी विश्वकप विजेत्या खेळाडूंचा मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला . आभार सचिव विजय जाहेर यांनी मानले . कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अनिल शेळके व चि . अथर्व शेळके यांनी करून बहार आणली . या स्पर्धेत ४८ संघाचे ७२० खेळाडू व १५० पंच तांत्रिक अधिकारी बीड येथे सहभागी झाले आहेत . सकाळी ७ ते ११ व सायं विद्युत झोतात ४ . ३० ते ११ या वेळेत होत आहेत . बीडच्या क्रीडा रसिकांनी या स्पर्धेचा थरार अनुभवण्यासाठी अवश्य भेट द्यावी, असे आवाहन आयोजकांनी केले आहे .

## संतोष देशमुख हत्या प्रकरणात २३ डिसेंबर रोजी सुनावणी



बीड: संतोष देशमुख हत्या प्रकरणात सुरू असलेल्या खटल्यात बचाव पक्षाला पुरावे देण्याची पूर्तता झाली नसल्याचा बचाव पक्षाचा युक्तिवाद ग्राह्य धरत आजची दोषारोप निश्चिती पुढे ढकलली आहे. यात आता २३ डिसेंबर रोजी पुढील सुनावणी होणार आहे.

संतोष देशमुख हत्या प्रकरणाची सुनावणी बीडच्या विशेष मकोका न्यायालयात सुरू आहे. आज (दि. १९) त्यात दोषारोप निश्चिती होणे अपेक्षित होते. मात्र, बचाव पक्षाने दोषारोप निश्चितीपूर्वी पुरावे देण्याच्या तरतुदीची पूर्तता झाली नसल्याचे सांगितले. हल्ल्याचे व्हिडिओ उच्च न्यायालयात दाखवले जातात, मात्र बचाव पक्षाला दिले जात नाहीत, हे कायदेशीर नसल्याचे त्यांनी नमूद केले. बीएनएसएस च्या कलम २३० ची पूर्तता झाल्याशिवाय दोषारोप निश्चितीची घाई अभियोगपक्ष का करत आहे, असा युक्तिवाद आरोपींच्या वतीने करण्यात आला.

तपास अधिकारी आणि सहाय्यक सरकारी वकिलांनी सांगितले की, बचाव पक्षाला संबंधित व्हिडिओ लगेच उपलब्ध करून दिले जातील. तसेच लॅपटॉप संबंधी अहवाल येण्यासाठी ३० दिवसांचा कालावधी अपेक्षित असून, अहवाल आल्याबरोबर तो बचाव पक्षाला दिला जाईल. त्यानंतर न्यायालयाने पुढील सुनावणी २३ तारखेला निश्चित केली.

उज्वल निकमांना बदलण्यासाठी अर्ज या प्रकरणातील सरकारी वकील उज्वल निकम हे भाजपचे खासदार असून, त्यांची नियुक्ती भाजप आमदारांच्या शिफारशीवर झाली असल्याचे सांगत आरोपी क्रमांक ३ ते ७ यांनी त्यांची नियुक्ती रद्द करण्यासाठी न्यायालयाकडे अर्ज केला आहे. त्यावर उज्वल निकम यांनी आपली भूमिका मांडताना सांगितले की, अशा कोणत्याही अर्जाला कायदेशीर आधार नाही किंवा ते या न्यायालयाच्या अधिकारक्षेत्रात येत नाही.

# फिल्मी स्टाईलने अपहरण केलेल्या तरूणीचा गेवराई पोलिसांनी लावला ६ तासात शोध

गेवराई: भररस्त्यातून दिवसाढवळ्या फिल्मी स्टाईलने अपहरण करण्यात आलेल्या २२ वर्षीय तरूणीचा गेवराई पोलिसांनी अवघ्या ६ तासांमध्ये यशस्वी शोध लावून तिला सुरक्षित ताब्यात घेतले आहे. या धडाकेबाज कारवाईमुळे गेवराई पोलिसांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

दिनांक १८/१२/२०२५ रोजी सकाळी ११.४५ वाजेच्या सुमारास गेवराई येथील एका गजबजलेल्या भर चौकातून एका २२ वर्षीय तरूणीचे बळजबरीने अपहरण करण्यात आले होते. सार्वजनिक ठिकाणी आणि दिवसाढवळ्या घडलेल्या या घटनेमुळे नागरिकांमध्ये मोठी दहशत आणि भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. घटनेची माहिती मिळताच पीडित तरूणीच्या वडिलांनी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली, ज्यावरून गुन्हा रजिस्टर नंबर ७३३/२०२५ नुसार भारतीय न्याय संहिता २०२३ च्या कलम १३७(२), ६१(२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

पोलिसांची तत्पर कारवाई: घटनेचे गांभीर्य ओळखून पोलिसांनी गुन्हा दाखल होण्याची वाट न पाहता तत्काळ तपासाची चक्रे फिरवली. पोलीस निरीक्षक किशोर पवार यांच्या नेतृत्वाखाली ८ अधिकारी आणि २० अंमलदारांची वेगवेगळी पथके तयार करून तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे आरोपींच्या दिशेने रवाना करण्यात आली. तपासादरम्यान पोलिसांनी ज्या गाडीतून अपहरण झाले होते, त्या गाडीचा यशस्वी माग काढला.

आरोपींचा पलायन आणि मुलीची सुटका: गेवराई पोलीस आपल्या मागावर असल्याची कुणकुण लागताच आरोपींनी घाबरून अपहृत मुलीला परभणी येथील बसस्टँडवर सोडून पळ काढला. पोलिसांनी तातडीने परभणी गाठून मुलीला आपल्या ताब्यात घेतले आणि ६ तासांच्या आत या गुन्ह्याचा छडा लावला.

यांनी केली कारवाई: ही मोहीम पोलीस अधीक्षक नवनीत कॉंवत, अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर आणि पोलीस उपअधीक्षक अभिजीत कटके यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. यात पोलीस निरीक्षक किशोर पवार, सपोनि सतीश कोटकर, संतोष जंजाळ, दीपक लंके, अण्णासाहेब पवार, पोउपनि निशीगंधा खुळे, राम खोत, प्रदीप आढाव, संजय उदगीरकर आणि २० पोलीस अंमलदारांचा सहभाग होता.

सध्या पोलीस आरोपींचा कसोशीने शोध घेत असून, प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक संजय उदगीरकर करत आहेत.

# मुख्यमंत्री समृध्द पंचायतराज अभियानात ग्रामस्थांच्या सहभागातुन किट्टी आडगावचा चेहरामोहरा बदलला

### महाआरोग्य शिबीरात सात विवीध स्पेशालिस्ट डॉक्टरांनी केली अकराशे रुग्णांची विक्रमी तपासणी, सरपंच रुक्मानंद खेत्रे यांचे यशस्वी नियोजन



माजलगाव, दि. १९ प्रतिनिधी: तालुक्यातील किट्टी आडगाव ग्रामपंचायतीने मुख्यमंत्री समृध्द पंचायत राज अभियान अंतर्गत गावात विकासाची नवी लाट निर्माण करत ग्रामस्थांच्या सहभागातुन गावात विकासगंगा आणली आहे. दि. १९ डिसेंबरला झालेल्या महाआरोग्य शिबीरात सात विवीध स्पेशालिस्ट डॉक्टरांनी गावातील विवीध प्रकारच्या अकराशे रूग्णांची तपासणी करत विक्रम केला असुन याचे सर्व नियोजन सरपंच रूक्मानंद खेत्रे, उपसरपंच गोविंद आगे, ग्रामविकास अधिकारी महेश गेंदले यांनी केले होते.

महाआरोग्य शिबीराचे उद्घाटन गटविकास अधिकारी जोत्सना मुळीक यांच्या हस्ते करण्यात आले. अध्यक्षस्थांनी तालुका आरोग्य अधिकारी डॉ. मधुकर घुबडे यांची उपस्थिती होती. प्रास्ताविकाम सरपंच रूक्मानंद खेत्रे म्हणाले की, किट्टी आडगावच्या सर्वांगीण विकासासाठी ग्रामपंचायतीने पुढाकार घेत आयुष्यमान भारत कार्ड वाटप शिबीर, आरोग्य व फिटनेस शिबीराचे आयोजन करण्यात आले. ज्याचा लाभ शेकडो ग्रामस्थांनी घेतला तर घरपट्टी आणि पाणीपट्टी भरणा-यांसाठी ५० टक्के सवलत जाहिर करून विक्रमी कर संकलन देखिल केले. गाव - खेड्याचा कणा असलेल्या शेतक-यांसाठी पोकरा व इतर योजेनांबाबत शेतकरी मेळावा व मार्गदर्शन शिबीर, गावातील महिला बचत गटांना बळ विवीध व्यवसायांचे मार्गदर्शन करून महिला सक्षमीकरणावर भर देण्यात आला. स्वच्छ किट्टी आडगाव, सुंदर किट्टी आडगाव ही संकल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी गावात मोठी स्वच्छता मोहिम राबविण्यात आली असल्याचे देखिल सरपंच रूक्मानंद खेत्रे यांनी सांगितले. या शिबीरात महिला, शाळकरी, किशोरवयीन मुलींची आरोग्य तपासणी करण्यात आली. रक्तदान शिबीर झाले. ग्रामस्थांची एचबी तपासणी, एक्सरे काढला असुन मेडिसिनचे देखिल वाटप करण्यात आले. ॲनेमिया तपासणी करून गाव ॲनेमिया मुक्त गाव झाले. या शिबीरास गावातील सर्व ग्रामस्थांची तसेच सर्व ग्रामपंचायत सदस्यांची उपस्थिती होती.

## जय भवानीच्या हंसराज जयस्वाल याची जुडो मध्ये राष्ट्रीय पातळीवर निवड

### महाविद्यालयात हंसराज जयस्वाल सत्कारीत



पाटोदा (प्रतिनिधी )दिनांक १३ डिसेंबर :- येथिल जय भवानी महाविद्यालयाचा खूळाडू हंसराज जयस्वाल यांने जुडो राज्यस्तरीय क्रिडा स्पर्धेत सुवर्ण पदक मिळवून त्याची राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.त्या बद्दल हंसराज जयस्वाल याचा महाविद्यालयात प्राचार्य डॉ. विश्वास कदम यांच्या शुभहस्ते सत्कार करण्यात आला.या प्रसंगी सर्व प्राध्यापक वृंद उपस्थित होते.हंसराज जयस्वाल यांनी मिळवलेल्या या यशाबद्दल त्याचे संस्थेचे संस्थापक अध्यक्ष माजी मंत्री मा. शिवाजीरावदादा पंडित, अध्यक्ष माजी आ.अमरसिंह पंडित,सचिव,मा. जयसिंह पंडित,आ.विजयसिंह पंडित,युवा नेते मा. रणविर काका पंडित,मा. पृथ्वीदादा पंडित, अमृत डावकर सर, प्रमोद गोरकर, प्रताप हातोटे, काशीनाथ गोगुले, दिलीपराव जाधव, मार्गदर्शक प्राचार्य डॉ. विश्वास कदम,प्राचार्य डॉ.सदाशिव सरकटे,प्रा. डॉ.सुनिल जाधव,प्रा. सोमनाथ घाडगे यांनी अभिनंदन करून राष्ट्रीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.हंसराज जयस्वाल यास क्रिडा विभागा प्रमुख प्रा.प्रविणकुमार शिलेदार यांचे अनमोल मार्गदर्शन मिळाले आहे.त्यांचे व खेळाडू हंसराज जयस्वाल यांचे सर्व स्तरातुन अभिनंदन!होत आहे.

# शुक्ल यजुर्वेदीय मध्यवर्ती मा.म. ब्राह्मण मंडळाच्या वतीने गेवराई येथील गुणवंत विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती वाटप




गेवराई ( प्रतिनिधी ) : मार्च २०२५ मध्ये झालेल्या १० वी १२ च्या परीक्षेत गेवराई तालुक्यातील उत्कृष्ट गुण प्राप्त केलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा बीड येथे गुणवत्तेनुसार २ व ३ हजार रुपये शिष्यवृत्ती देऊन गौरव करण्यात आला. याबाबत अधिक माहिती अशी की, शुक्ल यजुर्वेदी मा. म. ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ पुणे व शुक्ल यजुर्वेदीय शिक्षणोत्तेजक संस्था बीड यांच्या विद्यामाने बीड येथे पार पडलेल्या गुणवंत विद्यार्थी गुण गौरव समारंभात गेवराई तालुक्यातील १० व १२वी विद्यार्थ्यांना २००० व ३००० रुपये देऊन बीड येथे सन्मानित करण्यात आले. याप्रसंगी शुक्ल यजुर्वेदीय शिक्षणोत्तेजक संस्था, बीड अध्यक्ष ॲड कालिदास पांडुरंग थिगळे प्रा. विवेक वैद्य सचिव प्रभाकर सेल मोकर प्रा. शशिकांत पसारकर, दिलीप खिस्ती, नंदकुमार झरीकर ,सुधीर देशमुख कडा गेवराई येथील अनिल बोर्डे, यशवंत बंडू सुलाखे, मिलिंद मुळे आधी उपस्थित होते. गेवराई तालुक्यातील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देऊन गुणवंत विद्यार्थ्यांचा मान्यवराच्या हस्ते सत्कार करण्यात आला. त्यामध्ये गेवराई तालुक्यातील खालील विद्यार्थ्यांचा समावेश आहे.

चिन्मय कालिदास चोपडे, कु. मैत्री राजेंद्र मुळे, मुग्धा मिलिंद मुळे, ऋतुजा प्रभाकर मुळे, तुळजा संदीप देशपांडे ,कल्पेश कल्याण मुळे ,निखिल अनिल पेठे, श्रीराम शिवाजी जोशी ,गौरी आनंत दिवान धोत्रे ,कृष्णा गणेश सुरडीकर. शुक्ल यजुर्वेदीय शिक्षण उत्तेजक संस्था बीड यांनी दहावी व बारावी विद्यार्थ्यांनी दरवर्षी लाभ घेण्याचे आवाहन संयोजका वतीने करण्यात आले.

याप्रसंगी पालक व गुणवंत विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

DNS Bank Ltd. Ambajogai
ISO 9001:2008 Certified Bank.
दीनदयाळ नागरी सहकारी बँक म. अंबाजोगाई
"दीनदयाळ भवन" परळी रोड,अंबाजोगाई. फोन-(०२४४६) २४५१२६/२७/२९
Email ID - agmdeendayalbank@gmail.com

(सरफेसी कायदा,२००२ च्या २(१)(zd)नुसार परिभाषित केल्यानुसार सुरक्षित कर्जदार)

जा.क्र. सरफेसी/०४/७००२-४६५व७०२३-५९/२०४/२०२५-२६ दिनांक १८-१२-२०२५

नोंदणीकृत पोस्ट/जाहिरातीद्वारे

प्रति,

१. मे. सत्या मेडीकल ॲण्ड जनरल स्टोअर्स प्रोप्रा. सतिश हरिराम सानप(कर्जदार)
पत्ता:- देशमुख संकुल, टॉवर जवळ, परळी-वैजनाथ, जि.बीड ४३१ ५१५

२. सौ. द्रोपदी हरिराम सानप
पत्ता:- गुरु गल्ली, परळी-वैजनाथ, जि.बीड ४३१ ५१५

३. सौ.छाया हरिराम सानप
पत्ता:- स्वामी रामनंद तिर्थ मेडीकल कॉलेज ॲण्ड हॉस्पीटल,अंबाजोगाई,जि.बीड ४३१ ५१७

४. श्री. केशव रंगनाथ नागरगोजे
पत्ता:- सावतामाळी मंदीर, सावतामाळी परिसर, परळी-वैजनाथ, जि.बीड ४३१ ५१५

(कायद्याच्या 2(1)(f) मध्ये परिभाषित केल्यानुसार कर्जदार)

सिक्युरिटायझेशनच्या १३(२) अन्वये मागणी सुचना आणि आर्थिक मालमत्तेची पुनर्रचना आणि अंमलबजावणी सुरक्षा व्याज कायदा २००२

महोदय,

विषय:- नॉन-परफॉर्मिंग अकाऊंट अंतर्गत देय रक्कम काढुन टाकण्याची मागणी आमची शाखा:- परळी-वैजनाथ

सुचना:- U/S १३(२) आर्थिक मालमत्तेचे सुरक्षितीकरण आणि पुनर्रचना आणि सुरक्षा व्याज कायदा २००२ अंमलबजावणी.

१. तुमची सुचना क्र.०१ तुमच्या विनंतीनुसार आम्ही खालील क्रेडीट सुविधा मंजुर केल्या आहेत.
२. पासुन तुमचे कर्जखाते दिनांक ०८.०५.२०२५ पासुन एन.पी.ए. (NPA) झाले आहे.
३. क्रेडीट सुविधा, बँकेच्या नावे आकारलेले सिक्युरिटीज आणि सध्याची थकबाकी यांचे तपशील खालीलप्रमाणे आहेत:-

| क्रेडीट सुविधेचे स्वरुप आणि रक्कम | सुरक्षेचे तपशील/ गहाण ठेवलेली मालमत्ता | सध्याची थकबाकी |
| --- | --- | --- |
| खाते क्र. ७००२ - ४६५ रु.१५,००,०००/- | (मालमत्ता धारक:- सौ. द्रोपदी हरिराम सानप) जामीनदार/गहाणदार सौ. द्रोपदी हरिराम सानप यांच्या मालकीचे नगर परिषद हद्दीतील जुना घर क्र.४५५/२, ज्याचा सिटीएस क्र.१५३१, पुर्व बाजु क्षेत्रफळ पुर्व-पश्चिम-१५ फु. दक्षिण-उत्तर-२७ फु. एकुण क्षेत्रफळ ४०५ स्वे. फु.३७.६२ स्वे.मी., १०X१० फु. च्या ग्राऊड फ्लोअर २ रुम, १ दुकान ८ X १० फु. चे, पहिल्या मजल्यावर ३ रुम १०X१० फु. च्या सर्व आरसीसी बांधकाम गौण्ड गल्ली, परळी-वैजनाथ, ता.परळी-वैजनाथ,जि.बीड ज्याच्या चतु:सिमा खालीलप्रमाणे:- पुर्व:- दशरत चाटे पश्चिम:- दिपक देशमुख दक्षिण:- दिपक देशमुख उत्तर:- सरकारी रस्ता (''वरील मालमत्ता जशी आहे तशी व आहे त्या स्थितीत'') | खाते क्र.७००२-४६५ मुद्दल + व्याज एकुण रु.१३,४४,६३९.६०/-दिनांक ३०.११.२०२५ रोजी + पुढील व्याज @ ११.८५% दिनांक ०१.१२.२०२५ पासुन |
| खाते क्र. ७०२३ - ५९ रु.५,००,०००/- | | खाते क्र.७०२३-५९ मुद्दल + व्याज एकुण रु.४,८६,६०२.८८/-दिनांक ३०.११.२०२५ रोजी + पुढील व्याज @ १२.००% दिनांक ०१.१२.२०२५ पासुन |

- वरील तपशीलांमध्ये काही फरक आढळल्यास, कृपया मालमत्तेच्या मुळ कागदपत्रांनुसार विचार करा
- अज्ञात शुल्क असल्यास माहित नाही

४. घेतलेल्या क्रेडीट सुविधा विचारात घेऊन, तुम्ही खालील कागदपत्रे अंमलात आणली आहेत.
कर्जखाते क्र.७००२-४६५
अ. प्रॉमिसरी नोट, करार, धारणाधिकार पत्र दिनांक ०१.१२.२३
ब. गहाणखत नोंदणी दिनांक २१.०४.२०२३ (गहाणखत नोंदणी क्र.१३४४/२०२३)
कर्जखाते क्र.७०२३-५९
अ. प्रॉमिसरी नोट, करार, धारणाधिकार पत्र दिनांक ०१.१२.२०२३
ब. गहाणखत नोंदणी दिनांक २०.११.२०२३ (गहाणखत नोंदणी क्र.४२६१/२०२३)

५. म्हणजे, तुम्ही मंजुर केलेल्या अटी आणि नियमांचे पालन करण्यात अयशस्वी झाला आहात आणि कर्ज डिफॉल्ट केले आहे आणि तुमच्या खात्यानुसार रिझर्व्ह बँक ऑफ इंडीयाने जारी केलेल्या विहित नियमांनुसार बँकेने कर्जखाते NPA म्हणुन वर्गीकृत केले आहे. आम्ही वारंवार मागणी करुनही तुम्ही तुमच्या खात्यातील थकबाकीची रक्कम भरलेली नाही.

६. वर नमुद केलेल्या कायद्यान्वये बँकेला प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करुन, त्यामुळे तुम्हाला संपुर्ण रक्कम व्याजासह परत करण्याचे आवाहन केले आहे. १. खाते क्र.७००२-४६५ मुद्दल + व्याज एकुण रु.१३,४४,६३९.६०/-दिनांक ३०.११.२०२५ रोजी + पुढील व्याज @ ११.८५% दिनांक ०१.१२.२०२५ पासुन व २. खाते क्र.७०२३-५९ मुद्दल + व्याज एकुण रु.४,८६,६०२.८८/- दिनांक ३०.११.२०२५ रोजी + पुढील व्याज @ १२.००% दिनांक ०१.१२.२०२५ पासुन आणि वर उल्लेख केल्याप्रमाणे दिनांक १८.०२.२०२६ पर्यंत ही नोटीस मिळाल्याच्या तारखेपासुन ६० दिवसांच्या आत, बँकेला उपलब्ध असलेल्या इतर अधिकारांचा पुर्वग्रह न ठेवता, बँक वरील कलम १३ च्या कलम ४ अंतर्गत कोणतेही अणि/किंवा सर्व अधिकार वापरेल. या कायद्यांतर्गत लागु होणा-या सिक्युरिटीज/मालमत्तेच्या संदर्भात कायदा, ज्या बाबतीत त्याच्या इतर आनुषंगिक प्रभारांचा सर्व खर्च, शुल्क आणि खर्च भरण्यास देखील जबाबदार असेल इतर गोष्टी बरोबरच कायद्यांतर्गत उपलब्ध अधिकारांमध्ये हे समाविष्ट आहे:

अ) सुरक्षित मालमत्तेचा ताबा घेणे ज्यामध्ये वर नमुद केल्याप्रमाणे सिक्युरिटी व्याज तयार केले आहे तसेच लीज,असाइनमेंट किंवा विक्रीद्वारे हस्तांतरित करण्याचे अधिकार.
ब) सुरक्षित मालमत्तेचे व्यवस्थापन ताब्यात घेणे, ज्यात भाडेपट्टी, असाइनमेंट किंवा विक्रीद्वारे हस्तांतरण करण्याचा अधिकार समाविष्ट आहे.
क) सुरक्षित मालमत्तेचे व्यवस्थापन करण्यासाठी व्यवस्थापक म्हणुन कोणत्याही व्यक्तीची नियुक्ती करण्यासाठी, ज्याचा ताबा आमच्याकडुन घेतला जाईल आणि व्यवस्थापक सुरक्षित मालमत्तेचे व्यवस्थापन करील आणि सुरक्षित मालमत्तेचे कोणतेही हस्तांतरण हस्तांतरित करणा-याकडे किंवा त्यासंबंधीचे सर्व अधिकार असतील. सुरक्षित मालमत्ता जसे की आपण हस्तांतरण केले आहे.
ड) कोणत्याही व्यक्तीला लेखी पत्र लिहिणे किंवा नोटीस जारी करणे, ज्याने कोणत्याही सुरक्षित मालमत्तेचा ताबा घेतला आहे ज्याच्याकडुन सिक्युरिटी व्याज तयार केले गेले आहे ज्यांच्याकडुन आम्हाला पैसे देणे बाकी आहे किंवा तुमच्यामुळे होऊ शकते.

७) कृपया लक्षात घ्या की कायद्याच्या कलम १३(१३) नुसार, ही नोटीस मिळाल्यानंतर, तुम्हाला बँकेच्या पुर्व लेखी संमतीशिवाय या सुरक्षिततेची विल्हेवाट लावण्यापासुन किंवा हाताळण्यापासुन प्रतिबंधित केले आहे.

ठिकाण:- अंबाजोगाई

श्री.अनंत गोपाळराव देशपांडे
अधिकृत अधिकारी (सेक्युअर क्रेडीटर)
दीनदयाळ नागरी सह.बँक म.अंबाजोगाई
मुख्यालय-अंबाजोगाई मो.७६६६५७७९००

# महसूल विभागाची प्रलंबीत प्रकरणे तत्काळ निकाली काढा- विभागीय आयुक्त पापळकर



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १९ डिसेंबर**
जिल्ह्यातील जमिनीच्या मालकी हक्कासंदर्भातील फेरफार नोंदी, अतिरिक्त नोंदी तसेच अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेली महसूलविषयक प्रकरणे कोणतीही दिरंगाई न करता तात्काळ निकाली काढावीत. शेतकरी व नागरिकांना महसूल कार्यालयांमुळे अनावश्यक त्रास होऊ नये, याची जबाबदारी प्रशासनाने घ्यावी, असे निर्देश विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी दिले.
जिल्हाधिकारी कार्यालयातील जिल्हा नियोजन समितीच्या सभागृहात आयोजित महसूल विभागाच्या सविस्तर आढावा बैठकीत ते बोलत होते. या बैठकीस जिल्हाधिकारी राहुल गुप्ता, मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड, अपर जिल्हाधिकारी महेंद्रकुमार कांबळे, सहाय्यक जिल्हाधिकारी योगेशकुमार मीना, निवासी उपजिल्हाधिकारी अभिमन्यू बोधवड, उपजिल्हाधिकारी मंजुषा मुथा, उपजिल्हाधिकारी (निवडणूक) प्रगती चौंडेकर यांची उपस्थिती होती.
यावेळी विभागीय आयुक्तांनी ई-चावडी प्रणाली, गाव नमुने क्रमांक १ ते २१ अद्ययावत भरणे, डी-४ घोषणापत्रे पूर्ण करणे, ॲग्रीस्टॅक योजनेअंतर्गत शेतजमिनींच्या नोंदी अचूकपणे करण्याबाबत सूचना दिल्या. पाच गुंठ्यांपेक्षा कमी क्षेत्र असलेल्या प्लॉट वगळण्याची प्रक्रिया, अतिक्रमण प्रकरणे, तसेच सौर ऊर्जा प्रकल्पांसाठी आवश्यक जमीन उपलब्ध करून देण्याच्या प्रक्रियेचा सविस्तर आढावा घेण्यात आला. महावितरण कंपनीकडून दाखल प्रलंबित प्रस्ताव व संबंधित क्षेत्रांसाठी लागणाऱ्या जमिनी बाबत चर्चा करण्यात आली.
'जिवंत सातबारा' अभियानाची सद्यस्थिती, जिल्ह्यातील अकृषक सातबारा वेगळे करण्याची कार्यवाही, डिमार्केशनपूर्वी केजीपी करणे, तसेच ज्या सातबारामध्ये कृषी व अकृषक क्षेत्र एकत्र नोंदलेले आहे ते नियमानुसार एकत्र ठेवणे अथवा आवश्यकतेनुसार वेगळे करण्याबाबत स्पष्ट निर्देश देण्यात आले. या प्रक्रियेत कोणतीही चूक राहू नये, यासाठी महसूल अधिकाऱ्यांनी विशेष दक्षता घ्यावी, असेही त्यांनी नमूद केले.
गौण खनिज विभागांतर्गत शासकीय वसुली, नियोजन व अंमलबजावणी, गौण खनिज स्वामित्व शुल्काची प्रभावी वसुली, तसेच जिल्ह्यातील ४३ वाळू घाटांच्या निविदा व लिलाव प्रक्रियेबाबत माहिती घेण्यात आली. लिगो संदर्भात महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे अतिरिक्त जमिनीच्या मागणीसाठी पत्रव्यवहार करण्यात आल्याचे यावेळी सांगण्यात आले. अवैध गौण खनिज उत्खननप्रकरणी केलेल्या कारवाईचाही आढावा घेण्यात आला.
याशिवाय गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार, 'पीएम किसान' योजनेंतर्गत प्राप्त तक्रारीचे निराकरण, मोबाईलद्वारे सेवादूत सेवा, ई-ऑफिस प्रणालीच्या अंमलबजावणीची प्रगती, महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम व 'आपले सरकार' पोर्टलवर प्राप्त तक्रारींचे वेळेत निवारण करण्याचे निर्देश देण्यात आले. जमीन-२, आस्थापना तसेच गौण खनिजांशी संबंधित सर्व प्रकरणे तात्काळ निकाली काढण्याचे आदेश जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले.
पदभरती व पदोन्नतीची प्रकरणे निवडणुकीची आदर्श आचारसंहिता संपल्यानंतर पूर्ण करण्यात येतील, असे स्पष्ट करतानाच विभागीय चौकशी प्रकरणे, जन्म-मृत्यू नोंदणी, नॉन-क्रीमीलेअर प्रमाणपत्रे, सामूहिक वनहक्क दावे आदी नागरिकांशी थेट संबंधित प्रकरणे प्राधान्याने व तातडीने निकाली काढावीत, असे निर्देश विभागीय आयुक्त श्री. जितेंद्र पापळकर यांनी दिले. या बैठकीला उपजिल्हाधिकारी (सा.प्र.) अनिल माचेवाड, उपविभागीय अधिकारी विकास माने, समाधान घुटुकडे, प्रतीक्षा भुते, तहसीलदार श्रीकांत भुजबळ, जीवक कांबळे, शारदा दळवी यांच्यासह संबंधित विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

# आज वसमत नगर पालिकेसाठी मतदान

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १९ डिसेंबर**
वसमत नगर पालिका निवडणुकीसाठी दि २० डिसेंबर रोजी ७२ मतदान केंद्रावर सकाळी साडेसात ते सायंकाळी साडेपाच वाजेपर्यंत मतदान होणार आहे तसेच हिंगोली नगर पालिकेसाठी दोन प्रभागातही मतदान होणार आहे.
वसमत नगर पालिकेच्या नगराध्यक्षपद व १५ प्रभागातील ३० नगरसेवक पदासाठी दि २० डिसेंबर रोजी मतदान प्रक्रिया होणार आहे. मतदान प्रक्रियेसाठी प्रशासन सज्ज झाले असून उपविभागीय अधिकारी विकास माने, तहसीलदार शारदा दळवी यांच्या मार्गदर्शनाखाली मतदान प्रक्रियेचे नियोजन करण्यात आले आहे. शहरातील एकूण ७२ मतदान केंद्रावर मतदान होणार असून ५९ हजार ८५५ मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहेत. मतदान प्रक्रियेसाठी ५०० कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. प्रत्येक मतदान केंद्रावर प्रत्येकी पाच मतदान कर्मचारी नियुक्त करण्यात आले आहेत. शहरातील संवेदनशील मतदान केंद्रांवर वाढीव पोलिस बंदोबस्त लावण्यात आला आहे. तसेच इतर मतदान केंद्रावरही पोलिस तैनात करण्यात येणार आहेत. एका मतदाराला नगराध्यक्षपदासाठी एक तर नगरसेवक पदासाठी दोन असे तीन मतदान करावे लागणार आहे.
वसमत नगर पालिका निवडणुकीत महाविकास आधाडीच्या काँग्रेसच्या उमेदवार सीमा अब्दुल हाफीस, भाजपच्या सौ बोड्डेवार, राष्ट्रवादी अजित पवार गट व शिवसेना शिंदेगटाचे उमेदवार निवडणुकीत त्यांचे भवितव्य अजमावणार आहेत. शिवसेना व राष्ट्रवादी अजित पवार गटाने याठिकाणी भाजपला बाजूला ठेवत युती केली आहे.
हिंगोली शहरातील प्रभाग क्र, ५ व प्रभाग क्र ११ या दोन प्रभागातील निवडणुकीसाठी शनिवारी मतदान होणार आहे. मागील अनेक दिवसांपासून निकालाची नागरिकांना लागलेली प्रतिक्षा संपणार असून दि २१ डिसेंबर रोजी मतमोजणी होणार आहे.

# भाजपचे आ. तान्हाजी मुटकुळेंकडून प्रज्ञा सातव यांचा सत्कार



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १९ डिसेंबर**
काँग्रेसच्या आ. डॉ प्रज्ञा सातव यांनी मुंबई येथे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण आणि महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये गुरूवारी भारतीय जनता पक्षात प्रवेश केला. यानंतर त्या हिंगोली येथे आल्या असता भारतीय जनता पक्षाचे आ. तान्हाजीराव मुटकुळे यांनी त्यांचा सत्कार केला.
काँग्रेसच्या विधान परिषदेच्या सदस्या डॉ प्रज्ञा सातव यांनी गुरूवार दि १८ डिसेंबर रोजी मुंबई येथे भाजपमध्ये त्यांच्या समर्थकांसह प्रवेश केला. या प्रवेशामुळे कळमनुरीत भाजपला चांगली ताकद मिळाली आहे. आगामी जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीत कळमनुरी मतदारसंघात डॉ सातव यांच्यामुळे भाजपला चांगले यश मिळण्याची शक्यता वर्तवली जात आहे. भाजपमध्ये प्रवेशानंतर डॉ प्रज्ञा सातव या शुक्रवारी हिंगोलीत दाखल झाल्या. यावेळी भाजपचे आ. तान्हाजीराव मुटकुळे यांनी त्यांचा सत्कार केला. यावेळी माजी नगराध्यक्ष बाबाराव बांगर, युवा जिल्हाध्यक्ष शिवाजीराव मुटकुळे, मिलींद यंबल, महेश शहाणे, पवन उपाध्ये, क्रिष्णा रूहीटीया, माजी नगरसेवक उमेश गुठ्ठे, बंडू कऱ्हाळे, बाहेती, नायक यांच्यासह मोठ्या संख्येने पदाधिकारी व कार्यकर्ते यांची उपस्थिती होती. त्यानंतर भाजपचे आ. तान्हाजीराव मुटकुळे यांच्या निवासस्थानीही डॉ प्रज्ञा सातव यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी आ. मुटकुळे यांचे कुटुंबिय उपस्थित होते.



**हिंगोली- हिंगोली नगर पालिका निवडणुकीसाठी दोन प्रभागात शनिवारी मतदान प्रक्रिया पार पडणार आहे. या मतदान केंद्रावर नियुक्त मतदान अधिकारी व कर्मचारी निवडणुकीचे साहित्य तपासत असतांना दिसत आहेत. छाया- विजय गुंडेकर**

## संक्षिप्त वृत्त

### स्वाधार योजनेसाठी ३१ डिसेंबरपर्यंत मुदतवाढ

हिंगोली- शासकीय वसतिगृहात प्रवेश घेण्यास पात्र असतानाही प्रवेश न मिळालेल्या तसेच निवास, भोजन व इतर सुविधांअभावी पुढील शिक्षण घेऊ न शकणाऱ्या अनुसूचित जाती व नवबौद्ध प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना राबविण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत इयत्ता ११ वी, १२ वी तसेच १२ वी नंतरच्या व्यावसायिक व बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमांना विविध स्तरावरील महाविद्यालये व शिक्षण संस्थांमध्ये प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांना शासकीय वसतिगृहातील सुविधा स्वतः उपलब्ध करून घेण्यासाठी आवश्यक रक्कम थेट आधारसंलग्न बँक खात्यात जमा करण्यात येते. शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठी या योजनेचे अर्ज ऑनलाईन पद्धतीने भरण्यासाठी ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. पात्र विद्यार्थ्यांनी संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज भरावा. तसेच भरलेल्या अर्जाची प्रिंट आवश्यक कागदपत्रांसह सहायक आयुक्त, समाज कल्याण कार्यालयास सादर करावी. अनुसूचित जाती व नवबौद्ध प्रवर्गातील जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी या योजनेचा लाभ घेण्यासाठी विहित मुदतीत आपला अर्ज सादर करावा, असे आवाहन समाज कल्याण विभागाच्या सहायक आयुक्त गिता गुठ्ठे यांनी केले आहे.

### तीन मंगल कार्यालयांना पोलिसांची नोटीस

हिंगोली- शहरानजीक असलेल्या साई रिसॉर्ट, मधुरदीप मंगल कार्यालय, राणीसती मंगल कार्यालयांना ग्रामीण पोलिस ठाणे पोलिसांनी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ कलम १६८ नुसार नोटीसा बजावल्या आहेत. मंगल कार्यालयाच्या मालकांनी वाहनांसाठी पार्कींगची सुविधा, ध्वनी प्रदुषण होऊ नये यासाठी घ्यावयाची खबरदारी तसेच पिण्याचे पाणी, प्रथमोपचार सुविधा परिसरात स्वच्छता ठेवावी, घोषणाबाजी, डीजेचा वापर करण्यावर बंदी आदी महत्वाच्या बाबी द्याव्यात असे आवाहन केले आहे. सदरील अटींचे उल्लंघन केल्यास अथवा कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्यास, अनुचीत प्रकार घडल्या संबंधित आयोजकांवर कार्यवाही करण्याचा इशारा देण्यात आला आहे.

### हिंगोलीत काँग्रेस कार्यालयाचे उद्घाटन



हिंगोली- काँग्रेसच्या नवीन जिल्हा कार्यालयाचे गुरूवारी काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष ॲड सचिन नाईक यांचेहस्ते उद्घाटन करण्यात आले. यावेळी पक्ष निरीक्षक साहेबराव कांबळे, जिल्हाध्यक्ष सुरेशअप्पा सराफ, विनायक देशमुख, डॉ रमेश शिंदे, गजानन देशमुख आदींची उपस्थिती होती.

{XA}

# एबीएम इंग्लीश स्कुलमध्ये वार्षिक स्नेह संमेलन उत्साहात संपन्न



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १९ डिसेंबर**
शहरातील एबीएम इंग्लिश हायस्कूल येथे वार्षिक स्नेहसंमेलन मोठ्या उत्साहात पार पडले या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हाधिकारी राहुल गुप्ता, शिक्षण अधिकारी असावरी काळे, जिल्हा क्रीडा अधिकारी राजेश मारावार, ज्योती कंदी, समकीत दोडल, तसेच संस्थेचे अध्यक्ष दिलीप बांगर, अजिंक्य बांगर, शाळेचे मुख्याध्यापक जोसेफ के जे, उपमुख्याध्यापक आदेश बोराळकर आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.
शाळेत पारंपारिक खेळाचे आयोजन करत असताना मल्लखांबच्या विद्यार्थ्यांचे त्यांनी भरभरून कौतुक केले.
शाळेच्या सांस्कृतिक कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी महाराष्ट्राच्या आराध्य दैवत असणाऱ्या पंढरपूरचा वारसा घेत त्यानिमित्ताने कार्यक्रम सादर केले त्यामध्ये लोकगीत, लोकनाट्य, भारुड, लावणी, गवळणी भजन, कीर्तन, गोंधळ, वासुदेव अशा अनेक नयनरम्य असे कलाप्रकार सादर केले. हे सर्व कार्यक्रम पाहून उपस्थित पालक वर्ग अगदी भारावून गेला खरोखरच त्यांनी अगदी नर्सरी पासून ते इयत्ता दहावी पर्यंतच्या विद्यार्थ्यांनी महाराष्ट्राच्या कलागुणांना व संस्कृतींना लक्षात घेऊन अत्यंत उत्कृष्ट पद्धतीचे कलागुण सादर केले पालकांनी भरभरून कौतुक केले. शेवटी सर्वांनी मिळून महाराष्ट्रातील कलागुणांचा गजर करत दिंडी कार्यक्रम काढला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व शिक्षक शिक्षकात्तर कर्मचारी विद्यार्थी पालक वर्ग यांचे अत्यंत मोलाचे सहकार्य लाभले.

# पर्यावरण जनजागृतीसाठी हिंगोली ते कन्याकुमारी सायकलने प्रवास



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १९ डिसेंबर**
देशभरात सुरू असलेली पर्यावरणाची हानी, सार्वजनिक ठिकाणी नागरिकांकडून होणारी अस्वच्छता टाळण्यासाठी हिंगोली मधील एका सेवानिवृत्त स्थापत्य अभियंत्याने हिंगोली ते कन्याकुमारी असा १५७० किलोमीटरचा सायकलवर प्रवास सुरू करत जनजागृती करण्याचा नवा संकल्प केला आहे,
गंगा नगर भागातील सेवानिवृत्त अभियंता रमेश सानप हे जनजागृतीसाठी सायकलवर प्रवास करणार आहेत. या प्रवासादरम्यान स्वच्छता पर्यावरण आणि मतदान जनजागृतीचा संदेश ते देशवासीयांना देणार आहेत, यापूर्वी देखील त्यांनी हिंगोली ते कारगिल असा हजारो किलोमीटरचा प्रवास करत स्वातंत्र्यदिनाच्या दिवशी भारताचा तिरंगाध्वज फडकवला होता, रमेश सानप यांनी महाराष्ट्रातील प्रमुख धार्मिक स्थळावर देखील सायकल वरून दाखल होत स्वच्छतेचा संदेश देत जनजागृती केली आहे त्यांच्या या सायकल प्रवासाला सायकल प्रेमींनी शुभेच्छा देत त्यांना कन्याकुमारी येथे जाण्यासाठी रवाना केले. या वेळी मनोज पिंनगाळे, अनिल वडवाळकर, नितीन घन, संतोष बाराटे, इद्रिस चाऊस, शिवचरण ठाकूर, डॉ.गजानन शिंदे, प्रवीण काळबांडे, गजानन घुगे, राजेश पांडे, मारुती बोबडे,कराळे, संतोष केकान, बाळू बांगर आदींची उपस्थिती होती.

# आजची तरूणाई संवाद विसरत चालली आहे- उध्दव बापू फड



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १९ डिसेंबर**
आज देशातील तरुणाई दिशाहीन होत चालली आहे का? या अत्यंत महत्वाच्या विषयाची सुसंगत मांडणी केली. त्यांच्या मते आजचा तरुण हा भरकटलेला नसून भटकलेला आहे तो त्याच्या मूळ रस्ता विसरलश्र असून त्याला योग्य अशा मार्गदर्शकाची अत्यंत गरज आहे. आजची तरुण पिढी योग्य व वळणाने जाण्यासाठी त्यांचे आदर्श योग्य असणे महत्वाचे आहे. पंगत चुकली तरी चालेल परंतु संगत चुकू नये असा अनमोल विचार त्यांनी मांडला. इतिहासातील तरुण किती कर्तबगार होता हे सिद्ध करण्यासाठी त्यांनी अनेक उदाहरणे देऊन स्पष्टिकरण केले. सत्कर्म करणारे हात वाढले तर तरुण पिढी ही कधीच दिशाहीन होणार नाही. आजच्या तरुणाईने व्यसनाला दूर सारत, स्वतःला निर्व्यसनी व सामर्थ्यशाली बनवावे असा सल्ला व्याख्याते उध्दव बापू फड यांनी दिला.
येथील श्री संत भगवान बाबा प्रतिष्ठान हिंगोली यांच्या वतीने आयोजित राष्ट्रीय लोकनेते गोपीनाथराव मुंडे व्याख्यानमालेचे चौथे पुष्प महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध व्याख्याते तथा संवादयात्री उद्धव बापू फड यांनी गुंफले.
या कार्यक्रमाच्या अध्यक्ष पदी अमित मुंढे गटविकास अधिकारी कळमनुरी, उद्घाटक म्हणून कुंदनकुमार वाघमारे पोलिस उप अधीक्षक हिंगोली, प्रमुख अतिथी म्हणून बसंत भट्ट सामाजिक कार्यकर्तेनीरज देशमुख, रंजित देशमुख उप अभियंता महाराष्ट्र विद्युत मंडळ, संजय मोरे, सत्कारमूर्ती योगेश सांगळे व त्यांच्या मातोश्री ग्रामीण व शहरी भागातून आलेले श्रोते व प्रतिष्ठानचे पदाधिकारी आदी उपस्थित होते.
राष्ट्रसंत भगवान बाबा व राष्ट्रीय लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांच्या प्रतिमेचे पूजन करून दीप प्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. यावेळी योगेश सांगळे यांची इस्रो येथे शास्त्रज्ञ म्हणून निवड झाल्याबद्दल सहपरिवार उपस्थित मान्यवर यांच्या हस्ते प्रतिष्ठांच्या वतीने सन्मान करण्यात आला.
प्रमुख अतिथी बसंत भट्ट यांनी सोशल मीडियामुळे जग हे आभासी झाले असून युवकांमध्ये संवाद हरवत चालल्याची खंत व्यक्त केली. विचाराच्या शुद्धतेसाठी अशा व्याख्यानमाला आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.
या कार्यक्रमाप्रसंगी अध्यक्षीय समारोप करताना अमित मुंढे यांनी आजच्या तरुणाईने नवीन तंत्रज्ञानाची जोड आपल्या विकासासाठी लावावी तसेच विविध कोर्स, ॲप्लिकेशन, गुंतवणूक इत्यादी बाबतीत तरुण वर्गाने स्वतःला आत्मनिर्भर करण्याचा मोलाचा सल्ला दिला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ विजय वाघ प्रास्ताविक रघुनाथ घुगे, व्याख्यातेचा परिचय अमर घुगे व आभार प्रदर्शन गोपाल बांगर यांनी केले. लोकनेते गोपीनाथराव मुंडे व्याख्यानमाला यशस्वी करण्यासाठी श्री संत भगवान व प्रतिष्ठानचे मेजर पंढरीनाथ घुगे, एकनाथ कुटे, प्रा. मुरलीधर जायभाये, संजय बांगर, कैलासराव बांगर, संजय चाटे, राजकुमार मोरगे, पिंटू उर्फ संदीप नागरे, डॉ सुधीर वाघ, डॉ. नागेश बांगर, गोपाल बांगर, पदाधिकारी ग्रामीण भागातील बासंबा, कोथळज, हिंगणी, खेड, येडूत हिवराबेल, सालेगाव,सेलसुरा व औंढा व सेनगाव तालुक्यातून अनेक गावातील जाणते श्रोते मंडळी व हिंगोली शहरातील नागरिक यांनी सहकार्य व परिश्रम घेतले.

# आदर्श आचारसंहिता : कायदा व सुव्यवस्थेसाठी पालिका व पोलीस प्रशासनाची संयुक्त बैठक

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १९ डिसेंबर-**

राज्य निवडणूक अयोगाच्या आदेशानुसार राज्यातील एकुण २९ महानगरपालिकांचा निवडणूक कार्यक्रम जाहिर करण्यात आला असुन त्यामध्ये नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेचा सुध्दा समावेश आहे. राज्य निवडणूक आयोगाने निर्देशीत केल्यानुसार दि.१५ डीसेंबर पासुन पालिका हद्दीत आदर्श आचारसंहिता लागु करण्यात आली असुन याच पार्श्वभुमीवर महापालिकेत दि.१९ डीसेंबर रोजी मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. महेशकुमार डोईफोडे व पोलीस अधिक्षक अबिनाश कुमार यांच्या प्रमुख उपस्थित बैठक घेण्यात आली. या बैठकीस सर्व निवडणूक निर्णय अधिकारी, आचारसंहिता कक्ष प्रमुख, उपविभागीय पोलीस अधिकारी, सर्वसहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी, मनपा हद्दीतील पोलीस ठाण्याचे सर्व पोलीस निरीक्षक उपस्थित होते.

बैठकीच्या प्रारंभी निवडणूक विभागाचे उपआयुक्त नितीन गाढवे यांनी निवडणूकीचे टप्पे अर्थात प्रभाग रचना, आरक्षण निश्चीती, मतदार यादी, मतदार केंद्र निश्चिती, निवडणूक निर्णय अधिकारी नियुक्ती व निवडणूक कार्यक्रम यावर प्रकाश टाकला. आदर्श आचारसंहितेच्या प्रभावी अंमबजावणीसाठी उपजिल्हाधिकारी संतोषी देवकुळे यांच्या अधिपत्याखाली पालिका मुख्यालयात आचारसंहिता कक्ष स्थापण करण्यात आला आहे त्याचप्रमाणे ७ भरारी पथके, १५ स्थिर सर्व्हेक्षण पथक व ७ व्हिडीओ सर्व्हिलियंस पथकांची स्थापणा करण्यात आली असुन या सर्व पथकांचे संचलन आचारसंहिता कक्षातुन पार पाडण्यात येणार असल्याचे यावेळी मनपा आयुक्तांनी सांगितले. त्याचप्रमाणे माध्यम क्षेत्रातील पेड न्युज इत्यादीवर नजर ठेवण्यासाठी प्रसार माध्यम प्रमाणन व संनियंत्रण समिती स्थापन करण्यात आली आहे.

त्याचप्रमाणे कायदा व सुव्यवस्था राखणे-प्रतिबंधात्मक उपाययोजनांसह संवेदनशील भागांसाठी विशेष व्यवस्था, आर्थिक बळाचा दुरुपयोग टाळणे, मतदारांवर प्रभाव टाकण्याकरिता देण्यात येणाऱ्या वस्तु, मद्य, पैसा इत्यादींच्या वाटपावर अंकुश ठेवणे, रोख रक्कमांच्या ने-आणी संदर्भात लक्ष ठेवणे त्यासाठी महत्वाच्या ठिकाणी उदा. विमानतळ, रेल्वेस्टेशन, हॉटेल्स, फार्महऊस यांच्या नजर ठेवणे, बँकामार्फत, पतसंस्थेमार्फत होणाऱ्या मोठ्या व संशयास्पद आर्थिक व्यवहारांवर लक्ष ठेवणे तसेच निवडणूक आयोगाच्या आदेशाप्रमाणे पेड न्यूज, सोशल कमेंट, सोशल मिडीया व इंटरनेट इत्यांदीवर लक्ष ठेवण्यात येणार असल्याचे पालिका आयुक्त व पोलीस अधिक्षकांनी स्पष्ट केले.

पोलीस अधिक्षक अबिनाश कुमार यांनी बैठकीस उपस्थित पोलीस अधिकाऱ्यांना सुचना करत आप-आपल्या क्षेत्रातील संवेदनशील मतदान केंद्र परिसरांना भेटी देऊन मतदारांचा विश्वास संपादन करण्यासाठी निर्देशीत केले त्याचप्रमाणे यापूर्वीच्या कोणत्याही निवडणूकीतील कायदा व सुव्यवस्था बिघडलेल्या संवेदनशील मतदान केंद्र व सभोवतालचा परिसर यावर विशेष लक्ष देण्याचे सुध्दा आदेश देतांना कार्यक्षेत्रात गैरकायदेशीर शस्रे, दारु, स्फोटके याबाबत माहिती घेऊन त्यावर त्वरीत कार्यवाही करण्यात येणार असल्याचे यावेळी पोलीस अधिक्षकांनी स्पष्ट केले. एकंदरीत निवडणूक कालावधीत शहरातील कायदा व सुव्यवस्था कोणत्याही परिस्थित बिघडू देणार नाही अशी स्पष्टोक्ती यावेळी पोलीस अधिक्षक अबिनाश कुमार यांनी केली आहे.

# चिमटा धरणविरोधक जरांगे पाटीलांच्या भेटीला; धरण विरोधी संघर्ष समिती सोबत समाधानकारक चर्चा

**तभा वृतसेवा**
**माहूर, दि. १९ डिसेंबर-**



चिमटा धरण अर्थात निम्न पैनगंगा प्रकल्प विदर्भ- मराठवाडा धरण विरोधी संघर्ष समितीचे पदाधिकारी व प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांनी १५ वाहनांच्या ताफ्यासह जवळपास तब्बल २०० शेतकऱ्यांनी आज मराठा संघर्ष योध्दा मनोज जरांगे पाटील यांची अंतरवाली सराटी येथे त्यांच्या राहत्या घरी दुपारी १२ वाजता भेट घेतली.ही भेट माहूर तालुक्याचे सर्वसामान्यांचे धडाकेबाज युवा नेतृत्व त्रिशुल पाटील यांच्या यशस्वी मध्यस्थीने घडवून आली.

तब्बल दोन तास निम्न पैनगंगा प्रकल्पाच्या प्रत्येक बाजूवर सविस्तरपणे चर्चा करण्यात आली. यावेळी मनोज जरांगे पाटील यांनी निम्न पैनगंगा प्रकल्पाची प्रत्येक बारीकसारीक बाजू समजून घेतली. त्यानंतर एक क्टिव्ह आंदोलनकर्ते म्हणून ख्यातनाम असलेल्या जरांगे पाटील यांनी लगेच क्शन मोडवर येत जलसंपदा मंत्री ना. गिरीश महाजन यांना दूरध्वनीवरून संपर्क करून त्यांना निम्न पैनगंगा प्रकल्प ऊर्फ चिमटा धरण याबाबत लोकांचा विरोध असल्याचे कळविले.तसेच महानगरपालिकेच्या निवडणुकीनंतर आपण जलसंपदा मंत्री ना.गिरिश महाजन व महाराष्ट्राचे मुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत धरण विरोधी संघर्ष समितीची बैठक लावून देऊ, असे आश्वासन यावेळी दिले.

यावेळी धरणं विरोधी संघर्ष समितीचे मुबारक तंवर, प्रल्हादराव गावंडे सर,बंडू नाईक,बंटी पाटील जोमदे, उत्तमराव भेंडे,गजानन डाखोरे,भगवतीप्रसाद तितरे यांच्यासह जवळपास दोनशे प्रकल्पग्रस्त धरण विरोधक उपस्थित होते.

## माळेगाव लावणी महोत्सवासाठी अनुराधा नांदेडकरांच्या लावण्यवतींचा सराव सुरू

**बिलोली** -दर वर्षा प्रमाणे याही वर्षी महाराष्ट्राच्या लोककलेचा सन्मान करण्याच्या उद्देशाने नांदेड जिल्ह्यातील माळेगावच्या लावणी महोत्सवाची सुरवात दि.२२ डिसेंबर रोजी होणार आहे.या वेळी महाराष्ट्रातील नामवंत लावणी संचाचा समावेश होणार असून यामध्ये पुरस्कार प्राप्त प्रेम कुमार मस्के व अनुराधा नांदेडकर यांच्या लावणी संचाचा समावेश करण्यात आला आहे. सदर लावणी महोत्सवास अनुसरून विविध नृत्यागंनाच्या उपस्थितीत पिढ्यानपिढ्या मराठी माणसाच्या मनावर अधिराज्य गाजवणाऱ्या लावणीच्या घुंगराचा नाद रसिकांच्या कानी घुमवण्यासाठी गायीका अनुराधा नांदेडकर यांच्या लावणी संचाचा सराव सुरू झाला आहे.या संचात प्रामुख्याने अल्का पुणेकर,पूर्वा पुणेकर,अंजली संभाजीनगरकर,श्रुती संभाजीनगरकर या विशिष्ठ लावण्यवतीसह नृत्यांगणा आपली कला सादर करणार आहेत.याबाबत या संचाच्या गायीका अनुराधा नांदेडकर म्हणाल्या की,महाराष्ट्रातील माळेगाव महोत्सवासाठी प्रशासनाने पाचारण केलेल्या लावणी संचात गेल्या कांही वर्षा पासून नांदेडला संधी देण्यात येत असून यामध्ये नांदेडकरांची मान उंचावेल अशीच लावणी सादर करणार असे म्हणाल्या.




## निखिलेश देशमुख यांचा काँग्रेसमध्ये प्रवेश

**नवीन नांदेड** -सिडकोतील रहिवासी भाजपाचे जिल्हा सरचिटणीस युवा मोर्चाचे निखिलेश देशमुख यांनी सहकारी कार्यकर्त्यासह नांदेडचे लोकप्रिय खासदार रवींद्र चव्हाण यांच्या उपस्थितीत आय काँग्रेसमध्ये प्रवेश केला आहे. सिडको हडको भागातील वास्तव्यास असलेले व भाजपा युवा मोर्चाचे सरचिटणीस या पदावर असलेले निखिलेश देशमुख यांनी आय काँग्रेसमध्ये प्रवेश केला असून चालू असलेल्या सार्वत्रिक मनापा निवडणुका २०२५ च्या प्रभाग १९ मधून सर्वसाधारण महिला प्रवर्गातून आय काँग्रेसकडून त्यांच्या आई कमल चंद्रकांतराव देशमुख ह्या निवडणूक लढवणार असल्याचे सांगितले आहे. निखिलेश देशमुख हे गेल्या अनेक वर्षापासून सामाजिक चळवळीतून आपले कार्य बजावत असून ते भाजपसी एकनिष्ठतेने काम करत होते पण भाजपने या निवडणुकीतून डावळल्याने त्यांनी लगेच आपले मिशन आय काँग्रेसकडे वळवून प्रभाग १९ वसरणी मधून निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतला आहे. या पक्षप्रवेशा समयी नांदेड जिल्ह्याचे खासदार रवींद्र चव्हाण, माजी उपमहापौर अनंत चव्हाण, माजी शिक्षण सभापती संजय बेळगे, युवक जिल्हाध्यक्ष शंकर शिंदे, नवीन नांदेड शहराध्यक्ष युवक काँग्रेस प्रसेनजीत वाघमारे यांच्यासह आजी-माजी पदाधिकारी यांची उपस्थिती होती निखिलेश देशमुखच्या पक्षप्रवेशाने आय काँग्रेस मधील पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी त्यांच्या अभिनंदन करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या आहेत.



## तलाठी व मंडळ अधिकारी यांना नवीन लँपटॉप उपलब्ध करून देण्याची मागणी.

**बाऱ्हाळी** -शासकीय पोर्टलद्वारे सर्व तलाठी व मंडळ अधिकारी कार्यालयांसाठी नवीन लॅपटॉप व प्रिंटर-कम-स्कॅनर तात्काळ उपलब्ध करून द्यावेत. कालबाह्य उपकरणांच्या विल्हेवाट / बदलाची प्रक्रिया तातडीने पूर्ण करावी अशी मागणी तहसीलदार राजेश जाधव यांच्याकडे निवेदनाव्दारे तलाठी संघटनेचे अध्यक्ष औदुंबर वाडीकर यांनी केली आहे. तालुका महसूल विभागातील सर्व कामे ऑनलाइन झाल्यामुळे या कामात मोठी पारदर्शकता आली असताना देण्यात येणारे उपकरण जीर्ण झाल्यामुळे शेती कामासंबंधी अनेक अडचणी येत आहेत शासनाने रिकामे ऑनलाइन केली खरी पण तेवढे ग्राम महसूल अधिकाऱ्यांना तांत्रिक उपकरणे पुरवठा न केल्याने या ऑनलाइन कामासाठी अनेक अडचणी येत असल्यामुळे तांत्रिक सहाय्य (MC/Helpdesk) व आवश्यक प्रशिक्षण उपलब्ध करून द्यावे असे निवेदनात नमुद करण्यात आले आहे. परंतु शासन स्तरांवर आदेश पारित होऊनही अद्याप पावतो कुठलीही कारवाई झाली नसल्याने महाराष्ट्र राज्य तलाठी संघटना यांच्या उपरोक्त संदर्भीय निवेदनानुसार मुखेड तालुक्यातील सर्व ग्राम महसूल अधिकारी व मंडळ अधिकारी हे दि.१५ डिसेंबर रोजी आपापले ऊद्ध तहसील कार्यालयात जमा करून ऑनलाईन कामकाज पूर्णत बंद करून बहिष्कार घालण्याचा इशारा निवेदनाव्दारे तलाठी संघटनेच्या वतीने देण्यात आला आहे. या निवेदनावर औदुंबर वाडीकर ता.अध्यक्ष (तालुका तलाठी संघटना मुखेड) ,एस. के. देशमुख (ता.सचिव)सह आदीचे स्वाक्षरी आहेत.



## प्रतिबंधात्मक आदेश लागू

**नांदेड** -नांदेड वाघाळा शहर महानगर पालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ साठी महानगरपालिका निवडणूकीचा कार्यक्रम जाहिर झाला आहे. याबाबत १५ डिसेंबर २०२५ पासून आदर्श आचारसंहिता अंमलात आली आहे. महानगरपालिका निवडणुकीची प्रक्रिया, शांततेत, निर्भय व न्याय वातावरणात पार पडावी, या दृष्टीकोनातून आंदोलन, मोर्चा, आमरण उपोषण, आत्मदहन इत्यादी कारणावरुन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नसल्याने व सद्या महानगरपालिका निवडणुकीची आदर्श आचारसंहिता लागू असल्यामुळे १९ डिसेंबर २०२५ चे सकाळी ६ वाजेपासून ते १६ जानेवारी २०२६ चे मध्यरात्रीपर्यंत प्रतिबंधात्मक आदेश लागू केले आहेत.

# मराठी लोककलेचा आत्मा म्हणजे लावणी : प्रणिता देवरे

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १९ डिसेंबर-**

लावणी ही केवळ मनोरंजनाचा प्रकार नसून ती मराठी संस्कृती,लोकजीवन आणि परंपरेचे प्रतिबिंब असल्याचे सांगून या पारंपरिक लोककलेला सुसंस्कृत व सन्माननीय व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासाठी निलपत्रेवार कुटुंबातर्फे करण्यात येणाऱ्या प्रयत्नांचे कौतुक करावे तितके कमी असल्याचे प्रतिपादन लावण्यखणी हा भव्य सांस्कृतिक लावणी कार्यक्रमाचे उदघाटन करतांना भाजपा महिला मोर्चा प्रदेश उपाध्यक्षा तथा माजी जिल्हा परिषद सदस्या सौ.प्रणिता देवरे-चिखलीकर यांनी केले.



मराठी लोककलेचा आत्मा असलेल्या लावणीला समाजात सन्मानाचे व प्रतिष्ठेचे स्थान मिळावे,तसेच नव्या पिढीपर्यंत ही समृद्ध परंपरा पोहोचावी या उद्देशाने सौ.प्रगती बालाजी निलपत्रेवार यांच्या पुढाकारातून आयोजित रविवारी शंकरराव चव्हाण प्रेक्षागृहात मोठ्या उत्साहात आणि जल्लोषात संपन्न झाला.गच्च भरलेल्या सभागृहात उपस्थित महिला व पुरुष रसिकांनी कार्यक्रमाला भरभरून प्रतिसाद देत लोककलेवरील आपले प्रेम व्यक्त केले.या कार्यक्रमाचे आयोजन प्रसाद व अथर्व निलपत्रेवार यांनी केले होते. कार्यक्रमाचे उद्घाटन भाजपा महिला मोर्चा प्रदेश उपाध्यक्ष तथा माजी जिल्हा परिषद सदस्या सौ.प्रणिता देवरे-चिखलीकर यांच्या हस्ते संपन्न झाले,तर उद्घाटन सत्राच्या अध्यक्षस्थानी महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त गिरीश कदम हे होते.

यावेळी व्यासपीठावर प्रमुख अतिथी म्हणून लायन्स क्लबचे उपप्रांतपाल योगेश जायस्वाल,प्रसिद्ध निवेदक ड.गजानन पिंपरखेडे,सहयोग शिक्षण संस्थेच्या अध्यक्षा सुरेखा हंबर्डे,मनपा सहाय्यक आयुक्त राजेश जाधव,स्टेडियम व्यवस्थापक रमेश चवरे तसेच ज्येष्ठ रंगकर्मी डॉ. जुगल धुत हे मान्यवर उपस्थित होते.संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन धर्मभूषण ड.दिलीप ठाकूर यांनी अभ्यासपूर्ण,विनोदी आणि ओघवत्या शैलीत करून कार्यक्रमाची रंगत अधिक वाढवली.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी धर्मभूषण ड. दिलीपभाऊ ठाकूर,कर्मा प्रोडक्शनचे संतोष तरटे,प्रकाश जिंदम,लक्ष्मण बोडलवार,संतोष मुगटकर,टायगर ग्रुपचे बाळासाहेब जाधव,एपीआय संजय निलपत्रेवार,कायरा एनएक्सचे साईनाथ नागठाणे,वेंकटेश पुलकुंटवार, सत्यजित टिप्रसवार,माधव कोल्हे,रुक्मिणी निलपत्रेवार आणि माणिक गीते यांनी विशेष परिश्रम घेतले.

# खा. अशोक चव्हाण यांच्या नेतृत्वात संदीप भुरे, कमलकिशोर तावडे यांचे भाजपात प्रवेश

**तभा वृतसेवा**
**हदगाव, दि. १९ डिसेंबर-**



काँग्रेसचे हदगावचे माजी नगरसेवक संदीप भुरे व पैनगंगा मल्टीस्टेट अर्बन सोसायटीचे चेअरमन कमलकिशोर तावडे पाटील यांनी नांदेड येथे महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री खासदार अशोकराव चव्हाण यांच्या नेतृत्वात मराठवाडा संघटनमंत्री संजयभाऊ कौडगे,माजी आमदार महानगराध्यक्ष अमरनाथ राजुरकर ,नांदेड उत्तर जिल्हाध्यक्ष अँड.किशोर देशमुख यांच्या मार्गदर्शनात तालुकाध्यक्ष भागवत देवसरकर ,भाजपाचे तालुकाध्यक्ष (पश्चिम मंडळ) सुर्यकांत हनवते यांच्या पुढाकारातून भाजपा परिवारात पक्ष प्रवेश केला आहे त्यांच्यासोबत जिल्हा परिषद आष्टी गटातील आष्टीचे श्रीकांत ठोंबरे,सागर शेरे आकाश काळे, गजानन सूर्यवंशी, श्रीकांत वाघमारे यांनी पक्ष प्रवेश करत भारतीय जनता पक्षाचा झेंडा हाती घेतला आहे.

या पक्षप्रवेश कार्यक्रमाला माजी आमदार महानगराध्यक्ष अमरनाथ राजुरकर,प्रदेश कार्यकारणी सदस्य चंद्रशेखर पाटील कोळीकर, तालुकाध्यक्ष भागवत देवसरकर, भाजपाचे तालुकाध्यक्ष (पश्चिम मंडळ) सूर्यकांत हानवते,युवा मोर्चाचे अध्यक्ष देवानंद वानखेडे,अरुण गायकवाड, अनुसूचित जाती मोर्च्याचे अध्यक्ष संघपाल लोने, तालुका सरचिटनीस अवधूतराव कदम, गोरखनाथ शेजुळे व भाजपाचे इतर पदाधिकारी व कार्यकर्ते यांचे स्वागत करत खासदार अशोकराव चव्हाण यांनी सर्वांचे भाजपा परिवारात स्वागत करत व पुढील वाटचालीस मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या आहे.

**भाजपार्टीचे संघटन पश्चिम मंडळात मजबूत करणार: सूर्यकांत हनवते**



देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, पालकमंत्री अतुल सावे यांच्या मार्गदर्शनात जिल्ह्याचे लोकनेते माजी मुख्यमंत्री खासदार अशोकराव चव्हाण यांच्या नेतृत्वात व पाठबळाने तसेच मराठवाडा संघटनमंत्री संजय कौडगे, माजी आमदार अमरनाथ राजुरकर, उत्तरचे जिल्हाध्यक्ष किशोर देशमुख यांच्या सहकार्याने हदगाव पश्चिम मंडळासह पूर्ण तालुक्यात जुने नवे पदाधिकारी व कार्यकर्ते यांना सोबत घेत येणाऱ्या काळात इतर पक्षाचे अनेक पदाधिकारी पक्ष प्रवेशासाठी इच्छुक आहेत, या सर्वांचा पक्षप्रवेश करत हदगाव तालुक्यात भारतीय जनता पक्षाचे संघटन मजबूत करून येणाऱ्या जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीत भाजपा पक्षाला नक्कीच यश भेटेल त्यासाठी अहोरात्र प्रयत्न करणार आहे.

# बाऱ्हाळी येथे संतसंग सेवा समितीच्या श्रमदानातून वनराई बंधारा

**तभा वृतसेवा**
**बाऱ्हाळी, दि. १९ डिसेंबर-**



जगद्गुरु रामानंदाचार्य श्री नरेंद्र महाराज यांच्या संकल्पनेतून संतसंग सेवा समितीच्या वतीने बा-हाळी येथे वनराई बंधारा तयार करण्यात आला.

राज्या सह संपूर्ण देशात जगद्गुरू रामानंदाचार्य श्री नरेंद्राचार्यजी यांच्या संकल्पेनूसार पर्यावरण संवर्धन योजनेअंतर्गत व्रक्ष लागवड व संवर्धन मोठ्या प्रमाणावर करण्यात आली . नदी ,नाले, ओहोळ यावर कच्चे वनराई बंधारे तयार करणे हा त्या पूढचा टप्पा आहे.पाणी अडवणे व जिरवणे यातून भूजलपातळी वाढवणे नदी काठच्या शेतकऱ्यांना सिंचनासाठी पाणी,गूराढोरांना पिण्यासाठी पाणी, वन्यजीवांसाठी फायदेशीर ठरते तालुक्यात जवळपास २० ते २५ बंधारे तयार करण्यात आले आहेत.

राज्यात ७ ते २१ डिसेंबर या कालावधीत श्रमदानातून कच्चे वनराई बंधारे बांधण्याचा उपक्रम राबविण्यात येत आहे या उपक्रमांतर्गत मुखेड तालुक्यातील बा-हाळी येथे कबनूर रस्त्यावर वाहणाऱ्या नदीवर संतसंग सेवा समितीच्या श्रमदानातून दोन मिटर उंच व सहा मिटर लांबीचा वनराई बंधारा बांधण्यात आला आहे या वनराई बंधाऱ्यामुळे नदीतील पाणी पातळी वाढली आहे.

वनराई बंधारा बांधण्यासाठी संतसंग सेवा समीतीचे शिवाजी गवते,राम चव्हाण, बालाजी पा.जाधव,व्यंकट देशेटवार ,अंकुश चिंचलवाड, सचिन जाधव ,महिला नांदेड द.जि.अध्यक्षा सौ.पूजाताई उमाटे,सौ. अनिता दावलपूरे ,सौ. जोती वळगे ,सौ.दिपाताई महाजन, सौ.उमाताई निरणे,सौ.पद्मावती वळगे,पद्मावती उमाटे,जयश्री वाडीकर, अंकिता राजेवाड यांच्या सह अनेक शिष्य, भक्त उपस्थित होते.

# शेत मजुरीचे पैसे मागितल्याने अपंग मजुरास बेदम मारहाण

**तभा वृतसेवा**
**मुदखेड, दि. १९ डिसेंबर-**

मुदखेड तालुक्यातील मौजे कोल्हा गावातील शेतमजूर सटवा तुळशीराम गवाले कित्येक दिवसांपासुन शेतमजुरीचे काम करुन आपले व कुटुंबांचे पालन पोषण करत असतात.मागासवर्गीय समाजातील मातंग या जातीचे गरीब व कष्टकरी हे इसम असुन,ते नेहमीच गावातील शेतामध्ये शेतमजुरीचे कामे करुन आपला संसाराचा गाडा हाकत असतात. अशातच मौजे कोल्हा येथील गावातील आरोपी लक्ष्मण काळे यांच्या शेतात मजुरीचे काम केले होते. काम केल्यानंतर दुसऱ्या दिवशी मजुरीचे पैसे मागण्यासाठी शेतात गेले असता,त्या ठिकाणी आरोपी लक्ष्मण गोविंद काळे यांना शेतमजुर सटवा गवाले यांनी,मला मजुरीचे पैसे द्या अशी विनवणी केली.शेतमालक यांनी कशाचे पैसे देऊ तुला म्हणुन जातीवाचक शिवीगाळ करत उलट मला बेदम मारहाण केली. अशी फिर्याद पोलीस स्टेशनमध्ये दिल्यानंतर गुन्हा दाखल झाला आहे.सदरील शेतमजुर हे एका पायाने अपंग सुद्धा आहे बेदम मारहाण झाल्याने त्यांनी लगेच आपल्या जवळील भ्रमणध्वनी वरुन नातेवाईकाला फोन करुन मला सदर आरोपीने पैसे मागण्याच्या कारणामुळे जातीवाचक शिविगाळ करुन बेदम मारहाण केल्याचे सांगितले.

तसेच भोकर विधानसभा मतदारसंघातील काही स्थानिक लोकप्रतिनिधी अशा घटनेमध्ये आरोपीला वाचवण्यासाठी राजकीय हस्तक्षेप करत,राजकीय दबाव आणुन,अशी ट्रॉसिटीची विविध प्रकरणे दाबली जात असल्याची सुद्धा प्रतिक्रिया लोकस्वराज्य आंदोलनाचे जिल्हा प्रसिद्धी प्रमुख माधवराव गायकवाड ढोलउमरीकर यांनी सांगितली आहे.

या प्रकरणाचा आरोपी अद्याप फरार असल्याचे पोलिसांनी सांगितले आहे.

लोकस्वराज्य आंदोलनाच्या कार्यकर्त्यांकडुन या घटनेमध्ये निष्पक्ष न्याय देण्याची मागणी करुन आरोपीला तात्काळ अटक करावी, अन्यथा येणाऱ्या काळात जिल्हा पोलिस अधिक्षक नांदेड कडे लोकशाही मार्गाने आंदोलने केली जाईल,असे यावेळी सांगितले जात आहे.या प्रकरणाचा अधिक तपास उपविभागीय पोलिस अधिकारी दगडु हाके भोकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक धिरज चव्हाण हे करीत आहेत.

# नगर परिषद निवडणूक मतमोजणीसाठी किनवट पोलिसांचा कडेकोट बंदोबस्त

**तभा वृतसेवा**
**किनवट, दि. १९ डिसेंबर-**

किनवट नगर परिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ अंतर्गत रविवार, दिनांक २१ डिसेंबर २०२५ रोजी होणाऱ्या मतमोजणी प्रक्रियेदरम्यान कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी किनवट पोलिस प्रशासनाने व्यापक आणि कडेकोट बंदोबस्ताची आखणी केली आहे. मतमोजणी सुरळीत, शांततेत व कोणत्याही अनुचित प्रकाराविना पार पडावी यासाठी विविध स्तरांवर उपाययोजना राबविण्यात येत आहेत.

नगर परिषद कार्यालय परिसरात दोन स्तरांचा (डबल लेयर) कडक सुरक्षाबंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. पहिल्या स्तरात एसआरपीएफ प्लाटूनचे जवान तैनात असतील, तर दुसऱ्या स्तरात बाहेरील परिसरात पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदारांची नेमणूक करण्यात आली आहे. याशिवाय नगर परिषद मुख्य प्रवेशद्वारासमोर तसेच संपूर्ण परिसरात अतिरिक्त बंदोबस्त ठेवण्यात आला आहे.



मतमोजणीदरम्यान वाहतूक सुरळीत राहावी यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक ते खैरोद्दीन मार्गे अशोक स्तंभ या मार्गावर वाहतूक वळविण्यात येणार आहे. नागरिकांनी पर्यायी मार्गांचा वापर करावा, असे आवाहन पोलिस प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

मतमोजणीच्या ठिकाणी अनावश्यक गर्दी होऊ नये म्हणून जिजामाता चौक येथे बॅरिकेटिंग करण्यात येणार आहे. केवळ मतमोजणीसाठी अधिकृत उमेदवार व त्यांचे प्रतिनिधी यांनाच प्रवेश दिला जाणार आहे. बॅरिकेटिंगनंतर प्रवेश करणाऱ्या उमेदवार व प्रतिनिधींना मतमोजणी कक्षात भ्रमणध्वनी किंवा कोणतीही इलेक्ट्रॉनिक वस्तू नेण्यास मनाई करण्यात आली असून, यासाठी पाच ठिकाणी तपासणी व्यवस्था ठेवण्यात आली आहे.

या संपूर्ण बंदोबस्तासाठी १ एसडीपीओ, २ पोलीस निरीक्षक, १० एपीआय/पीएसआय, ८० पोलीस अंमलदार, १५ महिला पोलीस अंमलदार, एसआरपीएफ जवान, आरसीपी प्लाटून तसेच १०० पुरुष व महिला होमगार्ड अशी मोठ्या प्रमाणावर तैनाती करण्यात येणार आहे. मतमोजणीदरम्यान शहरातील सर्व संवेदनशील ठिकाणे, मिश्रवस्ती भाग, चौका-चौकात, उमेदवारांचे निवासस्थान तसेच सर्व राजकीय पक्षांच्या कार्यालयांसमोर योग्य तो पोलिस बंदोबस्त ठेवण्यात येणार आहे. याशिवाय नगर परिषद परिसरातील २०० मीटर अंतरावरील सर्व दुकाने बंद ठेवण्याचे आवाहन करण्यात आले असून, दुकानदार, पानटपरी चालक व हॉटेल मालकांना नोटिसा बजावण्यात येत आहेत.

गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या व उपद्रवी प्रवृत्तीच्या व्यक्तींवर इछ्डड कलम १६३ अंतर्गत प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात येत आहे. तसेच मतमोजणीनंतर निवडून आलेल्या उमेदवारांनी फटाके फोडणे, गुलाल उधळणे, मिरवणूक, रॅली, वाद्य वाजवणे यास मनाई करण्यात आली असून, याबाबत उमेदवारांची स्वतंत्र बैठक घेऊन सूचना देण्यात आल्या आहेत.

शहरात जमावबंदी आदेश लागू करण्यात आले असून, पाच किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्तींनी विनाकारण एकत्र थांबू नये, असे स्पष्ट करण्यात आले आहे. मतमोजणीदरम्यान कोणतीही अनुचित घटना घडू नये यासाठी ड्रोन कॅमेरे व व्हिडीओ शूटिंगद्वारे जमावावर लक्ष ठेवले जाणार आहे.

पोलिस प्रशासनाने सर्व उमेदवार व त्यांच्या प्रतिनिधींना आवाहन केले आहे की, विजयानंतर जल्लोष, रॅली किंवा मिरवणूक काढू नये तसेच पराभूत उमेदवारांच्या घरासमोर घोषणाबाजी करू नये. शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी सर्वांनी सहकार्य करावे, असे आवाहन किनवट पोलिस प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.